पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक ७ व ८ (जोडअंक) । मूल्य : रु. ३० । दिनांक : १६ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर २०२१



# जयभीम

## INSIDE



**शरणागती की राजनिती ?**
संपादकीय




**गलती ये नही की ये अछूत है...**
उत्तम कांबळे




**'जय श्रीराम'ची जागा घेण्यासाठी...**
जयदेव डोळे



**धर्मसत्ता विरुद्ध ज्ञानसत्ता**
बी.जी.वाघ



भारतरत्न

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त

# द पीपल्स पोस्ट

## परिवाराच्या वतीने विनम्र अभिवादन

संपादक

द पीपल्स पोस्ट, मुंबई

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्, नाशिक

**मुखपृष्ठ**
सचिन ओव्हाळ

**संपादकीय पत्रव्यवहार**
११, तळमजला, बी ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.)
मुंबई ४०००१६

**संपर्क**
८८८८५४१८२२
९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.

द पीपल्स पोस्ट
8888541822

**• जाहिरात विभाग संपर्क**
९८२११४४५४०९ / ८८०५१५१४५२

**• वर्गणीदारांसाठी संपर्क**

**महाराष्ट्र / मुंबई :**
गजानन आठवले : 9076065215
विदर्भ : आंकुश वाकडे : 9421424242
मराठवाडा : सचिन : 7350091569
कोकण : संकेत तांबे : 7738784132

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष
द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

पाक्षिक
# द पीपल्स पोस्ट
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक ७ व ८ (जोडअंक)
मूल्य : रु. ३० । दिनांक : १६ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर २०२१

संपादकीय – शरणागती की राजनिति? ४
जयभीम : समन्वयातील हिंदुत्ववादी अडथळा दूर करण्याचा प्रयत्न जी.के. ऐनापुरे ६
गलती ये नही की ये अछूत है, गलती ये है की ये यहाँ पैदा हुए – उत्तम कांबळे ९
'जय श्रीराम'ची जागा घेण्यासाठी 'जयभीम' – जयदेव डोळे १२
'जयभीम' म्हणजे न्यायाची लढाई – मुक्ता मनोहर १५
...तर देशाचे 'गौरवगाण' गाण्याचा अधिकारच उरणार नाही – प्रा.डॉ. शंकर विभुते १७
दृष्टिक्षेपात शेतकरी आंदोलन – प्रतिनिधी १९
हवा दिल्लीची : नरेंद्र मोदी यांची कोलांटउडी – विजय नाईक २०
धर्म एक चक्रव्यूह : धर्मसत्ता विरूद्ध ज्ञानसत्ता – बी.जी. वाघ २३
फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचे शिष्य : शंकरराव खरात – प्रा.डॉ. नितीन सावंत २६
बौद्ध तत्त्वज्ञानाने घडला नवा भारत – भीमराव सरवदे ३०
भ्रष्ट राज्यकर्ते, धनदांडगे, व्यावसायिकांना कोण आवरणार? – प्रा. – एच.एम. देसरडा ३३
हिंदू स्त्री अजूनही धर्मव्यवस्थेच्या जोखडात – डॉ. मनोहर नाईक ३६
व्यक्तिविशेष : समाजभान असलेला विचारवंत : प्राचार्य नागोराव कुंभार – प्रतिनिधी ३९
ग्रंथपरिचय : भारतीय समाजाच्या भवितव्याची चिंता वाहणारा ग्रंथ 'वंचितांचे वर्तमान' – प्रा. डॉ. गौतम खु. कांबळे ४१
आज-कालचे प्रश्न – पंक्चरवाला ४३
कविता : चालताना वाटेवरी या – रविचंद्र हडसनकर
याच दिवसांत – सायमन मार्टिन ४६
कोण काय बोलतं ४७

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# शरणागती की राजनिती?

जगातले एक मोठे शेतकरी आंदोलन ठरलेल्या आणि हजारो लोकांच्या सहभागातून सुरू असलेल्या दिल्लीतील शेतकरी आंदोलनासमोर जगातील एक शक्तिमान नेते नरेंद्र मोदी यांनी अखेर शरणागती पत्करली. एका वर्षाहून अधिक काळ अतिशय शांततेने, जिद्दीने आणि मोठ्या निर्धारानं चाललेलं इतकं मोठं शेतकऱ्यांचं आंदोलन जगानं पाहिलं नसावं. आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासूनच भाजप वगळता अन्य सर्व पक्षांची, जगातील नागरिकांची या आंदोलनाला खूप मोठी सहानुभूती होती. शेतकरी 'करो या मरो' या जिद्दीनं लढ्यात उतरले होते. त्यांनी कोरोनासारख्या महामारीत, थंडीत, उन्हात आणि पावसातही आंदोलन चालूच ठेवलं आणि एकूण शेतकऱ्यांच्या मुळावर उठलेले तीन काळे कृषी कायदे मागे घेतल्याशिवाय हटणार नाही, असा संकल्प केला. या संकल्पाची पूर्तता करताना सहाशे शेतकऱ्यांनी आंदोलनकाळात वेगवेगळ्या कारणांनी आपले प्राण गमावले. शेतकरी जेवढ्या निर्धाराने लढत होते, तेवढ्याच निर्धाराने आंदोलन मोडून काढण्यासाठी मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारही प्रयत्न करत होते. शेतकऱ्यांना कोंडीत पकडण्याचे, त्यांना नामोहरम करण्याचे, दंडेलशाहीचे, अपप्रचाराचे सर्व प्रयत्न करत होते. काही वेळा सरकारच यशस्वी होते आहे आणि आंदोलन दोन पावले मागे जात असल्याचेही चित्र दिसत होते, पण ते काही खरे नव्हते. वाहे गुरू असा गजर देत शेतकऱ्यांनी आपल्या जिद्दीला आणि ऐक्याला तडा जाऊ दिला नाही. रस्त्यावर भाकरी भाजल्या, रस्त्यावरच सभा घेतल्या, रस्त्यावरच ऐक्याची मूठ आवळली आणि एका महालढाईत विजयी होण्याकडे पाऊल टाकले. एका वर्षभरानं मोदींना साक्षात्कार झाला आणि आपण शेतकऱ्यांना समजवू शकलो नाही, आपली डोंगरावरची गुहेतली तपश्चर्या कमी पडली. आम्ही अपयशी ठरलो. देशवासियांची आम्ही माफी मागतो आणि हे तीन कायदे मागे घेतो, असं मोदींनी नेहमीप्रमाणे भावनाप्रधान होऊन सांगितलं. खरं तर पंतप्रधान झाल्यानंतर आणि मुख्यमंत्री असतानाही त्यांनी लोकांची माफी मागावी अशा अनेक घटना घडल्या होत्या. गुजरातमध्ये दंगलीत अनेकांची कत्तल झाली होती. कोरोनाकाळात सरकारच्या दुर्लक्षामुळे हजारो बळी गेले होते, आसाममध्ये वादग्रस्त विधेयकावरून अनेकांचे बळी गेले होते. पण कारभाऱ्यांनी कधी माफी मागितली नाही.



त्यांचा एकारलेला स्वभाव, अहंकार आणि त्यांना निवडणुकीत लाभलेलं पाशवी बहुमत यामुळे मोदी आणि त्यांचं सरकार काही ऐकण्याच्या, बदलण्याच्या मनःस्थितीत नव्हतं. आंदोलन मोडून काढण्याचे सर्व प्रयत्न झाले. शेतकऱ्यांचे विरोधक असलेले घटक आणि नेटकरी रात्रंदिवस आंदोलनाविषयी खोटी माहिती पुरवत होते. शेतकरी नेत्यांचा खराखोटा इतिहास शोधण्यात आला. आंदोलन जसजसं तापलं, तसं देशद्रोही, नक्षलवादी, दहशतवादी, खलिस्तानवादी, पाकवादी ही ठेवणीतली अस्त्रं बाहेर काढून ती आंदोलनाला चिकटवण्यात येऊ लागली. आंदोलकांचे नेते कसे स्वार्थी आणि बदनाम आहेत, याचे पाढे वाचले जाऊ लागले. आंदोलकांसाठीच्या सेवा बंद करण्यात आल्या. मोबाईल, इंटरनेट बंद झाले. आंदोलनाच्या ठिकाणी फूटपाड्यांना घुसवले जाऊ लागले. प्रजासत्ताकदिनी काही अनुचित प्रकार घडले. मोठ्या प्रमाणात धरपकडही झाली. आजारी पडणाऱ्या शेतकऱ्यांवर उपचार बंद झाले. त्यांचे एकेक वाक्य दहशतवादाला प्रोत्साहन देणारे कसे आहे, हे सांगितले जाऊ लागले. मंत्र्याच्या पोराच्या वाहनाखाली शेतकरी चिरडले गेले. गुन्हेगाराविरूद्ध तक्रार नोंदवण्यात, त्याला अटक करण्यात टाळाटाळ सुरू झाली. आंदोलन मोडून काढले जाणार याविषयी सर्वसामान्य माणसाला शंका नव्हती. तीन कायद्यांना विरोध म्हणजे जणू काही देशालाच विरोध असे वातावरण तयार करण्यात आले. याही परिस्थितीत शेतकरी लढत राहिले. केवळ कायद्याला विरोध एवढ्यासाठी ही लढाई नव्हती, तर आजच्या आणि उद्याच्या शेतकऱ्यांच्या अस्तित्वासाठीची ही लढाई होती. या काळात मोदींनी मौन पाळले होते. शेतकऱ्यांना चिमूटभर रकमेची पेन्शन चालू केली होती. आंदोलनात मरण पावणाऱ्या शेतकऱ्यांविषयी आदरांजली, श्रद्धांजलीचे दोन शब्दही त्यांच्या ओठावर आले नाहीत. या आंदोलनावर काही तरी तोडगा

काढावा यासाठी जगभरातून दबाव येत होता. जगातली अनेक माध्यमं शेतकऱ्यांना पाठिंबा देत होती, तर आपल्याकडे पाठिंबा देणाऱ्यांना विद्रोही ठरवलं जात होतं. काही असो, पण मोदी यांच्या छबीला तडा जात होता. त्यामागं अन्यही कारणं आहेत. धर्माधिष्ठित राष्ट्राच्या रचनेपासून ते नवराष्ट्रवादाच्या कल्पनेपर्यंत अनेक कारणे आहेत. मॉब लिंचिंग असो, नथूरामचे पुतळे असोत, साबरमतीमध्ये म. गांधींच्या पाऊलखुणा बदलण्याचा प्रयत्न असो, बेभान झालेले राष्ट्रवादी असोत, मोदी काहीच बोलत नव्हते. तर ते फक्त 'मन की बात' सांगत होते. असे करता करता पोटनिवडणुका झाल्या. त्यात भाजपला झटका बसला. बंगाल, तामिळनाडूत धोबीपछाड झाली आणि आता महत्त्वाच्या उत्तर प्रदेशासह तीन राज्यांतील विधानसभाच 'मन की बात' सांगायला दारात उभ्या राहिल्या. वातावरण काही चांगलं राहिलं नाही. उन्हा-पावसात आंदोलन करत लाठ्या झेलणाऱ्या शेतकऱ्यांची एका चकार शब्दानं त्यांनी चौकशी केली नाही. पण आता निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर असे करून भागणार नव्हते. किमान नक्राश्रू तरी ढाळायला हवे होते, ते त्यांनी टाळले. शिखांचे सर्वेसर्वा असलेल्या गुरू नानक जयंतीचा मुहूर्त त्यांनी शोधला. कायदे मागे घेण्याचा निर्णय म्हणजे गुरू नानक यांचे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न असं एकदम भावनाप्रधान होऊन त्यांनी सांगितलं आणि कायदे मागं घेण्याची घोषणा केली.

कायदे मागे घेतल्यानंतर आंदोलन मागं घेतलं जाईल की नाही, हा प्रश्न आहे. हा अग्रलेख लिहिपर्यंत तरी शेतकरी नेते राकेश टिकैत यांनी तशी घोषणा केली नव्हती. सरकारने तयार केलेले कायदे संसदेत कधी मागे घेतले जातील याची आपण प्रतीक्षा करत आहोत, असं त्यांनी म्हटलं आहे. मोदी यांनी कायदे मागे घेऊन, माफी मागून शरणागती पत्करली की आगामी निवडणुकीसाठी उजेडवाट तयार केली, याबाबत संमिश्र चर्चा चालू आहे आणि ती रास्तही आहे. राजकारणात काहीही करता येतं. दोन पावले मागं जाण्याचं, माफी मागण्याचं कशाचंही राजकारण करता येतं. शेतकऱ्यांना ही गोष्ट कधीच ठाऊक आहे. शेतीविषयीचे अनेक प्रश्न प्रत्येक वेळी निवडणुकीत गाजवता येतात किंवा गाजवले जातात. नंतर ते वर्षानुवर्षे विकासाच्या खोट्या झाडाला वटवाघुळाप्रमाणे लटकत ठेवले जातात. पण एक गोष्टी घडली, की समर्पित भावनेनं केलेलं आंदोलन हे कोणत्याही मोठ्या अहंकाराला वा महाशक्तीला झुकवू शकतं, नमवू शकतं असा जगात इतिहास आहे. भारतातही तो घडला आहे. भारताला भीक मागून स्वातंत्र्य मिळालं असं संघाची पिल्लावळ कितीही सांगत असली आणि त्यासाठी त्यांनी गोऱ्या गोमट्या नटनट्यांना पुढं केलं असलं तरी स्वातंत्र्य म्हणजे संघर्षाचं फळ आहे, हे कोणीही सांगू शकेल. उद्या या इतिहासाचे जेव्हा लेखन होईल, तेव्हा उजवे त्यात मोदींचं भावनाप्रधान भाषण आणि माफीनामा म्हणजे देशहितासाठी मोदींचा त्याग मांडतील. जे निपक्ष इतिहासकार असतील ते शेतकऱ्यांची जिद्द, त्याग यावर दोन शब्द लिहितील, तर काहीजण माफीला आणि माघारीला अदृश्यपणे चिकटलेल्या राजकारणाचे पदरही शोधतील.

शेतकऱ्यांचे आंदोलन तीन कायद्यांच्या विरोधात होते. जे कायदे बहुमताच्या जोरावर रात्रीत मंजूर करण्यात आले. रात्रीत त्यांच्यावर मोठ्या कारभाऱ्यांच्या सह्या घेण्यात आल्या. शेतकरी म्हणजे कृषी उत्पादने व व्यापाराला प्रोत्साहन देणारा कायदा (२०२०). शेतकऱ्यांना भावाचे आश्वासन आणि सेवा करार देणारा कायदा आणि तिसरा अत्यावश्यक वस्तू दुरूस्ती कायदा होता. हे तीन कायदे म्हणजे शेतकऱ्यांच्या जीवनात विकासाची क्रांती करणारे आहेत, असे सरकार सांगत राहिले. पण शेतकऱ्यांना मात्र हे तीन कायदे शेती आणि शेतकऱ्यांचे थडगे बांधणारे ठरतील, असे वाटत होते. शेती भांडवलशाहीच्या म्हणजेच सावकारी आणि व्यापाऱ्यांच्या घशात जाईल, शेतकरी संपेल. तो कसा तरी जगेल; पण दरिद्री अवस्थेत आणि तो विकासाचा नव्हे तर पिळवणुकीचा धनी होईल, असे कायद्याच्या विरोधकांना वाटत होते. सबब, कायदे मागे घेईपर्यंत माघार नाही असे आंदोलक मोठ्या निर्धाराने सांगत राहिले. निर्धार पूर्ण करण्यासाठी जी काही किंमत चुकवायची असेल ती चुकवत राहिले.

जगाला १९८० नंतर जागतिकीकरण आणि खासगीकरणाच्या प्रक्रियेत भांडवलशाहीने लोटले आणि कल्याणकारी राष्ट्र, जगण्याचे सन्माननीय स्वातंत्र्य, मदत वगैरे गोष्टींची वाट लागली. जगभर सेझने आणि कंपनी फार्मिंगने हातपाय पसरले. एकीकडे स्मार्ट सिटी, स्मार्ट प्रोजेक्टच्या नावाखाली शेतकऱ्यांची भरमसाठ जमीन बळजबरीने घेण्यात आली. दुसरीकडे, छोटी शेती करणे मुर्खपणाचे आहे, असे या कंपन्यांनी ठसवायला सुरुवात केली. हजार हजार एकराची कंपनी फार्मिंग करायची असेल, तर छोटे शेतकरी आणि त्यांची शेती मोडीत काढायची गरज आहे. मोदींनीच केलेल्या भावनाप्रधान भाषणात भारतात दोन हेक्टरपेक्षा कमी शेती असणारे शेतकरी ऐंशी टक्के आहेत. याचाच अर्थ, कंपन्यांना पहिला अडथळा ठरणार तो या ऐंशी टक्के शेतकऱ्यांचा. जगभरात भांडवलशाहीने तेथील सरकारच्या मदतीने हा प्रश्न सोडवून घेतला. म्हणजेच अधिक उत्पादन, अधिक नफा दाखवत या जमिनी बळकावण्याचा उद्योग सुरू आहे. भारतातही १९८० पासून हे घडते आहे. तीन कायदे अंमलात आले असते तर या गोष्टीला आणखी गती प्राप्त झाली असती. पारंपारिक शेतकरी खलास झाला असता आणि सारी शेती भांडवलदारांच्या हातात गेली असती. जी जगातील अनेक राष्ट्रांचे सरकार स्वतःच्या तंत्रावर चालवते. भारतातल्या शेतकऱ्यांनी फक्त भांडवलशाहीचे हित पाहणारे हे तीन कायदे ठोकरले, हे बरेच झाले. आता असे कायदे करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवणे आवश्यक आहे. •••

# जयभीम : समन्वयातील हिंदुत्ववादी अडथळा दूर करण्याचा प्रयत्न



जी.के. ऐनापुरे

**शहरात थांबून राहिलेला आंबेडकरवाद खेड्यापाड्यात, दुर्गम भागात घेऊन जायचा असेल, बहुमताचा राजकीय विचार करायचा असेल तर मार्क्सवाद हा अधिक जवळचा आहे. जयभीम हा सिनेमा अशा विचाराचे सूचन करतो.**



**आणि हाडापेरांतून उचल खाणारी ही सर्वज्ञ चित्रं**
**पहिलं आंबेडकराचं म्हंजे माझ्या लढाऊ पेशीचं**
**दुसरं मार्क्सचं म्हंजे माझ्या मूलभूत प्रगल्भ आत्म्याचं**
**तिसरं माओचं म्हंजे माझ्या सर्वयुक्त त्वचेचं**
**– कॉ. नामदेव ढसाळ**

।।१।।

जगविख्यात पोलीश सिनेदिग्दर्शक क्रायझोस्टॉफ केस्लोव्हस्की (Krzysztof Kieslowski) यांनी युवा दिग्दर्शकांसाठी मास्टर क्लास घेतला होता. त्यात त्यांनी नट आणि तो साकारणारी सिनेमातील व्यक्तिरेखा याबद्दल मत मांडलं होतं. जयभीम (२०२१) सिनेमा बघताना त्याची आठवण झाली.

And finally, I see yet another important aspect of a personality. The likeness of the personality of actor and caracter. Not his capability of understanding the character, because thats easy, but the similarity of his attitude towards life and philosophy. And if the film is about religion, his relation with God. If there is no talking about God his attitude towards what is most important in life. Towards children, parents, his country to the place where he's living. Towards the people surrounding him. His sympathies and antipathies, everything is very important to me.

अशा प्रकारची 'वैचारिक विश्वासार्हता' नट म्हणून (इतिहास पाहता) सूर्या शिवकुमार यांच्याकडे नाही. निर्माता म्हणून त्यांनी सांस्कृतिक जोखीम स्वीकारल्याचे मान्य करावे लागते. भारतातील सिनेमाचा इतिहास पाहता, अशा प्रकारचे भान नटाकडे तर नसतेच पण दिग्दर्शकसुद्धा अशा भूमिकेला पृष्ठभागावर ठेवायला तयार नसतो. 'द ॲक्सिडेंटल प्राईम मिनिस्टर' (२०१९) हे यासंदर्भातील भयंकर उदाहरण. या सिनेमात अनुपम खेर यांनी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांची भूमिका केली आहे. खेर हे उजव्या, हिंदुत्ववादी गटाचे, त्या विचाराचे समर्थन करणारे नट आहेत. हा विरोधाभास 'शुद्ध धंदेवाईक'सुद्धा नाही.

।।२।।

जयभीम या सिनेमाचा टिझर रिलीज झाल्यानंतर, प्रसिद्धी (फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर) करण्यामागे आंबेडकरवादी अधिक क्रियाशील होते. प्रत्यक्ष सिनेमा पाहिल्यानंतर त्यांनी मार्क्सवादी (मार्क्सवादाचीसुद्धा) चिकित्सा करायला सुरुवात केली. यासंदर्भात त्यांनी करून घेतलेला पूर्वग्रह अधिक भाबडेपणाचा होता. या सिनेमामध्ये सूर्याने डॉ. आंबेडकरांची भूमिका केली असावी, हा तो पूर्वग्रह. प्रत्यक्षात ती वस्तुस्थिती नव्हती. वस्तुस्थिती विरोधात जाणारी, म्हटली तर समांतर जाणारी होती. चळवळीचा आग्रह म्हणून ती विरोधात अशीच प्रवाही झाली. यातील वस्तुनिष्ठ आशयाला आंबेडकरवादी भाळले नाहीत. उलट त्यांनी विचारायला सुरुवात केली, की या सिनेमात एकदाही जयभीम असा उच्चार नाही, आंबेडकरवादी विचारधारेचा कसलाही मागमूस नाही. उलट लाल झेंडे, कम्युनिस्ट कार्यकर्ते, सिनेमाचा मध्यवर्ती मार्क्सवादी नायक असा तपशील डोळ्यात आल्याने कधीही सिनेमाच्या वाट्याला न जाणाऱ्या आंबेडकरी लोकांचा अपेक्षाभंग झाला असावा. (अशी परिस्थिती डॉ. जब्बार पटेल यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' (२०००) या सिनेमाच्या वेळेला निर्माण केली होती. पण ते कम्युनिस्ट नसल्यामुळे त्यांचं फारसं काही बिघडलं नाही.) सिनेमा हे कोणत्याही चळवळीचे मूलभूत हत्यार आहे; हे या अपेक्षाभंगाच्या पार्श्वभूमीवर समजून घ्यायची वेळ आली आहे. सिनेमा कसा बघावा, सिनेमा कसा अभ्यासावा, सिनेमाच्या आशयाचा आणि चळवळीचा सांधा

कसा जुळवावा, सिनेमा हे माध्यम कसे आपलेसे करावे, त्यातील ब्राह्मणी कसब वजा करून आंबेडकरवादी व्ह्यू कसा आकार घेईल याचा विचार, प्रस्थापन ही मोठा काळ मागे टाकणारी गोष्ट आहे. याचा शुद्ध आरंभबिंदूसुद्धा नजरेच्या टप्प्यात नाही. जयभीम या सिनेमाच्या निमित्ताने हा विचार अधिक उघड झाला, समोर आला. मार्क्सवादाच्या संदर्भात अशी परिस्थिती नाही.

।।३।।

दाक्षिणात्य फिल्म इंडस्ट्रीमध्ये वास्तववादी सिनेमा (बंगाल-केरळपेक्षा वेगळा) व्यावसायिक पद्धतीने विकसित झालेला दिसतो. सिनेमाचा विषय, त्यातील पात्रे ही (वास्तव) कॉस्मॅटिक व्हॅल्यू (Cosmatic Value) स्वीकारणारी नसली तरी त्यातील नायक हा प्रत्यक्षातील नायकाच्या विरोधी अंगाने जाताना दिसतो. गोविंद निहलानीच्या 'आक्रोश' (१९८०) चित्रपटात तो समांतर जाताना दिसतो. ॲड. भास्कर कुलकर्णी (नसीरुद्दीन शहा) हा यातला नायक. 'जयभीम'मध्ये अशी पार्श्वभूमी निर्माणच होत नाही (पटकथेचा पाया अधिक भक्कम नसल्याने). याची अनेक उदाहरणे देता येतील. या सिनेमाचा प्रभाव जबरदस्त असला तरी तो टिकाऊ तर नसतोच; पण वैचारिक भूमिकेला पुष्ट करणाराही नसतो. जयभीम सिनेमाला या सगळ्यांपासून बाजूला करता येत नाही.

जयभीम सिनेमातील आशय वास्तवदर्शी असला तरी हा सिनेमा करण्याचे कारण वैचारिक आहे, असे दिसत नाही. नटानटांतील अंतर्गत स्पर्धा हे त्याचे मुख्य कारण आहे. पहिल्या पिढीतील शिवाजी गणेशन, एम.जी. रामचंद्रन, कृष्णा बाबू (जितेंद्रच्या फर्ज (हिंदी)चा रिमेक करणारे प्रसिद्ध अभिनेता महेश बाबूचे वडील) यांच्यातील स्पर्धा अनुकरणीय होऊन रजनीकांत, कमल हसन, चिरंजीवी यांच्यामध्ये दिसून लागली. पुढे ती रिमेकमुळे अधिकच विस्तारली, भारतीय झाली. धनुष, रामचरण तेजा, रवी तेजा, महेश बाबू, सूर्या शिवकुमार, अल्लू अर्जुन इत्यादी अनेक नट चर्चेच्या केंद्रस्थानी येत राहिले. महेश बाबूने निवडलेले राजकीय विषय (भारत अनेनेणू-२०१८) इतके पॉप्युलर झाले, की जगनमोहन रेड्डी मुख्यमंत्री होण्यात त्याचा परिणाम झाला, असे त्या भागातले लोक म्हणायला लागले. धनुष तर जातिव्यवस्थेकडं घुसला. धनुषने असुरन (२०१९), कर्णन (२०२१) हे चित्रपट केले, तर सासऱ्याने म्हणजे रजनीकांतने 'काला' (२०१८) केला. याला लोक आंबेडकरवादी सिनेमा म्हणायला लागले, हे भयंकर. आंबेडकरवादी सिनेमा कशाला म्हणायचे, यावर सविस्तर चर्चा होऊ शकते. ते तितके सोपे नाही. (रजनीकांत यांना दादासाहेब फाळके पुरस्कार आणि धनुषला राष्ट्रीय पुरस्कार मिळणं (संघाच्या काळात) हे आंबेडकरवादी सिनेमा सुरू झाल्याचं लक्षण मानायचं का? मग दिग्दर्शकाचा गौरव का नाही? ही स्थिती आता अनुकरणीय झाली आहे. अल्लू अर्जुनचा 'पुष्पाः द राईज' (२०२१) हा या अनुकरणाचाच भाग. त्याला तर नक्षलवादाची पार्श्वभूमी आहे. सूर्या शिवकुमार या अनुकरणाच्या बाबतीत कसा मागे राहील? त्याने पहिल्यांदा 'सोराराई पोत्रू' (२०२०) केला. त्याचे यश पाहून त्याने 'जयभीम'चा विचार केला असावा. सिनेमाच्या माध्यमातनं नव्या सामाजिक स्थितीला पृष्ठभागावर आणण्याचा सलग प्रयत्न म्हणून या सगळ्या विवेचनाकडे पाहता येईल. पण त्याकडे फक्त सिनेमा म्हणून बघायचे की चळवळ म्हणून, हा प्रश्न उरतोच. केस्लोव्हस्कीने नटांच्या संदर्भात उपस्थित केलेला मुद्दा भयंकर उपस्थिती म्हणून समोर येतो. सूर्या शिवकुमारला यातून वगळता येत नाही. 'सोराराई पोत्रू'चा प्रत्यक्षातला नायक जी.आर.गोपीनाथ हा निवृत्त आर्मी ऑफिसर. एका रुपयात गरिबांना विमानप्रवास घडवावा हे त्याच्या आयुष्याचे ध्येय. या त्याच्या प्रयत्नांवर त्याने Simply Fly: A Deccan Odyssey (२०११) हे पुस्तक लिहिले. या पुस्तकावर हा सिनेमा आधारित आहे. तर जयभीमचा नायक जस्टिस चंद्रू मार्क्सवादी कार्यकर्ता. या दोन्ही प्रत्यक्षातल्या व्यक्तिरेखांमध्ये सूर्या शिवकुमारने स्वतः ला बघणे; या पाठीमागील समाजशास्त्र-मानसशास्त्र समजून घेण्यासारखं आहे.

।।४।।

जयभीम या सिनेमाच्या कथानकात नाविन्य नाही. पण सुरुवातीचा काही भाग वगळता त्यातील दृश्यात्मक भाषा जीवघेणी, नायकविरोधी वातावरणाला (नायक नसलेला अशा अर्थाने) समांतर राहते. संपूर्ण सिनेमा पोलिसी अत्याचार आणि कोर्टरुम ड्रामा अशा दोन भागात विभागलेला आहे. त्यातील पहिला भाग अधिक अंगावर येतो. बदला हा भाग येथे न्यायदानाच्या कक्षेत (संविधान) गेल्याने सिनेमाचे व्यावसायिक सूत्र अधिक भडक (टॉलिवूड टाईप) होत नाही. तरी हा सिनेमा तद्दन व्यावसायिक आहे. जयभीम शीर्षक देण्याचे धाडस हा त्याचाच भाग. (डॉ. आंबेडकरांच्या सहीचे मार्केटिंगसुद्धा आज जोरात सुरू झाले आहे) सिनेमाचे शीर्षक आणि Habeas Corpus ची चर्चा, हा या सिनेमातील नवा भाग. फक्त या शब्दावर कायद्याच्या अभ्यासकांनी स्वतंत्र लेख लिहायला हवा. या बाजूनेसुद्धा सिनेमावर वेगळा प्रकाश पडेल. दिग्दर्शक टी.जे. गणनावेल याने केरळचा संदर्भ जोडत या शब्दाला सिनेमाच्या प्रवाहात ठळक तर केलेच; पण आशयाच्या केंद्रस्थानीसुद्धा आणले. Habeas Corpus चा मराठी अर्थ कैद्याला न्यायालयासमोर प्रत्यक्ष हजर करण्याची लेखी आज्ञा. या दोन शब्दांमुळे निर्माण होणारी परिस्थिती हा या सिनेमाचा क्लायमॅक्स बनतो. संगिनी (लिझीमल ज्योली) आणि राजाकन्नू (मनीकंडन) यांनी जस्टीस चंद्रू झालेल्या सूर्याचा हिरोईकपणा हिसकावून घेतला आहे, हे या सिनेमाचे आणखी एक विशेष. दिग्दर्शक परंपरा आणि अत्याचार यातील फुटेजमध्ये गोंधळात पडल्याने साप पकडणाऱ्या जमातीच्या अनेक परंपरा दृश्यामध्ये त्रोटक तुटपुंज्या बनतात. या बिंदूवर अधिक ध्यान दिले असते तर पटकथा अधिकच मजबूत झाली असती. इथे



संशोधनाला वाव होता. यासंदर्भाने महाराष्ट्रातील पारधी जमातीचे स्मरण होते. ही जमात पोलिसी अत्याचाराच्या केंद्रस्थानीच आहे. पण त्या विषयावर सिनेमा करण्याचे धाडस महाराष्ट्रात अजूनही तयार होऊ नये; याचे आश्चर्यकारक कारण सांस्कृतिक (वाङ्मयीन) अधिक आहे. महाराष्ट्र एकल संस्कृतीच्या सवयीचा गुलाम झालेला आहे. महाराष्ट्र फुले-शाहू-आंबेडकरांचा आहे, असे म्हणणे त्या सवयीचाच भाग आहे. अरूण गवळीवर सिनेमा काढण्यासाठी अनुराग कश्यपसारख्या दिग्दर्शकाला उत्तर प्रदेशातून मुंबईत यावे लागले. रामगोपाल वर्मा हे फक्त निमित्त होते. सत्या (१९९८) हा सिनेमा आकाराला आला.

जयभीम या सिनेमातील सुरुवातीला येणारे उंदर पकडण्याचे रुपक संपूर्ण सिनेमावर नकळतपणे विस्तारत राहते. बिळात लपून बसतात ते हिंदू, अशी डॉ. आंबेडकरांनी केलेली हिंदूंची व्याख्या इथे प्रत्यक्षात पाहायला मिळते. बिळात लपून राहणे, बिळाच्या बाहेर आल्यावर मृत्यू पावणे या दोन अवस्था भारतीय समाजाला विभाजित करतात. यातील दुसरी अवस्था या सिनेमाच्या मध्यवर्ती आहे. या दुसऱ्या अवस्थेत जगणाऱ्यांच्या वाट्याला आलेले पोलिसी अत्याचार (ज्याला Naxalite Torture असेही म्हटले जाते) आजही कायम आहेत. सोनी सोरी (दंतेवाडा, बस्तर) हे या संदर्भातील अलीकडच्या काळातील उत्तम उदाहरण. तिच्यावर पोलीस कोठडीत अनन्वित अत्याचार झाले. एक महिला म्हणून तिच्यावर झालेले अत्याचार अमानवी म्हणण्याच्या पलीकडचे आहेत. सोनी सोरी ही शिक्षिका आहे. हा सिनेमा यांसारख्या अनेक गोष्टींची पुनःपुन्हा आठवण करून देत राहील.

।।५।।

वेटरीमारन, पा. रंजिश, गणनावेल, इत्यादी अनेक दिग्दर्शक अलीकडच्या काळात भारतीय सिनेमाच्या केंद्रापर्यंत येऊन पोहोचले आहेत. त्यांना इथपर्यंत पोहोचवणारा सामाजिक आशय ऐतिहासिक वस्तुस्थितीच्या रुपाने कथानकाचा भाग होत असला तरी दिग्दर्शकाने स्वीकारलेल्या नायकप्रधान बाजारी व्यवहारामुळे त्यातील राजकीय परिणाम शून्यवत होऊन मनोरंजनाच्या पातळीवरच टिकून राहणारा, स्वप्नवत बनतो. अत्याचाराची व्यवस्था बळकट करणारे लोकच अशा सिनेमांना प्रोत्साहन देताना दिसतात, त्यावर मिडियामध्ये चर्चा घडवून आणताना दिसतात. नागराज मंजुळेंसारखा दिग्दर्शक हा अशाच प्रवृत्तीचा बळी आहे. अशा लोकांना हाताला धरून आंबेडकरवादी सिनेमाची स्वप्ने बघणे म्हणजे महाराष्ट्रातील कम्युनिस्टांनी क्रांतीची स्वप्ने बघितल्यासारखे आहे. असे म्हणण्याचे धाडस करत असताना एनएफडीसी (National Film Development Corporation) सारख्या केंद्रीय संस्था भारतीय सिनेमातील ब्राह्मणशाहीला कशा पद्धतीने पुष्ट करत होत्या, याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. श्याम बेनेगलसारख्या लोकांची या काळातील मास्टरी पाहण्यासारखी आहे. त्यातील सरकारी पैशाचा गैरवापर आर्थिक नियोजनाला डुबवणारा आहे.

।।६।।

जयभीम हे स्लोगन जातीअंतामधील अडथळा आहे, की समन्वयशील आहे, याची चर्चा आता सुरू झाली आहे. डॉ. आंबेडकरांच्या काठमांडू येथील 'बुद्ध की मार्क्स' या विषयावरील भाषणामुळे जी संदिग्धता निर्माण झाली, त्यातील दरी वाढविण्याचे काम हिंदुत्ववादी विचारवंतांनी अधिक गंभीरपणे केलेले आहे. यात अनेक छुपे समाजवादी आजही कार्यरत आहेत. भाबडे आंबेडकरवादी नेतृत्व या प्रचाराला अधिक बळी पडताना दिसते, तर मार्क्सवादी वर्ग (Class) या नावाखाली अंतर्गत जातीवादाला खतपाणी घालताना दिसतात. जस्टीस चंद्रू यांनी म्हटल्याप्रमाणे, आंबेडकरवाद सत्य जाणून घेण्यासाठी मार्क्सवाद अधिक उपयोगाचा आहे. याच्यापुढे जाऊन असे म्हणता येईल, की शहरात थांबून राहिलेला आंबेडकरवाद खेड्यापाड्यात, दुर्गम भागात घेऊन जायचा असेल, बहुमताचा राजकीय विचार करायचा असेल तर मार्क्सवाद हा अधिक जवळचा आहे. जयभीम हा सिनेमा अशा विचाराचे सूचन करतो. याशिवाय दोन्ही विचारधारांमधील समन्वयाला अडथळा करणाऱ्या सनातनी हिंदुत्ववादी प्रयत्नांना बाजूला करण्याची दिशा दाखवतो. या सिनेमाचे मोजमाप अशाच अंगाने व्हायला हवे. •••

**(लेखक ज्येष्ठ साहित्यिक आहेत)**

# गलती ये नही की ये अछूत है,
# गलती ये है की ये यहाँ पैदा हुए



उत्तम कांबळे

**चोरीच्या आरोपाखाली विशिष्ट जातीतील काही लोकांना पोलिस अधिकारी एका रांगेत उभे व्हायला सांगतो. त्यांना शिवीगाळ करतो आणि झालेच तर त्यांच्या ढुंगणावर लाथा घालतो. हे पाहून एक तरूण पोलिस शिपाई आपल्याजवळ थांबलेल्या आपल्या ज्येष्ठ पोलिस कॉन्स्टेबलला विचारतो, की यांना सोडवण्यासाठी कोणीच येणार नाही का? यावर हा सहकारी म्हणतो, नाही... छे... यावर पहिला शिपाई विचारतो, यांची चूक काय? त्यावर हा अतिशय खिन्न मनानं उत्तर देतो, की गलती ये है की ये लोग पैदा हुए... कॅमेरा पुढं सरकतो आणि गुन्हेगार ठरवल्या गेलेल्या लोकांवर स्थिर होतो.**

गलती ये है की ये पैदा हुए.. हे उत्तर शांतपणे दिलेले असले तरी ते ऐकून प्रेक्षकांच्या मनात आगडोंब तयार होतो. संवेदनशील माणूस असेल तर त्याच्यातील विद्रोह सळसळायला लागतो. माणूस नावाच्या पवित्र प्राण्याला अस्पृश्य आणि गुलाम बनवणाऱ्या, माणसांसाठी लढणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची तीव्रतेने आठवण होते. 'जयभीम' या गाजत असलेल्या तमिळ चित्रपटात असे अनेक संवाद, अनेक दृश्ये आहेत, की जी इथल्या व्यवस्थेची चिरफाड करतात. तिच्या चेहऱ्यावर असलेला खोट्या समतेचा, खोट्या माणुसकीचा बुरखा टराटरा फाडून टाकतात. जन्माला येणे आणि त्यातही भारतात जन्माला येणे हाच एक मोठा गुन्हा आहे, हे ऐकताना क्रांतिकारी साहित्यिक बाबूराव बागुल यांच्या गाजलेल्या एका कवितेची आठवण व्हायला लागते,

**त्याने चूक केली येथे जन्म घेण्याची**
**ती त्यानेच दुरूस्त केली पाहिजे**
**देशांतरे करून किंवा**
**भीषण गुन्हे करून...**

'जयभीम' या चित्रपटात असेच एक भीषण युद्ध आहे, पण हे संहारी नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या राज्यघटनेतील तरतुदींचा हत्यारासारखा वापर करून... त्यातही हिबियस कॉर्प्सचा वापर करून. ही तरतूद अगदीच अपवादात्मक परिस्थितीत वापरली जाते. सरकारच्या ताब्यातील म्हणजे पोलिसांच्या ताब्यातील गुन्हेगार ठरवलेला माणूस जीवंतपणे कोर्टात हजर करण्यासाठी व्यवस्थेला आदेश देण्याची ती तरतूद असते. जयभीम चित्रपटात वकिलानं त्याच तरतुदीचा मुद्दा उपस्थित करत राजकन्नू या मुद्दाम आरोपी ठरवल्या गेलेल्याला हजर करा, अशी मागणी होते. यंत्रणा हलते. मग तो फरार झाला, केरळमध्ये लपला, अपघातात मेला असे सांगण्यात येते. प्रत्यक्षात राजकन्नूचा बळी पोलिसांनी कोठडीतच घेतलेला असतो. ज्या सरपंचाच्या घरातील विषारी साप त्यानं पकडला आणि कुटुंबाला वाचवलं, त्याच कुटुंबाकडून राजकन्नूवर चोरीचा आळ घेतला जातो. म्हणजे ज्यानं कुटुंबाला संभाव्य विषातून आणि मरणातून मुक्त केलं, त्यालाच गुन्हेगार ठरवण्यात आलं. त्याच्या जातीतल्या आणखी काहींना गुन्हेगार ठरवण्यात आलं. बेदम मारहाण करून त्यांना गुन्हा कबूल करण्यास भाग पाडण्यात आलं. ज्यानं कबूल केला नाही त्याला ठार मारण्यात आलं. या सर्व प्रकारात राजकन्नूचे कुटुंब, त्याची जात यांना ज्या मरणयातना होतात, त्या कमी करण्याऐवजी व्यवस्था गावभरातील मीठ गोळा करून, तिखट गोळा करून ते त्यांच्या भळभळत्या जखमांमध्ये टाकत असते. प्रचंड वेदना गुन्हा कबूल करण्यास भाग पाडतील ही त्यामागची वर्दीनीती असते. तामिळनाडूच्या एका खेड्यात अनुसूचित जमातीमधील एका जमातीवर बेतलेल्या आणि देशभर गाजलेल्या सत्यघटनेवर हा चित्रपट आहे. अगदी अलीकडची म्हणजे १९९६ ची ही घटना आहे आणि अगदी काल-परवा ओटीटीवर प्रदर्शित झालेला हा चित्रपट आहे. सूर्या, प्रकाशराज यांसारखे दिग्गज अभिनेते त्यात आहेत.

चित्रपटाकडे वळण्यापूर्वी तमिळ चित्रपटसृष्टीला सर्वप्रथम धन्यवाद द्यावे लागतील. सामाजिक वास्तव आणि ज्वलंत प्रश्नांवर चित्रपट काढण्यात तामिळनाडू आघाडीवर आहे.



तामिळनाडूसारख्या दक्षिणेकडील प्रदेशात जातीयवादाचे विष जसे भिनले आहे, तसे ते उतरवण्यासाठी पेरियार यांच्या पुरोगामी–क्रांतिकारी विचारांचे हत्यारही वापरले गेले आहे. तामिळनाडूला नुसतेच पेरियार नव्हे तर थिरूवल्लूवरू यांच्यासारखे जगप्रसिद्ध महाकवी लाभले आहेत. परिवर्तनासाठी एक मोठी घुसळण येथे झाली आहे. ब्राह्मणेतर पुजाऱ्यापासून ते सच्ची रामायणापर्यंत अनेक क्रांतिकारी गोष्टींचा हा प्रदेश साक्षी आहे. राजकारणात स्थिरावलेल्या एम.जी. रामचंद्रन, करूणानिधी यांच्यापासून ते स्टॅलिनपर्यंत या सर्वांनी या परंपरेचा वारसा चित्रपटाद्वारे जपण्याचा प्रयत्न केला आहे. अन्याय–अत्याचाराने त्रस्त व्यवस्थेत महासंघर्ष करून न्याय मिळवणारा आणि जमिनीवर लोळणारी लुंगी गुडघ्यापर्यंत आणून केवळ हाताच्या मुठी किंवा एखादा कोयता घेऊन खलफौजेला खलास करून महापराक्रम गाजवणारा नायक हे तमिळ चित्रपटांचे वैशिष्ट्य आहे. हिंदी चित्रपटात ते नाही. हिंदी चित्रपट ब्युटी पार्लरमध्ये जगण्यावर धन्यता मानतो, तर दक्षिणेकडचे अनेक चित्रपट रस्त्यावर झगडण्यात धन्यता मानतात. हिंदी चित्रपट चोली के पिछे क्या है असा प्रश्न विचारतात, तर दक्षिणेकडे चोळीचे अपहरण कोणी केले याचा शोध घेतात. मराठी चित्रपटातील काही अपवाद वगळता बाकीच्यांचे विचारायलाच नको. अजूनही ते वाजले की बारा, बाई वाड्यावर या किंवा कोंबडी पळाली यातच गुंग आहेत. दक्षिणेकडचे चित्रपट केवळ वास्तवावरच कॅमेरा फिरवत नाहीत, तर वास्तव का जन्माला आले, ते कोणी जन्माला घातले याचा शोध घेत जातात. असूरम हाही असाच एक चित्रपट आहे. केवळ फायटिंगचा किंवा रोडक्या टेकडीमागे लपण्याचा चित्रपट काढूनच धंदा करता येत नाही, तर समाज आणि मानवी जीवन कुरूप बनवणाऱ्या व्यवस्थेचा बुरखा फाडूनही धंदा करता येतोच, हेही दक्षिणेकडच्या चित्रपटांनी सिद्ध केले आहे. तमिळ, तेलगू, कानडी अशा भाषांमधील अनेक चित्रपट याबाबतचे साक्षीदार आहेत.

तर भारताचा इंडिया झाला असला तरी, वाटेचे सुपर एक्सप्रेस हायवे झाले असले तरी, गळक्या शहरांची स्मार्ट शहरं झाली असली तरी, झटपट न्यायासाठी लोकन्यायालयं आली असली तरी, लाल किल्ल्यानं गरिबांच्या नावानं कितीही गळा काढला असला तरी वास्तव अजून तेच आहे. म्हणजे सामाजिक वास्तव अजून धगधगतेच आहे, हे सांगण्याचा प्रयत्न करणारा आणखी एक चित्रपट म्हणजे जयभीम आहे. एकाच वेळी तो वर्णसंघर्ष आणि वर्गसंघर्ष टिपतो. चित्रपटाची सुरुवात उंदिर पकडणाऱ्या जमातीपासून होते आणि समृद्ध इंडियाचा फुगा इथं फुटतो. अत्याधुनिक काळातही इथं उदरनिर्वाहासाठी उंदिर आणि घुशी पकडून खाणाऱ्या जमाती आहेत यावर कॅमेरा स्थिर होतो आणि समाजव्यवस्थेतलं एक निखळ नग्न चित्र दाखवतो. तामिळनाडूतच नव्हे तर, भारतभर अशा जाती–जमाती आहेत. उंदिर, मांजरे, घुशी, घोरपडी पकडून ते पोटातील भुकेनं वळवळणारी लांबलचक आतडी शांत करतात. अशा लोकांना मतदारयाद्या, ओळखपत्रे, रेशनकार्ड यात जागा मिळालेली नाही. ते देशात असूनही नागरिक नाहीत. ते राज्यघटनेच्या प्रिअँबलमध्ये असूनही उपरे आहेत. व्यवस्थेनं त्यांना ना चेहरा दिला, ना निवारा ना हक्क दिले ना कर्तव्याची ओळख करून दिली. आम्ही सारे भारतीय आहोत, बांधव आहोत या उद्‌गारावरही कधी या जमातींना हक्क सांगता आला नाही. जन्मजात त्यांना अस्पृश्य मानले जाते. साप पकडण्यासाठी जोखीम पत्करून निघालेल्या राजकन्नूचा स्पर्शही सवर्णाला नकोसा वाटतो. म्हणजे त्याचा लाभ हवा पण स्पर्श नको, त्याचं अस्तित्व हवं पण त्याला मान्यता नको, असा हा प्रकार आहे. परिसरात कुठेही चोरी झाली, की यांनाच गुन्हेगार ठरवलं जातं. त्यात अनेक लोक कसलीही चूक नसताना किंवा गुन्हाही दाखल नसताना गजाआड कुजत–सडत आहेत. कणभर ड्रग खाणाऱ्यावर जगभर चर्चा होते, मणभर यातना भोगणाऱ्यावर चर्चाच होत नाही. इसे तो कहते है इंडिया, असंही आपण म्हणजे मिस्टर गांधी आय हॅव नो मदरलँड, असे



डॉ. बाबासाहेब का म्हणत होते, हेही कळायला लागतं. तो त्रागा होता की विषमतेच्या गर्भाशयातून बाहेर पडलेलं वास्तव होतं, हेही कळायला लागतं. 'जयभीम' चित्रपट हे समजून घेण्यास प्रोत्साहन देतो. ही बिनचेहऱ्याची जमात वाईट का तर ती उंदिर खाते म्हणून. पण उंदिर खाण्याची वेळ तिच्यावर आणली कोणी, हे मात्र कोणी विचारत नाही. असा प्रश्न आला, की व्यवस्थेचा बुरखा फाटतो. राजकीय स्वातंत्र्याचा उदोउदो करणारे सामाजिक स्वातंत्र्यावर मौन का पाळत होते, हेही ओघानेच लक्षात यायला लागते. त्यातूनच चित्रपटात नायक असलेला वकील सहजच एक वाक्य बोलून जातो, गांधी, नेहरू सर्व नेते इथे आहेत, आंबेडकर का दिसत नाहीत? आंबेडकर म्हणजे, मानव मुक्तीसाठीच्या महासंघर्षाचे प्रतीक म्हणजेच जयभीम!

गुन्हेगार आणि गुलाम ठरवल्या गेलेल्या जातींमध्ये जागा होणारा आणि माणुसकीची सनद सांगणारा प्रत्येक प्रयत्न व्यवस्था चिरडून टाकत असते. पोलिस आणि राजकारणी यांची एक दमनकारी व्यवस्था आहे. तिला भेदता येणे केवळ अशक्य होऊन बसले आहे. अशात एकच आशेचा किरण दिसत राहतो आणि तो म्हणजे राज्यघटनेचा. यातील एकेक तरतुदींचा वापर करत वकील अन्यायग्रस्तांच्या लढाया पुढे नेतो. व्यवस्थेला कोंडीत पकडतो. अन्याय करणाऱ्या पोलिसी व्यवस्थेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करतो. त्यांनाही शिक्षेचे धनी ठरवतो. कायद्याचा नीट आणि खोलवर वापर केल्यानंतर काय होते, तर एक महायुद्ध जिंकता येते. 'जयभीम' असा क्रांतिकारी उद्‌गार काढता येतो. चित्रपटाचे नाव जयभीम असले तरी चित्रपटात कुठेही प्रत्यक्षात भीम दिसत नाही. जयभीम या उद्‌गाराचा, अभिवादनाचा वापर प्रतिकाप्रमाणे, आयकॉनप्रमाणे करण्यात आला आहे. जयभीम एक विचार, जयभीम एक संघर्ष, जयभीम एक मुक्तीमार्ग या अर्थाने चित्रपटाच्या शीर्षकाकडे आपण पाहू शकतो आणि ते करताना आपण वामनदादांच्या एका गीतातील या ओळीही आठवू शकतो,

**जखडबंद पायातील साखळदंड**<br>
**तटातट तुटले तू ठोकताच दंड**<br>
**झाले गुलाम मोकळे, भीमा तुझ्या जन्मामुळे**

या ओळीतून वामनदादांनीही जणूकाही 'जयभीम'चा अर्थ सांगितला आहे.

भारताचा इंडिया, बिग इंडिया, शायनिंग इंडिया, मोदींचा इंडिया झालेला असला तरी अजूनही आपल्याकडे जातीच्या नावाने टिकून राहिलेले वास्तव कायमच आहे. ते गुजरातमध्ये गांधी आश्रमाजवळच्या झोपड्यांवर शेकडो मीटरचे प्लॅस्टिक टाकूनही लपवता येत नाही, हेच सिद्ध होते. आपल्याला इंडिया हवाय की भारत याचा फैसलाही बिनचेहऱ्याचे लोक करतील यात शंका नाही. हे सारे लोक नुसतेच गरीब नाहीत, तर नैतिकता आणि मूल्ये पाळणारे आहेत. ते उंदिर खातात हे खरंय पण उंदराचे पिल्लू खात नाहीत, हेही खरंय. जसं सुर्व्यांच्या कवितेतील खाटीक 'हम गाभनवाली गाय नही काटते' असं म्हणतो, तसंच 'जयभीम' चित्रपटातही उंदराचे पिल्लू सहीसलामत सोडून देणारी सहनायिका आहे. एकूण काय तर, भारतात आजही टिकून राहिलेल्या किंवा मोठ्या खुबीने आणि स्वार्थासाठी टिकवून ठेवलेल्या, हरलेल्या किंवा हरवल्या गेलेल्या, जखमी किंवा जखमांमध्येच उद्याची स्वप्ने पाहणाऱ्यांच्या जगण्याची ही चित्तरकथा आहे. त्यांच्या लढ्याला जयभीममुळे धार येईल, आसवे गरम होतील, जखमातून भाले फुटतील हे सांगण्याचा हा प्रयत्न आहे. हा प्रयत्न तेव्हाच यशस्वी होतो जेव्हा आपण आपली ढाल असलेल्या राज्यघटनेला नीट समजावून घेतो, पूजेच्या फ्रेममधून तिला बाहेर काढतो, तिचे संवर्धन करतो, तिच्याशी संवाद करतो तेव्हाच हे शक्य आहे. 'जयभीम' हा उद्‌गार जातीची ओळख सांगण्यासाठी, जात सांगण्यासाठी नसून तो विधायक लढ्यासाठी बिगूल वाजवतो, असेही काही हा चित्रपट सांगतोच सांगतो. •••

**(लेखक अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष व सकाळ माध्यम समूहाचे माजी संचालक संपादक आहेत)**

# ‘जय श्रीराम’ची जागा घेण्यासाठी ‘जयभीम’

**गांधीजींचे रामराज्य येण्याऐवजी ‘जय श्रीराम’चे राज्य आपल्यावर आले आहे. ‘जयभीम’चे राज्य यावे असे वाटत असेल, तर आताच्या संदर्भात कल्पना करीत हा चित्रपट जरूर पाहा...**




**जयदेव डोळे**





नक्षलवादी पोलिसांच्या हत्या का करतात? त्यांचे वर्गशत्रू निश्चित असतानाही त्यांना न संपवता पोलिस या सरकारी कर्मचाऱ्याला ते ठार का मारतात? शोषक म्हणून जमीनदार, जहागीरदार, सावकार, श्रीमंत शेतकरी, भांडवलदार आदी लोक म्हणजे नक्षलवाद्यांचे वर्गशत्रू. या वर्गातल्यांना संपवणे म्हणजे क्रांतीमधील एकेक अडथळे दूर करत जाणे असा या हिंसक मार्क्सवादाचा विचार. मार्क्सवादात लेनिन यांनी पोलिस, लष्कर यांना राज्याची दमनशक्ती मानले आहे. राज्ययंत्र दमन करण्यासाठी म्हणजे गरीब, कष्टकरी, पीडित, शोषित, दलित, दुर्बल लोकांना दडपण्यासाठी पोलिस वापरते. म्हणून पोलिस ही राज्याची दमनयंत्रणा. ती मोडायची यासाठी पोलिसांवर हल्ले करणे, त्यांना ठार करणे, त्यांची शस्त्रे पळवणे हे नक्षलवादी करीत असतात. ‘जयभीम’ हा मूळचा तमिळ चित्रपट पाहताना राज्याची दमनयंत्रणा खरोखर केवढे दमन करीत असते, यावर भर दिल्याचे जाणवत राहते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आणि एकंदर परिवर्तनवादी ज्या अर्थाने ‘जयभीम’ हे अभिवादन करतात, त्या अर्थाने या चित्रपटात आंबेडकरतत्त्व काही नाही. जात व धर्म यांच्या अनुषंगाने आंबेडकर यांचा राजकीय व सामाजिक विचार मांडायचा प्रयत्न हा चित्रपट करीत नाही. मात्र त्याचे शीर्षक तसा समज करवून देते. त्यामुळे प्रेक्षक आणि प्रसिद्धी दोन्हीही भरपूर लाभते आहे त्याला.

**समस्या एका व्यक्तीत एकवटलेली**

थोडक्यात, ‘जयभीम’ची कथा अनुसूचित जमातीच्या एका स्त्रीला न्याय मिळवून द्यायला एक वकील जी अथक धडपड करतो त्याची आहे. साप पकडणाऱ्या जातीतली ती आहे. अशिक्षित, गरीब आणि असहाय. तिचा नवरा सरपंचाच्या घरी निघालेला साप पकडून सोडतो. पण त्याच घरी झालेल्या एका चोरीच्या संशयावरून पकडलाही जातो. तो चोर नसतो. पण त्याची भटकी जात त्याला चोर ठरवते. कशी? ते चित्रपटाच्या पहिल्याच प्रसंगात दाखवले आहे. तुरुंगातून सुटका झालेले कैदी जातींप्रमाणे वेगळे केले जातात. सवर्ण सारे मोकळे सोडले जातात. पण ज्या जातींना ब्रिटिशांनी चोऱ्या करणाऱ्या असे नोंदवलेले असते, त्यातल्या काहींना वेगळे काढून पोलिस त्यांना न सोडवता आलेल्या चोऱ्यामाऱ्यांमधले संशयित आरोपी म्हणून पुन्हा ताब्यात घेतात. हा जो जातींबद्दलचा ग्रह, अपप्रचार आणि संशय असतो तो कसा एका जोडप्याचा घात करतो, हे दिग्दर्शकाला सांगायचे आहे. म्हणजे मूळ जात या घाणेरड्या वास्तवात आणि तिच्या प्रतिकांत आहे. मात्र दिग्दर्शक ‘जयभीम’ असे नाव देऊन शासनसंस्था, तिची दमनयंत्रणा, न्यायव्यवस्था आणि कायद्यांचे अस्तित्व यांवरच अधिक भर देतो. तरीही काही बिघडत नाही. कारण एका व्यक्तीत भारताची अवघी समस्या येथे एकवटली आहे.

**न्याय मिळवून देणारी पात्रे उच्चवर्णीय**

स्त्रीत्व, दारिद्र्य, गर्भारपण, भटकी जात, असहायता, निरक्षरता, नेतृत्वहिनता, अपमान, कष्टकरी जगणे, कातडीचा रंग अशा साऱ्या समस्यांचे मनुष्यरूप म्हणजे संगिनी. ती साप पकडणाऱ्या राजाकन्नू याची पत्नी असते. तिला विष उतरवण्याचे वनस्पतीज्ञान असते. पण जातीव्यवस्थेने ते महत्त्वाचे मानलेलेच

नाही. राजाकन्नू व आणखी दोघे अटक होऊन कोठडीत छळले जातात. चोरी शोधून काढण्याचे श्रेय मिळावे यासाठी पोलिस अमानुष मारझोड करून राजाकन्नूचा जीव घेतात. ते बालंट अंगावर येऊ नये म्हणून त्याचा मृत्यू अपघातात झाल्याचा बनाव करतात. उरलेल्या दोघांना दुसऱ्या एका तुरूंगात ठेऊन तिघेही फरार झाल्याचा कांगावा करतात. या साऱ्या पोलिसी कारस्थानाचा वकील चंद्रू अत्यंत चिकाटीने माग काढतो. हा जो चंद्रू आहे, तो कार्ल मार्क्सचा अनुयायी आहे. त्याच्या घरात मार्क्सची ठळकपणे आणि जोडीला आंबेडकर व पेरियार या दोघांच्याही तसबिरी आहेत. या चित्रपटात न्याय मिळवून देणारे सर्व म्हणजे वकील, न्यायमूर्ती व पोलिस महानिरीक्षक हे उच्चवर्णीय असून गुन्हेगार दलित, भटके, आदिवासी आहेत. जे तिघे पोलिस निरीक्षक व हवालदार 'थर्ड डिग्री'चा वापर करतात, ते मध्यम जातींचे दिसतात.

जात आणि जातींमुळे होत असणारा अन्याय हा विषय बाजूला ठेवल्यामुळे हिंदू धर्म, धार्मिक विषमता व अन्याय यांना मान्यता यांविषयी चित्रपटात काही भाष्य नाही. हिंदू धर्माने स्त्रीला नीच लेखल्याचाही उल्लेख नाही. त्यामुळे एक वर्गयुद्ध चित्रपटभर दिसायला लागते, ते म्हणजे पोलिसांची दमनयंत्रणा आणि तिला बळी पडणारे गरीब, असहाय कष्टकरी यांचे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ही दमनयंत्रणा ज्यांच्यासाठी राबते त्यांना हा चित्रपट फक्त दाखवत राहतो. त्यांना दोष देऊन शिक्षेपर्यंत नेत नाही. पोलिसांचे क्रौर्य, निर्दयीपणा कोणामुळे निर्माण झाला ते या चित्रपटात आपल्याला समजते. सत्ता राबवणारे अनेकजण पोलिसांवर प्रचंड दडपण आणत असतात. प्रत्येकाचे राजकीय आडाखे आणि फायदे असतात. पोलिस ज्या सत्तेसाठी एवढे दमन करीत राहतात, ती या पोलिसांचेही शोषण करीत आहे, हेही आपणास समजते. पण ज्या सत्यघटनेवरून 'जयभीम' तयार झाला त्यात पोलिसांची हिंसा हाच मुख्य मुद्दा होता. त्यामुळे कदाचित सामान्य कष्टकरी विरूद्ध दमनकारी शासनसंस्था असा खास मार्क्सवादी, साम्यवादी लढा सबंध चित्रपटभर चालतो.

**कायद्यांची उजळणी**

समाजवादी, साम्यवादी यांच्या चिवट संघर्षामुळेच भारतात श्रमिक, सामान्य माणूस, एकाकी व हतबल नागरिक यांच्या न्यायासाठी अनेक कायदे बनले. (आता गेल्या सात वर्षात त्यांची पूर्ण उपेक्षा होत असल्याचे आपण बघत आहोत) त्याचीच प्रचिती या चित्रपटात आपल्याला येत राहते. न्यायसंस्थेपुढे जी राज्यघटना मार्गदर्शक म्हणून उभी असते, तीसुद्धा सामान्य भारतीय नागरिकाच्या हिताचा विचार करणारी असल्यामुळे अशा कायद्यांची उजळणी चित्रपटात होत राहते. हेबिअस कॉर्प्स म्हणजे ठावठिकाणा नसलेल्या कैद्याला न्यायालयात हजर करणे. पोलिसांच्या ताब्यात असलेल्या संशयित व्यक्ती एकतर पळून जातात, मरण पावतात अथवा लपवून ठेवल्या जातात. त्यांचे

## पोलिस आणि कष्टकऱ्यांचे वर्गयुद्ध

जात आणि जातींमुळे होत असणारा अन्याय हा विषय बाजूला ठेवल्यामुळे हिंदू धर्म, धार्मिक विषमता व अन्याय यांना मान्यता यांविषयी चित्रपटात काही भाष्य नाही. हिंदू धर्माने स्त्रीला नीच लेखल्याचाही उल्लेख नाही. त्यामुळे एक वर्गयुद्ध चित्रपटभर दिसायला लागते, ते म्हणजे पोलिसांची दमनयंत्रणा आणि तिला बळी पडणारे गरीब, असहाय कष्टकरी यांचे.

नातलग त्यांचा ठावठिकाणा जाणून घ्यायला हेबिअस कॉर्प्सचा अधिकार वापरू शकतात. चंद्रू वकील त्या अनुषंगाने खटला लावून धरतात आणि अखेरीस पोलिसांनी राजाकन्नूची हत्या केल्याचे सिद्ध करतात. मारझोड केल्याशिवाय कुणी गुन्हा कबूल करीत नसते, अशी ठाम समजूत पोलिस खात्यात अजूनही आहे. संगतवार तपास, तर्क, पुरावे आणि साक्षी याऐवजी दहशतीचा पर्याय पोलिस वापरतात. त्यात सामाजिक, जातीय ग्रह घुसले की काय भयंकर घडते याचा नमुना 'जयभीम' देतो.

**...तरीही ब्राह्मण्य, जातिप्रथा टिकून**

तामिळनाडू राज्य तसे ब्राह्मणेतर चळवळीत महाराष्ट्राला बरोबरीचे. तिथले पक्षीय राजकारण अनेक वर्षे द्रविड चळवळीतल्या पक्षांहातीच आहे. मात्र त्याचा रोख झुकलेला आणि टोक मोडलेले वाटते, हे 'जयभीम' बघताना प्रकर्षाने जाणवते. एवढ्या जागृत राज्यात गुन्हेगार जाती-जमातीविषयक संरक्षक कायदा नसावा? महाराष्ट्रात पारधी, भिल्ल, शिकलगार आदींबद्दल अजूनही पोलिस संशयी असतात. चोर प्रत्येक जातीत असतात म्हणून त्या जाती चोर ठरत नसतात, असा एक संवाद चंद्रू करताना आपण ऐकतो. महाराष्ट्रात या जातींत अनेक सुधारक जन्मले. त्यांच्यासाठी पुनर्वसनाचा सरकारी कार्यक्रम सुरू झाला. आता जातींची ओळख व्यवसाय वा इतिहास यांआधारे करता येत नाही. कायद्याने त्यावर मनाई आहे. मात्र तामिळनाडूत जातीय अत्याचार भोगायचे दलित, आदिवासी घटकांमधले प्रमाण वाढते आहे. डॉ. आंबेडकर तिथल्या जस्टिस पार्टीचा दाखला देतात. आजचे तमिळ राजकारणी आंबेडकरांच्या जातिअंताची गरज लक्षात घेतात का? 'जयभीम' वरून तरी वाटत नाही. चित्रपटातल्या घटना १९९५ सालच्या असल्या म्हणून काय झाले! साम्यवाद, मार्क्सवाद तोकडे असल्याचे बाबासाहेब म्हणत. कारण वर्गावर वर्ण-जाती यांची मात त्यांना दिसे. म्हणून वर्ग आणि जाती या दोहोंचा मेळ घालून दोहोंचा विच्छेद हाच कार्यक्रम समताप्रस्थापनेचा हवा, असे ते म्हणत. 'जयभीम'मध्ये स्पष्ट अशी सांगड दिसत नाही. हिंदू धर्मावर तामिळनाडूत यथेच्छ टीका द्रविड चळवळीने केली. तरीही ब्राह्मण्य आणि जातिप्रथा टिकून आहे, याचे कारण समाजकारणाची झालेली पीछेहाट.

सत्तेत म्हणजे अधिकारपदावर जी जात असते, ती आपल्यापेक्षा

प्रतिष्ठेने कमी, दुबळ्या व असंघटित जातींवर अन्याय व जुलूम करते. हे भारतात सर्वत्र दिसते. तसे पोलिसांच्या दुष्ट व स्वार्थी वर्तनातून स्पष्ट करता आले असते. पोलिसांना मारून जशी क्रांती होणार नाही तशी पोलिसांत भरती होऊनही नाही. पोलिस यंत्रणा शासनव्यवस्थेचे एक हत्यार असून ते कुणाच्या हातात द्यायचे याचा निर्णय राज्यकर्त्यांचा असतो. मुस्लिमांची पोलिसभरती गेली अनेक वर्षे अडखळते, ठेचकाळते. आयएएस, आयपीएस, आयएफएस आदी सत्तारचनात मुसलमान अधिकारी दुर्मिळ होत आहेत. 'जयभीम'चा एक हेतू सध्या पोलिसांकडून मुस्लिमांचा केवळ संशयावरून जो बेदरकार छळ चालला आहे त्याकडे लक्ष वेधण्याचा असावा, असे मला वाटले. पण संपूर्ण चित्रपटात एकही मुस्लिम पात्र नाही. चित्रपटात ज्या पद्धतीने आदिवासी जमाती चिरडल्या जातात, त्याच पद्धतीने आज पोलिसांकरवी मुसलमान चिरडला जात आहे. पण तसा चित्रपट काढायची हिंमत कुणात आहे?

**न्यायाचा हक्क**

भारतीय राज्यघटनेचे सारे सार न्याय या मूल्यात साठवलेले आहे. राज्यघटनेच्या प्रास्ताविकेत न्यायतत्त्वाची मांडणी स्वातंत्र्य, समता व बंधुता यांच्या आधी आहे. हा न्याय सामाजिक, आर्थिक व राजकीय आहे. त्यामुळे त्याचे व्यापकत्व अपेक्षित आहे. नायिका संगिनी तिला पोलिस देऊ करतात ते प्रलोभन नाकारते. चंद्रू तिच्यासाठी म्हणजे तिच्या अस्मितेसाठी मालकीचे घर आणि नुकसानभरपाई मागतो व ती सरकारकडून मिळतेही. अशिक्षित व गरीब स्त्री तिच्या मुलांना सन्मानाचे जीवन हवे असल्याचे सांगते. तिला ज्या ज्या ठिकाणी नकार मिळत गेला, अपमान सोसावा लागला आणि पती गमवावा लागला, त्याची भरपाई कशानेही शक्य होणार नव्हती. न्याय या व्यापक संकल्पनेत ती पुष्कळ काही मिळवते. चंद्रू तिला सांगतो, की तुझ्या या न्यायालयीन लढाईच्या यशामुळे भविष्यात कुणी असे छळले गेलेच तर त्या व्यक्तीला न्यायाचा हक्क जरूर असेल.

**हुकूमशहांची मनमानी**

'जयभीम' मी दुपारी ॲमेझॉन या मंचावर पाहिल्यावर सायंकाळी मला टाटा स्कायमधल्या एका फ्रेंच वाहिनीवर 'द कन्फेशन' हा एक जगप्रसिद्ध फ्रेंच चित्रपट पाहायला मिळाला. कोस्टा गाव्हरास या दिग्दर्शकाचा १९७० चा हा चित्रपट कम्युनिस्ट पक्ष आपल्याच नेत्यांच्या निष्ठांचा संशय आल्याचे निमित्त करीत कसा त्यांचे अपहरण करून, तुरूंगात डांबून, त्यांचा अव्याहत छळ करून, कबुलीजबाब मिळवायचा डाव रचतो, त्याची कहाणी सांगतो. झेकोस्लोव्हॅकिया या देशात १९५० नंतर जे संशयग्रस्त राजकारण चालले आणि सोव्हिएत कम्युनिस्टांना कोण कोण विश्वासघातकी वाटले, त्यांच्या खटल्यांचा आधार या चित्रपटात आहे. तीही एक सत्यघटना होय. असे कितीतरी नेते, निष्ठावंत सोव्हिएत कम्युनिस्ट राज्यकर्त्यांनी छळ करकरून



## साक्षी-पुराव्यांऐवजी दहशतीचा पर्याय

मारझोड केल्याशिवाय कुणी गुन्हा कबूल करीत नसते, अशी ठाम समजूत पोलिस खात्यात अजूनही आहे. संगतवार तपास, तर्क, पुरावे आणि साक्षी याऐवजी दहशतीचा पर्याय पोलिस वापरतात. त्यात सामाजिक, जातीय ग्रह घुसले की काय भयंकर घडते याचा नमुना 'जयभीम' देतो.

फासावर लटकवले. एकानेही दगाबाजी केलेली नसताना प्रत्येकाकडून खोटाच कबुलीजबाब द्यायला दडपण आणले जाते ते आणि 'जयभीम'मध्ये खोटी स्वीकृती द्यायला सांगणे ते किती सारखे! गंमत म्हणजे इकडे चंद्रू ज्या विचारांचा आहे, त्या विचारांचेच असूनही तिकडे असंख्यजण छळ व मरण पत्करत असतात! आपला गुन्हा काय आणि तो आपण केलेला नसताना केवळ सत्तेच्या खेळासाठी आपला प्रचंड छळ चालला, हे त्यांना कळते. मात्र याच्या मागे नेकमे कोण व का याचा काही पत्ता लागत नाही. 'कन्फेशन इज द हायेस्ट फॉर्म ऑफ सेल्फ क्रिटिसिझम्' असे कम्युनिस्ट पक्षाचा एक अधिकारी या कैद्यांना सांगत असतो. जगभरच्या हुकूमशाही राजवटी आणि क्रूरकर्मा हीच युक्ती वापरत असतात. संशय निष्ठांचा नसतो. सत्तेच्या स्पर्धेत कोण मात करील याची भीती या कटामागे असते. कबुली दिली तरी मरण, नाही दिली तरी मरण अशी अवस्था हुकूमशहा आपल्या स्पर्धकांची करीत असतात.

**विषम व्यवस्थेचे रक्षक**

'जयभीम'मध्ये कटकारस्थान रचणारे एका विषम सामाजिक व्यवस्थेचे रक्षक आहेत. त्यांना त्यांच्या व्यवस्थेला आव्हान मिळू लागले, की भीती वाटू लागते. म्हणून किरकोळ, दुबळ्या, असहाय, असंघटित माणसांत त्यांना शत्रू दिसू लागतो. खरेखोटे काहीही करून आपण आपली सत्ता टिकवू शकतो, हे या रक्षकांना दाखवायचे असते. 'जयभीम'चा उद्‌गार अशा प्रस्थापितांना वठणीवर आणू पाहणारा आणि न्यायाचे राज्य स्थापन करायला भाग पाडणारा आहे, हरवलेले सत्य जगापुढे आणणारा आहे. •••

**(लेखक ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ आहेत)**

# ‘जयभीम’ म्हणजे न्यायाची लढाई



**जेव्हा संपूर्ण यंत्रणाच राजकीयदृष्ट्या भ्रष्टपणे राबत असेल तर जयभीम म्हणतच न्यायाची लढाई लढण्याशिवाय पर्याय राहणारच नाही. त्यासाठी जागोजागी अनेक ॲडव्होकेट चंद्रूंची मदत लागेल.**



मुक्ता मनोहर

‘जय-भीम’ असं म्हटलंकीच कोणालाही माहीत असतं, हा आवाज पददलितांच्या बाजूचा आहे. हा आवाज आहे समानता मागणारा, हा आवाज आहे न्याय मागणारा, हा आवाज आहे माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मागणारा, हा आवाज आहे भारतीय राज्यघटनेचा सन्मान करणारा आणि हा आवाज आहे या सगळ्यांसाठी संघर्षाचं आव्हान करणारा. तर या ‘जयभीम’ नावाच्या नुकत्याच ॲमेझॉनवर प्रसृत झालेल्या सिनेमाचा हा विचार आहे. याची चर्चा काही वर्तुळात खूप सुरू आहे. अनेक अंतःकरणांमधली खळबळ आता चर्चांमधून सातत्यानं पुढे येतीये. काय आहे असं ‘जयभीम’मध्ये आणि का होती आहे चर्चा?

**अंतःकरणात निर्माण झालेली उत्सुकता**

जयभीम एका सत्य घटनेवर व सत्य अनुभवांवरचा सिनेमा आहे. त्यातल्या सगळ्याच व्यक्ती आणि गोष्टीही जीवंत आहेत आणि सगळीकडे व्यापलेल्याच आहेत. वकिलांच्या हक्कांसाठी आणि इतरांच्याही हक्कांसाठी आवाज उठवणारा ॲडव्होकेट चंद्रू ही या सिनेमातली मुख्य व्यक्ती आहे. चंद्रूची भेट सुरुवातीलाच एका वकिलांच्या आंदोलनातूनच होते. आपल्या दृष्टीनं ही गोष्ट महत्त्वाची ठरते, कारण सिनेमाच्या विषयाबाबतची आपल्या अंतःकरणात निर्माण झालेली उत्सुकता. कैदेतून सुटून आलेल्या आदिवासींना शिक्षा संपल्यानंतरसुद्धा पोलिस वेगळं काढतात, जात विचारतात. करुला, एटूर अशा मागास जाती जमातींचे लोक. शिवाय गरिबीनं गांजलेले. म्हणून याच तळातल्या गरीब माणसांना पुन्हा पेंडिंग केसेसमध्ये अडकवण्यासाठी वेगळं काढलेलं. ‘एकेका माणसावर एकच केस कशाला, एकेका बकऱ्यावर ठोका २-४ केसेस.’ इन्चार्ज पोलीसची दिली जाणारी सूचना. कोणी विचारणार नाही, याबद्दल पोलीस यंत्रणा ठाम.

**जातीयतेचं विदारक सत्य**

कोणी विचारणारं नाही, या वास्तवाला छेद देत मग जयभीम साकार होत जातो. अतिशय गतिमानतेनं. इरुलर आदिवासी जमातीच्या राजकन्नू आणि संगिनी या तरुण दांपत्याच्या दारुण फरफटण्याची कहानी घडत जाते. तामिळनाडूतल्या विलूपुरम जिल्ह्यातल्या एका छोट्या गावातून ही कहानी सुरू होते. साप-उंदिर पकडणाऱ्या या गरीब जमातीतला राजकन्नू. वीट भट्टीवर काम करायला जाणारा आणि पक्क्या विटांचं घर बांधण्याचं स्वप्न पाहणारा. बायकोवर, मुलीवर आणि नव्यानं येऊ घातलेल्या मुलावरही प्रेम करणारा राजकन्नू. सरपंचाकडच्या घरात साप पकडण्यासाठी जातो. तिथे दागिन्यांची चोरी होते. मग राजकन्नू आणि संगिनी यांचा त्यांच्या साध्यासुध्या कष्टमय जीवनावरचाही अधिकार संपून जातो. संपूर्ण जमातीलाही प्रचंड अत्याचारांना तोंड द्यावं लागतं आणि अखेरीस राजकन्नू पोलिसांना मिळतोही, मात्र न सुटण्यासाठी, न सापडण्यासाठी. तो तुरुंगातून पळून गेला आहे, असं पोलीस सांगतात आणि तो सापडत का नाही म्हणून त्याचा शोध घ्यायला उभी राहते त्याची बायको संगिनी. ‘तो शेवटी बघितला होता पोलीस चौकीमध्येच.’ बस एवढाच धागा घेऊन ती ॲड. चंद्रूला भेटते. कोणी तरी सांगितलेलं असतं, की हाच वकील मदत करेल, म्हणून भेटते. मग ॲड. चंद्रू मानवी हक्कासाठी उभा राहतो. पती सापडावा ही संगिनीची जिद्द आणि मानव अधिकाराखाली केस फाईल करण्यापासून चंद्रूची सुरुवात. एका विलक्षण गतिमानतेच्या प्रवासातून राजकन्नूच्या गायब होण्याचं रहस्य उलगडत जातं. पोलिस चौकीतच राजकन्नूला चोरी केलीच आहेस, या कबुलीसाठी दिलेल्या अमानवी यातना. पण त्या भयानक यातना सहन करूनही त्याचं ‘मी चोरी केलेली नाही यावर ठाम असणं.’ तशीच जिद्द संगिनीचीही. ‘पैसे घे, मुलांचं पालनपोषण त्यातून होईल’ असं सर्वात वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याकडून सांगितलं जाणं आणि त्या दबावालाही तिनं नाकारणं. ‘हे पैसे घेऊन मी काही माझ्या मुलांना त्यांचे वडील दाखवू शकणार नाही आणि त्यांनी विचारलं, की तुझ्याकडे एवढे पैसे कुठून आले? तर त्यांना काय सांगू, तुमच्या वडिलांच्या खुन्यांनी हे पैसे दिले आहेत म्हणून.’ आपला नवरा मिळावा यासाठी ॲड. चंद्रूच्या बरोबर स्वतःचं गर्भारपण सांभाळत उभं राहणं. हे सगळंच सिनेमा बघणाऱ्यांच्या माणूस असण्याच्या

मूल्यकल्पनांना साद घालणारं आहे. गावाच्या प्रवाहातच स्थिर जीवन जगायला सरकारनं मदत करण्याची चंद्रूने कोर्टाकडे केलेली मागणी, हे सर्वच 'जयभीम'मधून उत्कटपणे मांडलं गेलं आहे. आदिवासी जमातींतली माणसं आणि त्यांचं कोंडीत सापडलेलं आयुष्य. वोटर लिस्टमध्ये नाव नाही, जमिनीचा पट्टा नाही, रेशनकार्ड नाही. अस्तित्वहीन करून टाकलेली माणसं. पण त्यांना शिकवण्यासाठीही धडपडणारी प्रौढ साक्षरतेचा वर्ग घेणारी मैत्रा. जातीचं प्रमाणपत्र मिळवून देताना जातीय उच्चनीचतेच्या विखारी भावना आपण अनुभवतो. तीच गोष्ट ही जातच चोरी करणाऱ्यांची आहे, असं चंद्रूला ऐकवणारा पोलीस अधिकारी आणि चोरी करणारी माणसं कोणत्या जातीत नाहीत, असा प्रतिप्रश्न करून त्याच्या म्हणण्याला अडवणारा चंद्रू अशा बारीकसारीक प्रसंगांतून एकूणच भारतीय समाजाचं जातीयतेचं विदारक सत्य आपण सिनेमातून अनुभवतो.

**भीषण वास्तव**

'जयभीम'मधल्या सर्व व्यक्तिरेखा आणि आदिवासी जीवनही खूप जीवंतपणेच रेखाटलं गेलं आहे. पण या सगळ्यांमागे एक हा सत्य अनुभव कथन करणारी प्रत्यक्षातली व्यक्ती आहे, ती म्हणजे जस्टीस के.चंद्रू. चित्रपटातली वकील ही व्यक्ती न्यायमूर्ती के.चंद्रू यांच्यावरच आधारलेली आहे. जस्टीस के.चंद्रू यांच्या आयुष्यातचं घडलेली घटना व त्यासाठी त्यांनी केलेला हा संघर्ष आहे. म्हणून सिनेमातल्या बऱ्याच व्यक्तीही सत्यच आहेत. के.चंद्रू त्यांच्या अनेक मुलाखतींतून त्यांनी या विशिष्ट अनुभवांबाबत आपले विचार व्यक्त केले आहेत. ते स्वतःच सांगातात, की न्यायासाठी सतत संघर्ष करणं हीच त्यांच्या जडणघडणीतली मुख्य बाब जशी होती, तसच ते मार्क्सवादी विचारांकडे तरुण वयातच आकर्षिले गेले होते. त्यांनी व्हिएतनाम युद्धाच्या काळातही मोर्चे, निदर्शने यात नेहमीच भाग घेतलेला होता. ट्रेड युनियन पातळीवरचे लढेही लढवले होते. पुढे वकिलांच्याही आंदोलनाचे ते भाग होते. संघर्ष हाच त्यांचा स्वभाव असल्याचं ते व्यक्त करतात. जातीवादाविरुद्धचा लढाही ते महत्त्वाचा मानतात आणि डॉ. बाबासाहेबांनाही मानतातच. आजही जीवंत असणाऱ्या पार्वतीच्या (संगिनीच्या) जिद्दीबाबत, तिनं दाखवलेल्या ठामपणाबद्दल ते आदर दाखवतात. जस्टीस के.चंद्रू जसे खरी व्यक्ती आहेत, तसेच आजच्या परिस्थितीचं वास्तवही तितकेचं भीषण आहे.

आदिवासींचं शोषण होण्यामागे अगदी प्रमुख कारणं आहेतच. देशातल्या अनेक भागात आदिवासींच्या अस्तित्वाचे लढे लढवावे लागताहेत. विकासाच्या नावाखाली त्यांची जंगलसंपत्ती ताब्यात घेण्यासाठी त्यांना त्यांच्या जीवनातूनच उचकटून टाकण्याची वाटचाल आता सर्रास झालेली आहे. आदिवासींवर होणारे गोळीबार ही गोष्ट नवीन नाही. शिवाय

## यातना सहन करूनही सत्यावर ठाम

एका विलक्षण गतिमानतेच्या प्रवासातून राजकन्नूच्या गायब होण्याचं रहस्य उलगडत जातं. पोलिस चौकीतच राजकन्नूला चोरी केलीच आहेस, या कबुलीसाठी दिलेल्या अमानवी यातना. पण त्या भयानक यातना सहन करूनही त्याचं 'मी चोरी केलेली नाही यावर ठाम असणं.' तशीच जिद्द संगिनीचीही.

अशा आदिवासींच्या मदतीला कोणी उतरलंच तर त्यांना राष्ट्रद्रोहाच्या आरोपाखाली तुरुंगात डांबलं जातंय. गेली तीन वर्षे तुरुंगात डांबलेल्या ॲड. सुधा भारध्वाज हे त्याचं बोलकं उदाहरण आहे.

**राजकीय फूस अन् गरिबांचे मरण**

पोलीस कस्टडीत होणारे अत्याचार दिवसेंदिवस वाढतानाच दिसतायेत. एवढच नाही, तर मानवअधिकाराची भाषा करणाऱ्यांना तुरुगांत जमीनही न देणाऱ्या सर्वोच्च न्यायव्यवस्था बघितल्या, तर हा प्रश्न किती आव्हानात्मक आहे हेच जाणवत राहतं. तामिळनाडूच्या जयराज आणि बेनेक्स या बापलेकांचा पोलिसांनी ज्या रितीनं बेदम मारहाण करुन खून केला, तेव्हा ते तर आदिवासीही नव्हते. त्यानंतर गुप्ता या व्यापाऱ्यालाही पोलिसांनी मध्यरात्री एका किरकोळ कारणाने बेदम मारहाण करून त्याची हत्या केली. राजकीय आदेशांचा आधार घेत एखाद्याला दहशतवादी म्हणून पकडून यातना देऊन ठार करणं व विकाऊ माध्यमांद्वारे त्या व्यक्तीला गुन्हेगार ठरवणं अशा अनेक गोष्टी वाढत्या संख्येनं घडतायेत. याबाबत जोसी जोसेफ यांच्या 'सायलंट कू' नावाच्या पुस्तकात बेकसूर लोकांच्या पोलिसांनी केलेल्या हत्यांबाबत बरीच माहिती आहे. एवढंच नाही, तर अशा पोलिसांची नावंसुद्धा आहेत. आपले प्रमोशन, आपले फायदे इत्यादींसाठी राजकीय मार्गदर्शनाखाली हा एक दमन यंत्रणेचा ढाचाच तयार झालेला आहे. पोलिस कस्टडीतले मृत्यू आणि यातना देणाऱ्या घटनांमध्ये किती वाढ झाली आहे? यासंदर्भात राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या अहवालानुसार, गेल्या तीन वर्षात ३४८ लोकांचे पोलिस कोठडीत मृत्यू झाले आहेत, तर १,१८९ लोकांना पोलिस यातना सहन कराव्या लागल्या आहेत. गेल्या तीन वर्षात न्यायालयीन कोठडीत ५,२२१ लोकांचे मृत्यू झालेले आहेत. एका अहवलानुसार उत्तर प्रदेशात सार्वात जास्त पोलीस कोठडीतले मृत्यू होतात. जेव्हा संपूर्ण यंत्रणाच राजकीयदृष्ट्या भ्रष्टपणे राबत असेल तर जयभीम म्हणतच न्यायाची लढाई लढण्याशिवाय पर्याय राहणारच नाही. त्यासाठी जागोजागी अनेक ॲडव्होकेट चंद्रूंची मदत लागेल. •••

**(लेखिका पुणे महानगरपालिका कामगार युनियनच्या जनरल सेक्रेटरी आणि लेखिका आहेत)**

# ...तर देशाचं 'गौरवगाण' गाण्याचा अधिकारच उरणार नाही



प्रा. डॉ. शंकर विभुते

**आपण महासत्ता बनण्याची स्वप्नं पाहत असताना देशातील जातीव्यवस्थेचं निर्मुलन करू शकलो नाही, ही लाजिरवाणी बाब आहे. देशातील प्रत्येक व्यक्ती स्वाभिमानाने जगणार नाही, तोपर्यंत आपली संस्कृती उच्च असल्याचं, आपण खूप शोध लावल्याचं किंवा देश जगाच्या ज्ञानाचं केंद्रबिंदू असल्याचं गौरवगाण गाण्याचा अधिकार आपल्याला प्राप्त होत नाही.**

जयभीम चित्रपटाविषयी देशभरातील प्रसारमाध्यमे आणि समाजांमध्ये चर्चा सुरू आहे. जातीयवादाची दाहकता मांडणाऱ्या या चित्रपटाने रसिक, प्रेक्षक आणि समीक्षक या सर्वांनाच विचार करायला भाग पाडले आहे.

पाश्चात्य राष्ट्रातील मिल्टन नावाचा एक अंध कवी एके ठिकाणी म्हणतो, की तुमचा देश कसा आहे? मला माहीत नाही. तुमचे लोक काय खातात? मला माहीत नाही. तुमच्या लोकांची विचारसरणी कशी आहे? मला माहीत नाही. तुमचे लोक कोणते कपडे परिधान करतात आणि कसे जगतात? हे मी पाहू शकत नाही. पण तुमच्या देशातील साहित्य मला वाचून दाखवा, तुमचा देश कसा आहे ते मी सांगतो. यावरून आपणास लक्षात येते, की चित्रपट, साहित्य किंवा अन्य माध्यमे ही त्या-त्या देशाची ओळख असतात. त्या देशातील समाजव्यवस्थेचा आरसा म्हणून ती जगासमोर उभी राहतात. भारतातील जातीव्यवस्था आजही समाजाला कशी घट्ट चिटकून आहे. दुर्दैवाने समाजासोबतच पोलीस यंत्रणा आणि सरकारमध्येही ती कशी रुजलेली आहे, याचं सुंदर चित्रण म्हणजे जयभीम चित्रपट होय.

**अन्यायाचं वास्तव चित्रण**

चित्रपटाचं कथानक फार आकर्षक, मनाला आनंद देऊन जाणारं, प्रसन्न करणारं असं अजिबात नाही. तामिळनाडूत १९९५ साली घडलेल्या सत्य घटनेवर आधारित हा चित्रपट आहे. महाराष्ट्रामध्ये ज्या पद्धतीने पारधी, फाशीपारधी, बेरड, रामोशी यांसारख्या जातींना गुन्हेगार म्हणून किंवा चोर जमात म्हणून पिढ्यान्‌पिढ्या अन्याय-अत्याचारांना सामोरे जावे लागते, त्याच पद्धतीने तामिळनाडूमध्ये इरूलर समाजातील आदिवासी लोकांना कोणत्या भीषण परिस्थितीला सामोरे जावे लागते, हे हा चित्रपट सांगतो. चित्रपटामध्ये एकही गीत नाही, आयटम साँग नाही, नेहमीच्या चित्रपटाप्रमाणे अन्यायाच्या विरोधात मारामारी करणारा हिरोदेखील या चित्रपटात नाही; किंबहुना या चित्रपटाचे वेगळेपण असे आहे, की हा चित्रपट श्रीमंत, जमीनदार किंवा एखादा विशिष्ट समाजगट एखाद्या विशिष्ट समाजावर अन्याय करतो हे दाखवत नाही, तर याहीपुढे जाऊन मायबाप सरकार आणि पोलिस यंत्रणा या समाजाला कोणत्या पद्धतीने वागवतात याचं भयावह चित्र हा चित्रपट मांडतो. या चित्रपटातील काही संवाद टाळ्या घेणारे नाहीत, तर मनाच्या खोल गाभ्यात जाऊन चिंतन करायला भाग पाडणारे आहेत. या चित्रपटात आदिवासी समाजातील राजकन्नू या तरुणाला खोट्या चोरीच्या आरोपाखाली अटक केली जाते आणि तो गुन्हा कबूल करावा म्हणून अत्यंत वाईट पद्धतीने मारपीट केली जाते. हे दृश्य पाहताना कोणत्याही संवेदनशील व्यक्तीच्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहत नाही. कधीकधी तर पाहणाऱ्याला एक वेळेस असं वाटतं, की मार खाण्यापेक्षा चुकीचं का होत नाही पण गुन्हा कबूल करावा. अशी परिस्थिती ही यंत्रणा उभी करते. पण त्यातील नायक आपल्या सहकाऱ्यांना म्हणतो, की आज आपल्याला लागत असलेला मार उद्या कमी होईल, तुझा जीव कदाचित निघूनही जाईल. पण आपण चोरी न करताही चोरी केली म्हणून कबुली दिली, तर आपल्या समाजावर कायमचा कलंक बसेल. हे वाक्य प्रेक्षकांच्या मनात खोलवर जाऊन बसते. जेव्हा समाजाच्या हितासाठी अशिलाकडून कोणतीही फीस न घेणारा, मानवतेसाठी झटणारा वकील चंद्रा म्हणतो, चोर कौन सी जाती मे नही होता? पहले लोगों को जातीं मे बाँटना बंद करो किंवा मै किस्मत पे भरोसा नही करता हूँ, सच्चाई पे करता हूँ किंवा हर पोलिसवाला बूरा नही होता है और हर पुलिसवाला अच्छा भी नही होता... हे सर्व संवाद चित्रपटातले संवाद राहत नाहीत, तर आजच्या समाजाच्या मानसिकतेला धक्का देणारे आणि विचार करायला भाग पाडणारे सुविचार म्हणून आपल्यासमोर उभे राहतात.

## चार ओळींमधून चित्रपटाला न्याय

बऱ्याचदा आपण शब्दांना मर्यादित अर्थ देऊन मोकळे होतो. शब्द खऱ्या अर्थाने निरपेक्ष आणि अमूर्त स्वरुपात आपल्यासमोर येत असतात. आपण आपल्या पद्धतीने त्यांचा सोयीचा अर्थ लावतो आणि कालांतराने तेच अर्थ त्याला घट्ट चिटकवले जातात. कधीकधी तर त्या अर्थाच्या पाठीमागचा व्यापक अर्थही आपण समजू शकत नाही. पण एक तास भाषण दिल्यापेक्षा किंवा अनेक व्याख्याने ऐकल्यापेक्षा, एखादा चित्रपट या शब्दाचा अर्थ किती व्यापक असू शकतो हे सांगून जातो. जयभीम चित्रपटात कुठेही 'जयभीम' हे अभिवादन येत नाही किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख येत नाही. फक्त एके ठिकाणी डॉ. आंबेडकरांचा उल्लेख केला जातो, तेही सहजपणे. पण त्यामुळे प्रेक्षकांच्या मनावर खोलवर परिणाम होतो. जेव्हा वकील चंद्रा एका ऑफिसमध्ये जातो आणि तेथे लावलेल्या फोटोकडे पाहत म्हणतो, पंडित नेहरू व महात्मा गांधींसोबत आंबेडकरांचाही फोटो असायला हवा होता. एवढंच एक वाक्य या संपूर्ण चित्रपटांमध्ये येतं. यापुढे कुठेही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा उल्लेख होत नाही. पण हे वाक्यही एक महत्त्वाचा विचार सांगून जाते. पंडित नेहरू, महात्मा गांधी यांच्याबद्दल आम्हाला तिरस्कार, द्वेष नाही. पण त्यांच्यासोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरही महत्त्वाचे महापुरुष आणि समतावादी व्यक्तिमत्व आहेत, याची तो जाणीव करून देतो. थोडक्यात, जयभीम म्हणजे न्याय, समता, मानवतावाद, माणुसकी हा संदेश हा चित्रपट वेगळ्या पद्धतीने देऊन जातो. तसं चित्रपटाच्या शेवटी एका कवितेच्या चार ओळी संपूर्ण चित्रपटाला न्याय देऊन जातात. त्याचा आशय असा आहे, की जयभीम म्हणजे प्रेम, जयभीम म्हणजे प्रकाश...

## सामाजिक दुरवस्थेचं भीषण वास्तव

जातीव्यवस्था आणि अन्याय ही आपल्या भारतातील हजारो वर्षांपासून चालत आलेली एक भयावह व्यवस्था आहे. ही व्यवस्था आजही एकविसाव्या शतकामध्ये जगत असताना आपण उघड्या डोळ्यांनी पाहतो. एकीकडे भारत महासत्ता बनण्याकडे वाटचाल करत आहे असे अभिमानाने सांगत असताना, दुसरीकडे याच भारतातील काही समाज जंगलातील साप आणि उंदीर मारून आपली उपजीविका भागवतात. त्यांना राहण्यासाठी घर नाही, सांगण्यासाठी गाव नाही. अशा लोकांना कोणतं आधारकार्ड मिळावं, कोणतं रेशनकार्ड मिळावं, हे प्रश्न हा चित्रपट उपस्थित करतो. लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येकाला मतदानाचा अधिकार आहे, पण मतदान करण्यासाठी मतदान कार्ड लागते, जनगणनेमध्ये नाव नोंदवावे लागते. पण ज्यांना गाव नाही, घर नाही, अनेक वर्षांपासून जे जंगलात पोट भरण्यासाठी पाल टाकून राहतात, त्यांना जातीचे प्रमाणपत्रही मिळत नाही; सुविधा तर फार पुढची गोष्ट झाली. हे भीषण वास्तव या चित्रपटाच्या माध्यमातून पुन्हा एकदा अधोरेखित केले गेले आहे. चित्रपट हे निमित्त आहे. व्यवस्था किती भीषण आहे हे या माध्यमातून वेगवेगळ्या रुपात व्यक्त झाले आहे.

## ...तर वृथा अभिमान कुचकामी ठरेल

भारतीय क्रिकेट संघ वर्ल्ड कपच्या फायनलमध्ये जाऊ शकला नाही याचं दुःख जसं तरुणांना असतं, तसं इथली जातीव्यवस्था अद्यापही आपण मिटवू शकलो नाही, याची जाणीवही त्यांना असली पाहिजे. आदिवासी जातीचे दुःख, व्यथा, वेदना आपण समजू शकलो नाही, ही बाबही तरुणांनी मनावर घेण्यासारखी आहे. जोपर्यंत देशातील प्रत्येक व्यक्ती सन्मानाने, अभिमानाने, स्वाभिमानाने जगणार नाही तोपर्यंत जगाच्या नकाशावर आपण किती मोठे आहोत, आपली संस्कृती किती उच्च आहे किंवा प्राचीन काळी खूप मोठे शोध लावले होते, जगाच्या ज्ञानाचा आपला देश केंद्रबिंदू होता, अशी गौरवाची विधाने करण्याचा कुठलाच अधिकार राहणार नाही. हा चित्रपट म्हणजे आपण पुन्हा एकदा मानवतावादी, समतावादी, न्यायवादी व्यवस्थेकडे वाटचाल केली पाहिजे, याचं सूचन आहे. माणूस म्हणून प्रत्येकाला जगता आले पाहिजे, हा विचार हा चित्रपट देऊन जातो. •••

**(लेखक साहित्यिक आहेत)**

## महापुरूषांचं महत्त्व जाणा

सामान्यतः आपल्याकडे असं म्हटलं जातं, की महापुरुषांना आपण जातीच्या चौकटीत बंदिस्त केलं आहे. महापुरुष हे कोणत्याही एका जातीचे, धर्माचे नसतात, तर ते सर्वांचे असतात. आपण करंटे अशा महापुरुषांना जातीत बंदिस्त करून त्यांचे विचार मर्यादित केले आहेत. पण हे पूर्णतः बरोबर नाही. कुठलाही समाज कोणत्याही महापुरुषाला डोक्यावर का घेतो, हे आपण पहिल्यांदा समजून घेतले पाहिजे. आपल्याला माणूस म्हणून, आपला बाप म्हणून जेव्हा एखादा महापुरुष आपल्या डोळ्यासमोर येतो तेव्हा त्यांना डोक्यावर घेणं साहजिकच असतं; परंतु याचा अर्थ असा नाही, की अन्य समाजांनी किंवा अन्य जातीतील लोकांनी अशा मानवतावादी विचार मांडणाऱ्या महापुरुषाला आपल्या घरात घेऊ नये किंवा आपल्या घरी ठेऊ नये किंवा आपण त्यांना मिरवू नये. असं कुठलाही समाज सांगत नाही. आपण अशा महापुरूषांचं महत्त्व नजरेआड करून उलट समाजाला दोष देऊन मोकळे होतो. आपल्या विचारांमध्ये, आपल्या जगण्यात आणि आपल्या मानसिकतेत बदल करण्याची गरज आहे. आपण मानवतावादी विचार मांडणाऱ्या प्रत्येक महापुरुषाला जवळ केले आणि त्याची प्रेरणा घेतली तर सगळ्यांच्याच हिताचं ठरतं. या चित्रपटाच्या निमित्ताने तरी आपल्या मनात असलेली संकुचित मनोवृत्ती आपल्याला दूर करता आली पाहिजे, असं वाटतं.

# दृष्टिक्षेपात शेतकरी आंदोलन

- **५ जून २०२०** – कृषी क्षेत्रातील सुधारणांसाठी अध्यादेश केंद्र सरकारकडून जारी.
- **१४ सप्टेंबर** – तीन कृषी कायद्यांचा वटहुकूम संसदेत सादर.
- **१७ सप्टेंबर** – लोकसभेत कृषी विधेयके मंजूर.
- **२० सप्टेंबर** – गदारोळात मतविभागणी न घेता ही विधेयके राज्यसभेत आवाजी मतदानाने मंजूर. विरोधकांचा सभात्याग. संसदेच्या आवारातील गांधी पुतळ्यानजीक रात्रभर आंदोलन.
- **२४ सप्टेंबर** – शेतकरी संघटनांचे पंजाब, हरियाणात रेल रोको.
- **२६ सप्टेंबर** – कृषी विधेयकांमुळे भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएमधून शिरोमणी अकाली दल बाहेर.
- **२७ सप्टेंबर** – कायद्यांवर राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी स्वाक्षरी केल्यामुळे नवे शेतीकायदे देशभरात लागू.
- **५ नोव्हेंबर** – शेतकरी संघटनांची चक्का जामची हाक व दिल्लीला वेढा घालण्याचा निर्णय.
- **२५ नोव्हेंबर** – शेतकऱ्यांचा 'दिल्ली चलो'चा नारा; कोरोनाच्या आपत्तीमुळे दिल्ली पोलिसांकडून शेतकऱ्यांना दिल्लीच्या हद्दीत प्रवेश करण्याला मनाई.
- **२६ नोव्हेंबर** – शेतकरी दिल्लीच्या वेशीपर्यंत येईपर्यंत त्यांच्यावर पंजाब-हरियाणात लाठीमार व कडाक्याच्या थंडीत पाण्याचे फवारे मारून अडवण्याचा प्रयत्न. दिल्लीत बुराडी मैदानावर आंदोलन करण्याचे आवाहन शेतकऱ्यांनी धुडकावले.
- **२८ नोव्हेंबर** – केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा शेतकरी संघटनांशी चर्चा करून प्रश्न सोडविण्यासाठी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न अपयशी. जंतरमंतरवरच आंदोलनाचा शेतकऱ्यांचा निर्धार.
- **१ डिसेंबर** – शेतकरी संघटनांचे नेते आणि केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्र तोमर यांच्यातील चर्चा अनिर्णित. कायदे रद्द करण्याची शेतकऱ्यांची मागणी.
- **३ डिसेंबर** – आठ तासांची मॅरेथॉन चर्चा निष्फळ.
- **८ डिसेंबर** – आंदोलक शेतकऱ्यांची भारत बंदची हाक.
- **९ डिसेंबर** – कायद्यांत दुरूस्ती करण्याचा केंद्राचा प्रस्ताव शेतकऱ्यांनी फेटाळला.
- **११ डिसेंबर** – आंदोलनात सहभागी न झालेल्या शेतकऱ्यांच्या गटाची शेती कायद्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव.
- **१३ डिसेंबर** – केंद्रीय मंत्री रविशंकर प्रसाद यांचा शेतकरी आंदोलनामागे तुकडे तुकडे गँगचा हात असल्याचा आरोप. चर्चेस तयार असल्याची हमी.
- **१६ डिसेंबर** – केंद्राने नवीन कृषी कायद्यांची अंमलबजावणी थांबविण्याची सर्वोच्च न्यायालयाची सूचना.
- **२१ डिसेंबर** – सिंधू, टिकरी, गाझीपूर सीमांवर शेतकऱ्यांचे साखळी उपोषण सुरू.
- **४ जानेवारी २०२१** – सात ते अकरा अशा पाचही चर्चेच्या फेऱ्या असफल.
- **१२ जानेवारी** – चार सदस्यांची समिती नेमून शेतकऱ्यांशी चर्चा करावी आणि दोन महिन्यांत अहवाल सादर करावा, असा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश. मात्र समितीसमोर जाण्यास शेतकरी संघटनांचा नकार. भूपिंदरसिंग शेतकरी संघटनेतून बाहेर.
- **२६ जानेवारी** – सिंधू व गाझीपूर सीमांवरील शेतकऱ्यांचे काही गट विनापरवानगी दिल्लीच्या हद्दीत घुसले. आंदोलनाला हिंसक वळण मिळाल्यानंतर पोलिसांनी अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडल्या. एका शेतकऱ्याचा मृत्यू.
- **२८ जानेवारी** – हिंसक घटनेनंतर शेतकरी आंदोलनावर दबाव वाढला. गाझीपूर सीमेवरूनन शेतकऱ्यांना हटवण्याचे उत्तर प्रदेश सरकारचे प्रयत्न सुरू. अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडल्या. गाझीपूर न सोडण्यावर शेतकरी नेते राकेश टिकैत ठाम. पश्चिम उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांना गाझीपूरला येण्याचे त्यांचे आवाहन.
- **५ फेब्रुवारी** – शेतकरी आंदोलनावर तयार केलेल्या 'टूल किट' प्रकरणी पर्यावरणप्रेमी ग्रेटा थनबर्ग विरोधात गुन्हा दाखल. दिशा रवी या तरूण कार्यकर्तीविरोधात देशद्रोह, कटकारस्थानाचा गुन्हा दाखल.
- **१४ फेब्रुवारी** – दिशा रवी हिला अटक.
- **१८ फेब्रुवारी** – संयुक्त किसान मोर्चाकडून देशव्यापी 'रेल रोको'ची हाक.
- **२७ मे** – आंदोलनाला सहा महिने झाल्यानिमित्त शेतकऱ्यांनी पाळला काळा दिवस.
- **२६ जून** – हरियाणा, पंजाब, कर्नाटक, उत्तराखंड, मध्य प्रदेश, राजस्थान, तेलंगणा या राज्यांमध्ये शेतकऱ्यांची आंदोलने, गुन्हे दाखल.
- **१९ जुलै** – संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला समांतर 'किसान संसद'चे आयोजन.
- **७ ऑगस्ट** – काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्यासह अन्य विरोधी पक्षनेत्यांचा जंतरमंतरवर प्रत्यक्ष भेटीत शेतकऱ्यांना पाठिंबा. कायदे मागे घेण्याची विरोधकांची मागणी.
- **२८ ऑगस्ट** – हरियाणात करनाल येथे शेतकऱ्यांच्या निदर्शनात पोलिसांचा लाठीमार. अनेक शेतकरी जखमी.
- **३ ऑक्टोबर** – लखिमपूर येथे केंद्रीय गृह राज्यमंत्री अजय मिश्रा यांच्या ताफ्यातील गाड्यांनी शेतकऱ्यांना चिरडले. चार शेतकऱ्यांचा मृत्यू. त्यानंतरच्या हिंसाचारात भाजपचे दोन कार्यकर्तेही ठार. सर्वोच्च न्यायालयाने निवृत्त न्यायाधीशांची समिती नेमली.
- **२२ ऑक्टोबर** – दिल्लीच्या सीमांवरून शेतकऱ्यांना हटवण्यासाठी नोएडातील रहिवासी मोनिका अगरवाल यांची सर्वोच्च न्यायालयात धाव. आंदोलन करण्याचा अधिकार असला तरी कायमस्वरूपी रस्ते अडवता येणार नाहीत. या न्यायालयाच्या आदेशानंतर गाझीपूर, टिकरी व सिंधू सीमांवरील अडथळे शेतकरी व पोलिसांनी काढून टाकले.
- **१९ नोव्हेंबर** – कृषी कायदे मागे घेत असल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घोषणा.

# नरेंद्र मोदी यांची कोलांटउडी

**कृषी कायद्यांसंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदींची माघार हा एक प्रकारे निश्चितच लोकशाहीचा विजय मानायला हवा. शेतकरी आंदोलनाचे अभूतपूर्व यश मानायला हवे. कायदे तसेच राहिले तर उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत भाजपला फटका बसू शकतो, असा गुप्तचर यंत्रणेचा अहवाल असल्यामुळे मोदी सरकारला कायदे मागे घ्यावे लागले. आता कोणत्याही परिस्थितीत उत्तर प्रदेश विधानसभेची निवडणूक जिंकणे हेच त्यांचे एकमेव लक्ष्य आहे. त्यासाठीच तर, उत्तर प्रदेश कसे आघाडीवरील राज्य आहे हे ते रोज भाषणे आणि वृत्तपत्रांतील पानभर जाहिरातीतून सांगत आहेत.**



विजय नाईक

केंद्राने घिसाडघाईने केलेल्या तीन कृषी कायद्यांविरूद्ध गेले वर्षभर चाललेल्या आंदोलनापुढे अखेर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना झुकावे लागले. राजकीय नेते जनतेपुढे लोटांगण घालतात अथवा जनतेच्या पुढेपुढे करू लागतात, ते दोन कारणांमुळे. जेव्हा निवडणुकीत अपयश येईल याची त्यांना खात्री पटते, अथवा दाट शंका येते व दुसरे म्हणजे, जनतेच्या तीव्र आंदोलनामुळे सरकारच्या प्रतिमेला जोरदार धक्का बसेल असे वाटते, तेव्हा. ‘‘कायदे तसेच राहिले, तर भाजपचा पूर्व व पश्चिम उत्तर प्रदेशात सफाया होईल,’’ अशी माहिती गुप्तचर संघटनांनी पंतप्रधानांकडे पाठविल्याने पंतप्रधानांनी माघार घेतली असे सांगितले जाते. हिमाचल प्रदेशातील विधानसभेच्या पोटनिवडणुकांत तेथे कोणताही विरोधी पक्ष सबळ नसताना भाजपचा पराभव होऊन काँग्रेसला जागा मिळाल्या, हाही एक संकेत होता.

येत्या वर्षभरात उत्तर प्रदेशसह पंजाब, गोवा, उत्तराखंड, मणिपूर या राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका व्हावयाच्या आहेत. त्यात भाजपला अपयश मिळण्याची शक्यता कमी. तथापि, काठावरचे बहुमत मिळाल्यास त्याचे परिणाम २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांवर होण्याची शक्यता टाळता येत नाही.

**विरोधकांच्या पाठिंब्याची गरज**

गेल्या वर्षी कृषिक्षेत्रात आमुलाग्र सुधारणा करण्याच्या उद्देशाने मोदी यांनी तीन विधेयके आणली. सप्टेंबर २०२० मध्ये ती लोकसभेत संमत झाली. राज्यसभेत कोणतीही चर्चा न होता विरोधी पक्षांच्या जोरदार विरोधात केवळ आवाजी मतदानाने ती संमत करण्यात आली. त्यापाठोपाठ २५ सप्टेंबर २०२१ रोजी अखिल भारतीय शेतकरी संघर्ष समन्वय समितीने दिलेल्या आवाहनामुळे सुरू झालेले शेतकरी आंदोलन, मोदी यांनी कायदे मागे घेण्याचे आश्वासन देऊनही थांबलेले नाही. यंदाच्या हिवाळी



अधिवेशनात जोवर ते रद्द केले जात नाही, तोवर शेतकऱ्यांचा विश्वास बसणार नाही. कारण, सरकार आपले इप्सित साध्य करण्यासाठी कुणाच्याही छातीवर बसण्यास कमी करीत नाही, असा आजवरचा अनुभव आहे. शेतमालासाठी लागणाऱ्या आधारभूत किमतींसाठी कायदा करावा, अशी शेतकऱ्यांची मागणी असून, शेतीला मिळणाऱ्या विजेच्या कायद्यातही त्यांना दुरूस्ती हवी आहे. त्यापासून ते तसूभरही मागे सरणार नाहीत, असे दिसते. एकीकडे सरकारने हिवाळी अधिवेशनाला सामोरे जाण्याची जय्यत तयारी केली आहे, तर दुसरीकडे विरोधकांनी निरनिराळ्या ज्वलंत प्रश्नांबाबत सरकारला धारेवर धरण्याचे ठरविले आहे. सत्तारूढ व विरोधक एकमेकांपासून इतके दूर गेले आहेत, की अधिवेशनाचे पहिले काही दिवस वाया जाणार यात शंका नाही. कृषिविषयक कायदे रद्द करण्यासाठी विरोधकांना सरकारला पाठिंबा द्यावा लागेल.

**वाटाघाटी निष्फळ**

गेल्या वर्षापासून दिल्लीतील शहीन बागमध्ये मुस्लिम महिलांचे व सिंघू सीमेवर शेतकऱ्यांचे, अशा दोन आंदोलनांनी राजकीय वातावरण ढवळून निघाले. मुस्लिम महिलांच्या आंदोलनाला पाकिस्तानचा व तेथील अतिरेक्यांचा, तर शेतकऱ्यांच्या आंदोलनाला खलिस्तानी, अतिरेकी यांचा पाठिंबा आहे, असा

जाहीर आरोप भाजपने केला. खुद्द मोदी यांनी शेतकऱ्यांचे आंदोलन ''आंदोलनजीवी' लोकांचे आंदोलन असून, ते केवळ काही राज्यांपुरते सीमित आहे,'' असे म्हटले. त्यांच्या वाक्याची भाजपच्या अनेक नेत्यांनी री ओढली. आंदोलन कसे विस्कळीत होईल, त्यात कशी फूट पाडता येईल, याचे कसून प्रयत्न केले. तथापि, सरकारची डाळ शिजली नाही. उलट, शांततामय आंदोलनाने जोर धरला. दरम्यान, केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंग तोमर यांनी शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत अनेकदा वाटाघाटी केल्या; परंतु त्या निष्फळ झाल्या. ''कायदे मागे घेतल्याशिवाय आंदोलन मागे घेतले जाणार नाही,'' या भूमिकेवर शेतकरी ठाम राहिले. त्यांनी सिंघू सीमेवर एक गाव उभे केले. सरकारने खंदक खणून, अनेक अडथळे निर्माण करून, पोलिसांचा लाठीमार होऊनही शेतकरी हलले नाहीत. आंदोलनाला अभूतपूर्व असे स्वरूप प्राप्त झाले. एकामागून एक भाजपचे नेते आंदोलनाला बदनाम करण्याचे प्रयत्न करीत होते. आंदोलकांना धाकदपटशा चालू होता. अखेर त्याची परिणती केंद्रीय गृहराज्यमंत्री अजय मिश्रा टेनी यांचा मुलगा आशिष मिश्रा याने लखीमपूर खेरी येथे शेतकऱ्यांच्या जमावावर गाडी घालण्यात झाली. त्यात चार शेतकऱ्यांचा, भाजपच्या कार्यकर्त्यांचा व एका पत्रकाराचा मृत्यू झाला. तत्पूर्वी, आंदोलनकाळात सुमारे सातशे शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. त्यातील अनेकांनी आत्महत्या केली.

हे सारे होत असताना मोदी द्रवले नाहीत. त्यांना पश्चाताप झाला नाही. कायदे कोणत्याही परिस्थितीत मागे घेतले जाणार नाहीत, अशी अनेक नेत्यांनी वारंवार घोषणा केली; परंतु ''कायदे अंबानी-अदानी व बड्या उद्योगपतींच्या लाभासाठी केले आहेत,'' हा शिक्का वा समजाचे मोदी शेवटपर्यंत निराकारण करू शकले नाहीत. कायदे निलंबित स्थितीत ठेवण्यात आले. मोदी यांनी आधीच ते मागे घेतले असते, तर सातशे शेतकऱ्यांचे प्राण वाचले असते. त्यांना शेतकऱ्यांची चिंता आहे, असे देशाला दिसले असते. त्यातून मोदी यांना रास्त पण निश्चित सहानुभूती मिळाली असती.

देर आए दुरूस्त आए, या म्हणीप्रमाणे त्यांनी १९ नोव्हेंबर रोजी सकाळीच अचानक दूरचित्रवाणीवर येऊन जाहीर घोषणा करीत देशवासियांची माफी मागितली. ''शर्थीच्या प्रयत्नांनंतरही कायद्यांचे काय लाभ आहेत, हे शेतकरी बंधूंना पटवून देण्यात आम्ही अपयशी ठरलो. आमची तपस्या कमी पडली. आधीच्या सरकारनेही तसे कायदे करण्याचा विचार केला होता. कायद्यांच्या संदर्भात आम्ही सर्व स्तरांवर सल्लामसलत केली. तज्ज्ञांचा सल्ला घेतला होता. अनेक शेतकरी त्याबाबत समाधानी होते. पण काही शेतकऱ्यांना आम्ही पटवून देऊ शकलो नाही,'' अशी कबुली त्यांनी दिली.

**काँग्रेस राजवटीत हरितक्रांती**

यापूर्वी काँग्रेसच्या काळात मोन्सँन्टो, पेप्सी, कोकाकोला, कारगिल कार्पोरेशन आदी कंपन्यानी शेतमाल विकत घेण्यासाठी पुढाकार घेतला होता. तेव्हा पंजाबमधील टोमॅटो पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना बराच लाभ झाला होता; परंतु बहुराष्ट्रीय कंपन्यांविरूद्ध देशात वातावरण तयार झाले. समाजवादी नेते जॉर्ज फर्नांडिस यांनी बी-बियाणांच्या क्षेत्रातील मोन्सँन्टो व कोकाकोला या कंपन्यांविरूद्ध देशव्यापी मोहीम उभारली. तसेच जेनेटिकली मॉडिफाईड पिकांची शेती करण्याचे धोरण सरकराने राबविण्याचा प्रयत्न केला, तेव्हा कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनी त्यास पाठिंबा दिला होता; परंतु जेव्हा भाज्यांमध्ये हे तंत्रज्ञान वापरण्याचा प्रयत्न झाला, तेव्हा मोठ्या प्रमाणावर त्यास शेतकऱ्यांचा पाठिंबा मिळाला नाही. तरीही अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमध्ये भारतीय शेतकऱ्याने अन्नधान्य, फळभाजांचे विक्रमी उत्पादन करून देशाला स्वावलंबी बनविले. हरितक्रांती झाली. आणंदने दुग्धक्रांती केली. याचे श्रेय बळीराजालाच आहे.

**अडत्या, एजन्टांची पुन्हा मक्तेदारी**

पंजाबमध्ये जशी पाण्याची मुबलकता आहे, शेकडो एकर जमीन असलेले श्रीमंत शेतकरी आहेत, तसे चित्र देशात इतरत्र दिसत नाही. गेल्या पन्नास वर्षात कुटुंबाकुटुंबातून शेतीचे वाटप (फ्रॅगमेन्टेशन) होत प्रत्येकाच्या वाट्याला काही गुंठे अथवा एकर जमीन आली. काही ठिकाणी तिचा आकार एवढा छोटा की ट्रॅक्टर उभे राहू शकणार नाही. शेतीवर सावट असते अवर्षणाचे, दुष्काळाचे व कधी कधी अतिवृष्टीचे. हवामान बदलामुळे हे आपण रोज अनुभवित आहोत. त्यामुळेच शेतकऱ्याला पिकांचे आधारभूत मूल्य हवे आहे. त्याचीच मागणी शेतकरी संघटना करीत आहे. त्यांना हमी हवी, ती कायद्याने निश्चित केलेल्या आधारभूत मूल्याची. त्यातही मेख अशी, की सरकारने ते जाहीर केले, तरी अन्नधान्य व पिकांची खरेदीही सरकारला करावी लागणार. कायदे रद्द केल्याने अडत्या, एजन्ट यांची

## संवैधानिक यंत्रणांपुढे आव्हान विश्वासार्हता टिकवण्याचे

विरोधक, विचारवंत, पत्रकार, राजकीय नेते, शिक्षणतज्ज्ञ, विद्यार्थी यांच्यावर आरोप करीत त्यांच्यावर कोणत्या न कोणत्या कायद्याखाली कारवाई करण्याचा, त्यांना धाकात ठेवण्याचा सपाटा सरकारने चालविला आहे. त्याला कुठे न कुठे आळा बसला पाहिजे. 'ही लोकशाही आहे, ठोकशाही नाही,' असे वारंवार न्यायालये आपल्या निकालपत्रातून सरकारला ध्वनित करीत आहेत. म्हणूनच निवडणूक आयोग, सीबीआय, एनफोर्समेन्ट डायरेक्टरेट, पोलीस व्यवस्थापन यांना आपली विश्वासार्हता व स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी व कोणत्याही राजकीय दबावाखाली न वाकण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील. तरच ते जनतेच्या विश्वासास पात्र ठरतील.

मक्तेदारी पुन्हा सुरू होईल. बाजार समित्या काम करू लागतील. शेतकरी पुन्हा सावकाराच्या जाळ्यात अडकणार नाही, याची खात्री सरकार कशी देणार? 'एकीकडे आड व दुसरीकडे विहीर' अशी ही स्थिती आहे. कायदे संमत झाले असते, तर मोठे उद्योगपती व बहुराष्ट्रीय कंपन्यांनी शेतीव्यवसायात प्रवेश केला असता. आज बिग बास्केट, रिलायन्स, डिमॅट, गोदरेज, बिगबाजार आदी कंपन्या शेतमालाची विक्री मोठ्या प्रमाणावर करीत आहेत. मोठ्या कंपन्यांबाबत आपण असे समजू या, की पहिली काही वर्षे शेतकऱ्यांना चांगल्या किमती देऊन माल खरेदी करतील. तथापि, हे धोरण ते कायमचे राबविणार काय? पडत्या किमतीने माल विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली, तर शेतकऱ्याच्या खिशात काय पडेल? ग्राहकाला किफायतशीर भावात जीवनावश्यक वस्तू मिळाल्या, तर तो अधिकाधिक खरेदी करू शकेल. त्यासाठी त्याची क्रयशक्ती वाढवावी लागेल. कोरोनाच्या गेल्या दोन वर्षात या परिस्थितीचा सामान्याला मोठा फटका बसलाय.

आणखी एक गोष्ट ध्यानात ठेवावी लागेल, की महाराष्ट्रासारख्या राज्यात ठिबक व तुषार पद्धतीने होणाऱ्या शेतीचा शेतकऱ्याला बराच लाभ झाला. नवनवे प्रयोग करून त्यानं फळाफुलांचं व धान्याचं विक्रमी उत्पादन केलं. हे चित्र उत्तर प्रदेश, बिहार व अन्य राज्यांत दिसत नाही. प्रश्न आहे तो, आधारभूत मूल्याबाबत सरकार कायदा करणार काय, वीज विधेयकात सुधारणा करणार की तो रद्द करणार. या दोन मुद्यांवर शेतकरी संघटनांची पुढची रणनीती ठरणार आहे.

**मोदींच्या आश्वासनांवर विश्वास ठेवावा?**

'द वायर' या संकेतस्थळाने २०२० मध्ये केलेल्या पाहाणीनुसार, ''स्वामिनाथन आयोगाने आपल्या अहवालात २०१ शिफारसी केल्या होत्या. त्यापैकी १७५ शिफारसी काँग्रेसच्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने लागू केल्या व केवळ २५ शिफारसी मोदी सरकारने लागू केल्या.'' त्यामुळे त्याचे श्रेय डॉ. मनमोहन सिंग यांच्याकडे जाते. मध्य प्रदेशात १८ डिसेंबर, २०२० रोजी मोदी यांनी जनतेची दिशाभूल करीत, 'काँग्रेस सरकारने आठ वर्षात एकही शिफारस लागू केली नाही,' असे सांगून टाकले. त्यामुळेच मोदींच्या आश्वासनावर किती विश्वास ठेवायचा, असा प्रश्न शेतकरी संघटनांपुढे आहे. याचे आणखी एक कारण म्हणजे, भाजपचे खासदार साक्षी महाराज यांनी मोदींच्या आश्वासनापाठोपाठ त्याला छेद देणारे केलेले वक्तव्य. साक्षी महाराज आगोचर वक्तव्ये करण्यात मशहूर आहेत, तसेच राजस्थानचे राज्यपाल कलराज मिश्रा. ते म्हणाले, ''या दोन्ही (उत्तर प्रदेश व पंजाब) राज्यांतील विधानसभेच्या निवडणुकांत भाजपला यश मिळाल्यास शेतीविषयक कायदे पुन्हा लागू करण्यात येतील.'' पंतप्रधानांनी या दोन्ही नेत्यांची कानउघाडणी केल्याचे आजवर कुठे छापून आलेले नाही.

## आंदोलनात फूट पाडण्याचे सरकारचे विफल प्रयत्न

आंदोलन विस्कळीत करण्याचे, त्यात फूट पाडण्याचे भाजप नेत्यांनी जोरदार प्रयत्न केले. मात्र, त्यात ते अपयशी ठरले. केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंग तोमर यांनी शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत अनेकदा वाटाघाटी केल्या; परंतु त्या निष्फळ ठरल्या. कायदे मागे घेतल्याशिवाय आंदोलन मागे घेतले जाणार नाही, या भूमिकेवर शेतकरी ठाम राहिले.

**लोकशाहीचा विजय**

मोदी यांची माघार हा एक प्रकारे निश्चितच लोकशाहीचा विजय मानायला हवा. शेतकरी आंदोलनाचे अभूतपूर्व यश मानायला हवे. मोदी यांचे आता एकमेव लक्ष्य आहे, ते उत्तर प्रदेशातील विधानसभेच्या निवडणुका कोणत्याही परिस्थितीत जिंकण्याचे. उत्तर प्रदेश कसे आघाडीवरील राज्य आहे, हे त्यांच्यातर्फे रोज भाषणे व पानभर जाहिरातीतून सांगितले जात आहे. त्याच दृष्टीने मोदी यांनी १७ नोव्हेंबर रोजी ३४१ कि.मी लांबीच्या पूर्वांचल एक्सप्रेस मार्गाचे वाजतगाजत उद्घाटन केले. त्यावर मिराज, जग्वार, एन-३२ आदी लढाऊ विमानांचे संचलन केले. वेळ आल्यास ही विमाने महामार्गावर उतरू शकतील, अशी व्यवस्था करण्यात आली. उत्तर प्रदेश सरकारने बसेस भरभरून जनतेला आणले. त्यांच्यापुढे विरोधकांना फैलावर घेणारे व निवडणुकीचे रणशिंग फुंकणारे आणखी एक भाषण मोदी यांनी ठोकले. पाठोपाठ २५ नोव्हेंबरला दिल्लीनजिक उत्तर प्रदेशातील (नोएडा) जेवार येथे आंतरराष्ट्रीय विमानतळाची कोनशिला बसवली. जाहिरातीनुसार, हे जगातील चौथ्या क्रमांकाचे मोठे व आशियातील सर्वात मोठे विमानतळ असणार आहे.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या कारकीर्दीत उत्तर प्रदेशाची किती वेगाने प्रगती झाली, हे त्यांना देशाला व उत्तर प्रदेशातील मतदारांना पटवून द्यावयाचे आहे. त्यात काही प्रमाणात ते बाजी मारणार. २०२४ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांच्या आधी ते बांधून पूर्ण होईल, असे जाहिरातीत म्हटले आहे. शिवाय अयोध्येच्या राम मंदिराच्या उभारणीचे लक्ष्यही आहे.

**शेतकरी संघटनांनी मोदींना बजावले**

शेतकरी आंदोलनातील माघारीबरोबरच आणखी एक चपराक सरकारला बसली, ती राष्ट्रीय नार्कोटिक ब्यूरोने दाखल केलेल्या अभिनेता शाहरूख खान याचा मुलगा आर्यन खान यांच्या खटल्यात. नशिल्या पदार्थाचे सेवन व व्यापाराच्या आरोपाखाली केलेल्या अटकेची व ब्यूरोचे अधिकारी समीर वानखेडे यांनी केलेल्या कारवाईची देशभर चर्चा झाली. सारे बॉलिवुड नशिल्या पदार्थांचे सेवन, व्यापार व मनी लाँडरिंगमध्ये बुडाले आहे, असे वातावरण **(उर्वरित पान २९ वर)**

# धर्मसत्ता विरुद्ध ज्ञानसत्ता





बी.जी. वाघ

**धर्म अपरिवर्तनीय आहे, या श्रद्धेमुळे धर्माचा विकास झाला नाही. विज्ञान मात्र सातत्याने बदलत गेले आहे. प्रत्येक सत्याला विज्ञानाने आव्हान दिले आहे आणि त्यातूनच नव्या सत्याची प्रस्थापना झाली आहे. धर्मदेखील सत्य आणि ज्ञान याविषयी चर्चा करीत असतात; परंतु ते ज्ञान म्हणजे ईश्वराकडे जाण्याचा मार्ग सांगितला जातो. अंतिम सत्य म्हणजे ईश्वरच आहे, असा त्यांचा हट्ट असतो.**

## धर्म एक चक्रव्यूह

धर्मसत्ता म्हणजे धार्मिक प्रतिमा, मिथ्स, परंपरा, धर्मग्रंथ, इतिहास आणि संस्कार यांद्वारे सामान्य माणसांच्या अंतर्बाह्य वर्तणुकीचे नियंत्रण करणे होय. त्यासाठी राजकीय सत्ता हाती असण्याची आवश्यकता असेलच असे नाही. सांस्कृतिक व धार्मिक दहशत मात्र असावीच लागते. ती बहुसंख्याकवादातून येते. भारतात अल्पसंख्याक ब्राह्मणांनी बहुसंख्याक हिंदूंना आपले गुलाम करून ठेवले, त्याचे स्पष्टीकरण मात्र देता येत नाही. अल्पसंख्याक यहुद्यांचीदेखील अशीच दहशत ख्रिश्चनांना होती. याचे कारण मूळ यहुदी धर्मातूनच पुढे ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्म विकसित झाले आहेत. घट्ट, कट्टर धार्मिक मानसिकता हेच धर्मसत्तेचे कारण असते. यांचा इतिहास अर्थातच फारसा सुखावह नाही.

धर्माचा संबंध ईश्वराशी जोडला गेल्यामुळे माणसे धार्मिक अत्याचारही निमूटपणे सहन करतात. अन्यथा नरकात जाण्याची भीती असते. लोक धर्मगुरूला, धर्माला आणि देवाला घाबरतात. हे भयच धर्मसत्तेच्या मुळाशी असते. धर्मनिंदेचे कायदे व त्यांची कठोर अंमलबजावणी या भयाचे बाह्यरूप असते. माणसाने देवाविरुद्ध काहीतरी पाप (Original sin) केले आहे. त्यामुळे दुःख भोगणे आवश्यकच आहे, अशी यहुदी धर्मीयांची श्रद्धा आहे. त्यामुळे धार्मिक पद्धतीने स्वतःचा छळ करून घेणे त्यांना धर्मसंमत वाटते. त्याशिवाय ईश्वर संतुष्ट होणार नाही, तसेच पापाची भरपाई होणार नाही. ॲडम आणि ईव्ह यांनी जे पाप केले, निषिद्ध फळ खाल्ले, त्यामुळे त्यांचे स्वर्गातून पतन झाले. या धर्मश्रद्धेला यहुदी ख्रिश्चन आणि मुस्लीम धर्मीयांची मान्यता आहे. हॉब्ज म्हणतो त्याप्रमाणेच ते आहे. ज्या श्रद्धांना समाजाने मान्यता दिलेली असते, तिला आपण 'धर्म' म्हणतो. अन्यथा ती अंधश्रद्धाच असते. ज्ञानामुळेच किंवा प्रश्न विचारण्याच्या माणसाच्या क्षमतेमुळेच माणूस दुःखी असतो, अशी एक विचारधारा आहे. त्यामुळे तो निसर्गापासून तुटतो आणि इतर प्राणी ज्या सहजतेने जगतात, त्या पद्धतीने तो जगू शकत नाही. तो स्वतःत आणि बाह्य जगातही सतत बदल करू इच्छितो. त्यामुळे तो कायम असंतुष्ट असतो. असणे आणि होणे यातील तो संघर्ष असतो. ईश्वराच्या आदेशाविरुद्ध आपण वागतो म्हणून स्वतःचा छळ करून घेण्यातही वेगळा आनंद असतो. तो कधी सामूहिक पद्धतीनेही व्यक्त होतो. धर्मसत्ता या पद्धतीचा नेहमीच अवलंब करीत असतात.

### धर्माचा राजकारणासाठी वापर

कधी काळी स्वर्गात जाण्यासाठीही चर्च पास देत असे व त्यासाठी मोठी किंमत मोजावी लागत असे. माणसाचे हे अज्ञान धर्मसत्तेचे बलस्थान आहे. जे काही करायचे ते ईश्वरासाठी किंवा धर्मासाठी, ही भूमिका मुळात नैतिक (Moral) किंवा बौद्धिक (Rational) आहे का, हा मूलभूत प्रश्न आहे. तो बर्ट्रांड रसेलने तत्कालीन धर्मव्यवस्थेला विचारलेला आहे. हिंदू धर्मासारखे काही धर्म अत्यंत विषारी अशा जातीयतीने बरबटलेले आहेत. एकविसाव्या शतकातही हिंदू मानसिकता म्हणावी तशी बदललेली नाही, याचे कारण धर्माचा राजकारणासाठी होत असलेला वापर. आमचा धर्म श्रेष्ठ आहे आणि त्यावर टीका करण्याचा कोणाला अधिकार नाही, ही मानसिकता

बहुसंख्याकवादातून पुढे राजकीय फायदा घेण्यासाठी जाणीवपूर्वक तयार केलेली असते. मनुस्मृतीतील धर्माज्ञा निव्वळ माणसांविरुद्ध नाहीत, तर मानवतेविरुद्धही आहेत. त्या निव्वळ अनैतिक आहेत. ते एक बौद्धिक षड्यंत्रही आहे; परंतु अजूनही हिंदू धर्माने तिचा निषेध केलेला नाही व ज्यांच्यावर अनन्वित अत्याचार केले, त्यांची माफी मागितलेली नाही. उलट मनुस्मृतीचे समर्थक सत्तेवरही आले आहेत. त्याची कारणे परंपरागत हिंदू मानसिकतेत आहेत. धार्मिक छळांना, अत्याचारांना धर्म प्रणित, ईश्वर प्रणित म्हणणे म्हणजे ईश्वराचा व तथाकथित धर्माचाही अपमान आहे. धर्माच्या नावाने ते वंशवादी, जिहादी कृत्य आहे. इस्लामप्रणित जिहादपेक्षा हा अधिक अमानवी आहे. तो सद्भावना, मूलभूत मानवी अधिकार आणि मानवी मूल्यांना पायदळी तुडवणारा आहे. इस्लाम किंवा इतर कोणत्याही धर्मात जन्मजात विषमता नाही आणि ती टिकवण्यासाठी कपोलकल्पित धर्मग्रंथही निर्माण करण्यात आलेले नाहीत; परंतु इतर धर्मही समतावादी आहेत, असे नाही. मुख्य प्रश्न धर्मसत्तेचा आहे आणि तिला धार्मिक म्हणायचे का, हा आहे.

**धर्मसत्तेचा इतिहासच दुःखदायक**

धर्मसत्तेचा इतिहास हा कायम दुःखदायक व गुन्हेगारी स्वरूपाचा राहिलेला आहे. कारण ती माणसाची विवेकशक्तीच नष्ट करून टाकते. जे अनैतिक आहे त्याला ते धार्मिक म्हणतात. त्यामुळे लोक धार्मिक अत्याचारही निमूटपणे सहन करतात. या धर्मसत्तांनी विज्ञान व भौतिक प्रगतीला रोखून धरले; परंतु मानवजातीसाठी त्यांचा सगळ्यात मोठा अपराध म्हणजे मानवी संबंधांत त्यांनी पेरलेले विष, त्यातून आलेला धार्मिक द्वेष, कट्टरता आणि मानसिक दास्य. माणसांना सद्गुणी करणे म्हणजे त्यांची विवेकशक्ती हिरावून घेणे नव्हे; परंतु धर्मसत्ता माणसाला–विशेषत: स्त्रियांना नको तितके सद्गुणी करण्याचा प्रयत्न करतात; परंतु एका मानसिक गुलामगिरीचे, शोषणाचेच ते नाव असते. मॅथ्यू अर्नाल्डने त्याचे वर्णन "A power not ourselves that makes for righteousness' असे केले आहे; परंतु ते एका मानसिक गुलामगिरीचे व शोषणाचे नाव असते. इतिहासात काही चांगले धार्मिक राजे होऊन गेले नाहीत असे नाही. केमाल पाशाने इस्लामला आधुनिक रूप देण्याचा प्रयत्न केला. भारतातही पारंपरिक इस्लाम धर्म अकबराने मानला नाही. त्याने 'दीनेइलाही' नावाचा एक वेगळा पंथ स्थापन केला. तो खऱ्या अर्थाने सेक्युलर होता. धर्मालाही धर्मातीत स्वरूप देणे ही एक क्रांतीच असते; परंतु धर्माच्या मार्गाने सत्तेवर येणाऱ्या लोकांमध्ये ते धाडस नसते. धर्माचा वापर सत्तेसाठी करणे अधिक सोयीचे असते. धर्म आणि सत्ताकारण परस्परांपासून अलग केले पाहिजे, हा फार अलीकडचा विचार आहे. मानवजातीला तो अजूनही पचनी पडलेला नाही.

कुठलीही राजसत्ता एका पिढीवर राज्य करते; परंतु धर्मसत्ता अनेक पिढ्यांवर राज्य करू शकते. त्याचे मुख्य कारण धर्मसत्तेने लादलेली विवेकहीन मानसिक गुलामगिरीच. माणूस मनाने गुलाम झाल्यावरच त्याच्यावर राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अतिक्रमण करता येते. ही गुलामगिरी घट्ट संस्कारपद्धतीतून, कर्मठतेतून व परंपरागत



मानसिकतेतून येते. आपण धार्मिक आहोत म्हणूनच पवित्र आहोत, असे म्हणून इतरांना अपवित्र ठरवून तुच्छ लेखणे हा खेळ तथाकथित धार्मिक मंडळी अभिनिवेशाने खेळत असतात. ज्यूंनी स्वतःला कायम पवित्र मानले आणि इतरांशी संबंध नाकारले. हेच काम तथाकथित उच्च जातींनी केले. यातूनच धार्मिक असहिष्णुता, परधर्माविषयी द्वेष आणि कनिष्ठ जातींविषयी क्रूरता जन्मते; परंतु आपण उच्च का आहोत, हे त्यांना कधीही सिद्ध करता आले नाही. धार्मिक विषमतेचे मूळ या तथाकथित उच्चनीचतेतच आहे. एक हिंदू धर्म (ब्राह्मणी धर्म) सोडला तर अशा जन्मजात विषमतेला धार्मिक आधार नाही. इतर धर्मांतील विषमता काही ऐतिहासिक कारणांवरून निर्माण झाली आहे. उदाहरणार्थ, शिया–सुन्नी भेद. त्यांना धार्मिक ग्रंथांची मान्यता नाही. काही ठिकाणी ईश्वराच्या स्वरूपाविषयी मतभेद निर्माण झाले व ते पराकोटीला गेले. त्यामुळे धार्मिक संघर्ष होऊन हत्या झाल्या, याचे कारण फक्त धार्मिक अज्ञानच होय.

**सर्व सत्ता अतिरेकी असतात**

सत्तेचे थॉमस पेनने तीन प्रकारांत वर्गीकरण केले आहे. पहिली म्हणजे अंधश्रद्धा (ड्ढह्यशळीं लीरषीं). दुसरी म्हणजे सत्ता, तिसरी म्हणजे परस्पर हितसंबंधांतील राजकीय संघर्ष व समन्वयातून निर्माण झालेली सत्ता. पहिली सत्ता म्हणजे पुरोहितांची सत्ता. दुसरी विजेत्यांची. तिसरी विवेकातून आलेली. धर्मसत्ता मुळातच अंधश्रद्धेतून आलेली असते, असे थॉमस पेनचे मत आहे. थॉमस पेनने फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी राजाला गुलोटिनखाली घालून मारण्यास विरोध केला होता. त्यामुळे क्रांतीचे नेते त्याच्यावर नाराज झाले होते. यावरून तो कट्टर मानवतावादी होता, हे लक्षात येते. अमेरिकन राज्यक्रांतीच्या समर्थनार्थ त्याने 'कन्सेंट' (Consent) हे पुस्तक लिहिले होते. त्यामुळे क्रांतीला सुरुवात झाली. सर्व सत्ता अतिरेकी असतात आणि भ्रष्टही असतात; परंतु धर्मसत्ता ही अधिक क्रूर आणि निर्दयी असते. कारण ती लोकांची हत्या धार्मिक अभिनिवेशाने एक पवित्र कर्तव्य म्हणून करीत असते. वास्तविक, ईश्वरप्रणित धार्मिक व्यवस्था अधिक आनंददायी असायला हवी; परंतु ती अधिक दुःखदायी असते, याचे कारण माणसांच्या हक्कांना आलेले गौणत्व व धार्मिक, बौद्धिक, नैतिक स्वातंत्र्याचे झालेले अपहरण. सर्व धार्मिक समस्यांचे मूळ सामाजिक व धार्मिक प्रश्नांकडे चुकीच्या पद्धतीने पाहणे, धर्मग्रंथांचा चुकीचा अर्थ लावणे व प्रस्थापितांशी हितसंबंध सांभाळणे हे आहे. धार्मिक संघर्षाची कारणे सगळीकडे सारखीच असतात. खोटी मूल्ये, प्रतिमा व प्रतीकांना आलेले नको तितके

महत्त्व, खोटी धार्मिक अस्मिता, सामाजिक, धार्मिक पूर्वद्वेष व पूर्वग्रह हीच ती कारणे आहेत. 'धर्म माणसांसाठी आहे, माणूस धर्मासाठी नाही', हे बुद्धाने फार पूर्वीच सांगितले होते. धर्म साधन आहे, साध्य नाही. पुढे इमॅन्युअल कांटने बुद्धाची भूमिका मांडत म्हटले आहे की, 'माणूस हे साध्य आहे, साधन नव्हे; परंतु धर्मसत्तेने माणसाला साधन मानले ते केवळ सत्तेसाठी. त्याला मूळ धर्म व धर्मसंस्थापक यांना जबाबदार धरता येणार नाही.' विश्वबंधुत्व हा खऱ्या धर्माचा पाया असतो. तो संकुचित करण्याचे काम धर्ममार्तंड करीत असतात.

**...तर धर्माधारित सत्ता नष्ट होईल**

धर्माने माणसांना जोडले कमी आणि तोडले जास्त, याचे कारण धर्म एक सत्ताच आहे. सत्ता विभाजनवादी असते. माणसातल्या विविधतेला ती अनुमती देत नाही. 'आमचे ऐका नाहीतर मरायला तयार राहा', हीच प्राचीन धर्मांची, त्यांच्या तथाकथित प्रेषितांची भाषा राहिली आहे. आमच्या देवांना माना, आमच्या धर्मग्रंथांना माना, कारण अंतिमतः तेच शाश्वत, पवित्र आणि परमेश्वराच्या जवळचे आहे. प्रत्येक धर्माची हीच भूमिका असल्यामुळे आणि त्यात तडजोडीला वावच नसल्यामुळे प्रत्येकाला शक्तिप्रदर्शन करावेसे वाटते. ही भूमिका शेवटी राजकीय असते. ती धार्मिक राहत नाही. धर्म राजकारणापासून मुक्त ठेवायचा असेल तर सखोल सहिष्णुता आणि बंधुभाव यांची कास धरावी लागेल; परंतु तसे केले तर धर्माधारित सत्ता नष्ट होईल व तसे सत्ताधारी वर्ग कधीही करणार नाही. धार्मिक विद्वेषातूनच धार्मिक सत्ता जन्मतात, हे त्यांना माहीत असते. धार्मिक ध्रुवीकरणासाठी धार्मिक दंगली घडवून आणणे हा सत्तेकडे जाण्याचा खात्रीचा मार्ग असतो. भारत हा तसा सहिष्णू देश. तो अधिक असहिष्णू, कट्टर कसा होईल, हे सध्याचे राजकारणी काळजीपूर्वक ठरवत असतात. त्याचा परिणाम राजकीय यशात होतो, हे त्यांना अनुभवाने माहीत असते. माणसाच्या मनातील मृत्यूविषयीचे भय व मृत्यूनंतरचे जग या कल्पनांतूनच धर्माची निर्मिती झाली आहे. हे भय वाढवत नेणे हा धार्मिक तत्त्वज्ञानाचा मुख्य विषय असतो. या भयातून विज्ञान माणसाला मुक्त करीत नाही म्हणून तो धर्माकडे वळतो. माणसाची श्रद्धा आणि विवेकात त्यामुळेच संघर्ष असतो. पुढे त्याचे रूप विज्ञान विरुद्ध धर्म असे झाले आहे. धर्माची भाषा गूढ असते. विज्ञानात कुठलीही गूढता चालत नाही. उलट धार्मिक आज्ञांचा, गृहीतकांचा ते उच्छेद करीत जाते. धर्म अपरिवर्तनीय आहे, या श्रद्धेमुळे धर्माचा विकास झाला नाही. विज्ञान मात्र सातत्याने बदलत गेले आहे. प्रत्येक सत्याला विज्ञानाने आव्हान दिले आहे आणि त्यातूनच नव्या सत्याची प्रस्थापना झाली आहे. धर्मदेखील सत्य आणि ज्ञान याविषयी चर्चा करीत असतात; परंतु ते ज्ञान म्हणजे ईश्वराकडे जाण्याचा मार्ग सांगितला जातो. अंतिम सत्य म्हणजे ईश्वरच आहे, असा त्यांचा हट्ट असतो. याला अर्थातच बौद्ध, ताओ, झेन अशा विचारधारा अपवाद आहेत.

**बुद्धांना ज्ञानसत्ताच अभिप्रेत**

बुद्धाची ज्ञानकल्पना म्हणजे माणसाच्या नैतिक विकासाची सर्वोच्च अवस्था. चार आर्यसत्यांपलीकडेही बुद्ध काही सांगू पाहतात; परंतु त्यांनी ते स्पष्ट केलेले नाही. परंतु त्यांना धर्मसत्तेऐवजी ज्ञानसत्ताच अभिप्रेत होती. बुद्धाने सांगितले होते, की 'मी मूठभर सत्ये तुम्हाला सांगितली आहेत. बाहेर सत्याच्या अनंत राशी पडल्या आहेत. त्या शोधा आणि जगासाठी उधळून द्या.' ही भूमिका ज्ञानसत्तेची आहे? सत्य एक गतिमान संकल्पना आहे आणि ज्ञानदेखील दृश्य आणि द्रष्टा बदलणारे असते. तसेच ज्ञान व ज्ञाता (Knower) हेदेखील बदलणारे असतात. जगात चिरंतन आहे तो निसर्गाचा धर्म. निसर्गचिंतनातूनच धर्म आणि विज्ञान जन्मले आहेत. विज्ञान निसर्गातील कार्यकारणसंबंधांचा शोध घेते. धर्म निसर्गाच्या वर एक उच्च दर्जाची व्यवस्था (High order of Nature) आहे व तिचा कर्ता ईश्वर किंवा तत्सम अलौकिक शक्ती आहे, असे मानले जाते. त्यामुळे धार्मिक ज्ञान कधीही वैज्ञानिक असत नाही. विज्ञान खऱ्या अर्थाने धार्मिकच असते. कारण ते माणसा-माणसांमध्ये भेद निर्माण करीत नाही. ते सत्यासाठी आग्रही असते; परंतु कुठलेही सत्य ते अंतिम मानत नाही. माणसाला धर्माची आवश्यकता का भासते, हा मूलभूत प्रश्न आहे आणि त्याचे समाधानकारक उत्तर कोणालाही देता येत नाही. विज्ञान त्याच्या विकासाच्या अत्युच्च अवस्थेवर आहे. विज्ञान एक सत्ता आहेच; परंतु धर्माचीही सत्ता आहे. धर्माच्या नावाने लक्षावधी लोक एकत्र येतात. कुठली तरी जुनीपुराणी मशीद पाडतात. जेथे कधी काळी त्यांच्या देवाचा जन्म झाला होता, असे ते म्हणतात. त्याला ते श्रद्धा म्हणतात आणि श्रद्धा विज्ञानाच्या, कायद्याच्या वर असते, असा त्यांचा दावा असतो. एवढेच नव्हे, तर ते लोकशाहीचा बळी देण्यासही कमी करीत नाहीत. हा संघर्ष आता समजून घेतला पाहिजे. श्रद्धा हेच धर्माचे शेवटचे शस्त्र आहे. त्यापुढे कुठलाही वादविवाद टिकत नाही. •••

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत)**



## द्वेष अन् धर्मांधतेतून राजवटींचा जन्म

सर्व प्रकारच्या बुद्धिवादाला फॅसिझम विरोध करतो. लेखक, कवी, कलावंत, शास्त्रज्ञ, विचारवंत यांचा छळ या राजवटी करीत असतात. बुद्धिजीवींचे शिरकाण हिटलरने घडवून आणले. जो त्यांच्या धार्मिक, वांशिक व सांस्कृतिक अजेंड्याला विरोध करतो, तो तत्काळ देशद्रोही ठरतो. या भयावह राजवटी सामान्य माणसांच्या बेजबाबदार धार्मिक द्वेषातून, आंधळ्या धर्मांधतेतून आणि धार्मिक राष्ट्रवादातून जन्माला येतात. भारतात अशा धर्मसत्ता होत्या. त्यांचा इतिहास खूप भयावह आहे.



# फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचे शिष्य : शंकरराव खरात

**''म्हारांनी मराठ्यांची विहीर खंदावी मात्र तिला पाणी लागल्यावर त्याला त्यातील ओंजळभर पाणी मिळू नये. महार गवंड्यांनी गावातलं मराठ्यांचं घर-वाडा बांधावा आणि वास्तुशांती, घरभरणी झाल्यावर मात्र त्याच घरात जायला महारास्नी बंदी! म्हार गड्यानं देवांची देवळं बांधली. कुठं कुठं आतल्या मूर्तीही घडवल्या. आतली देवाची मूर्ती बसवेपर्यंत तिथं म्हार गवंड्याची हजेरी. एकदा का देवळात देव बसला, त्याची पूजा झाली का म्हारांना देऊळ बंद, देवाचं दार बंद, देवळाच्या पायरीजवळच म्हाराचं स्थान असा कल्लेश्वराच्या पायरीखाली बसून लाकूडफोड्या रामा महार तराळाचा पोरगा 'तराळापासून-अंतराळा'पर्यंत कसा गेला?''**



प्रा. नितीश पांडुरंग सावंत

'अस्पृश्यता' ही भारतीय हिंदू समाजाला शतकानुशतके लागलेली कीड आहे. अस्पृश्यतेच्या गुलामगिरीमुळे अस्पृश्यवर्ग सामाजिकदृष्ट्या हीन, आर्थिकदृष्ट्या दरिद्री, राजकीयदृष्ट्या वरिष्ठांचा सेवक, चाकर बनला होता. शिक्षण संस्कृतीपासून कायमचा दूर फेकला गेला होता. अस्पृश्यांची ही भयानक आणि हृदयद्रावक अवस्था पाहून त्यांना अस्पृश्यतेच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी व त्यांची प्रगती करण्यासाठी महात्मा गांधी, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कर्मवीर भाऊराव पाटील यांनी भगीरथ प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विचारप्रणालीने व प्रत्यक्ष कार्याने अस्पृश्य वर्गात स्वाभिमान, महत्त्वाकांक्षा व जागृती निर्माण केली. या तीन समाजसुधारक, विचारवंतांपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कर्मवीर भाऊराव पाटील या दोन विचारवंतांचाही प्रत्यक्ष सहवास ज्येष्ठ दलित साहित्यिक शंकरराव खरात यांना लाभलेला आहे.

शंकरराव खरात यांचा जन्म ११ जुलै १९२१ साली आटपाडीसारख्या खेडेगावात झाला. शंकरराव खरात यांच्या जन्मापूर्वी म्हणजे तीस वर्षे अगोदर, अर्थात १४ एप्रिल १८९१ रोजी भीमराव आंबेडकर यांचा जन्म झाला. या काळातील महाराष्ट्राची पार्श्वभूमी विचारात घेता समाजामध्ये मनुवादी संस्कृतीचा पगडा असलेला दिसून येतो. छत्रपती शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर संस्थानात सुमारे शंभर वर्षांपूर्वी 'ऐतिहासिक माणगाव परिषद' घेण्यात आली. या परिषदेचे अध्यक्ष आप्पासाहेब दादगौंडा पाटील (जैन), तर स्वागताध्यक्ष दादासाहेब राजेसाहेब इनामदार होते. हा संदर्भ येथे देण्याचा हेतू एवढाच, की शंकरराव खरात हे जन्माला येण्यापूर्वी म्हणजे एक वर्ष अगोदर कोल्हापूर संस्थानात फार मोठी क्रांती झाली होती. ऐतिहासिक परिषद ज्यावेळी माणगांवात भरली होती, त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वय २९ वर्षे होते. तर या परिषदेला हजर असणाऱ्या अनेक महत्त्वाच्या व्यक्तींपैकी एक म्हणजे सत्यशोधक चळवळीमध्ये स्वत:ला झोकून देणारे सरसुभेदार भास्करराव जाधव. त्यावेळी त्यांचे वय अवघे २४ वर्षांचे होते. ज्या युनियन पब्लिक वसतिगृहामध्ये शंकरराव खरात शिकले, ते वसतिगृह स्थापन करणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटलांचे वय अवघे ३३ वर्षांचे होते. सत्यशोधक चळवळीमध्ये काम करणारे केशवराव विचारे यांचे वय ३१ वर्षांचे होते. माणगांव परिषदेचे सर्वेसर्वा शाहू महाराजांचे वय ४६ वर्षांचे होते. याचदरम्यान कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९१९ साली कराड 'काले' येथे ४ ऑक्टोबर १९१९ रोजी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. या सगळ्या घटना लेखक शंकरराव खरात यांच्या जन्माअगोदरच्या. हे सर्व सांगण्याचे कारण म्हणजे, हे सर्व तिशी-विशीतले तरूण 'जात' ही गोष्ट किती महाभयंकर असते, हे अनुभवत होते. त्यासाठी या समाजसुधारकांनी ती नष्ट करण्यासाठी किती प्रयत्न केले याचीही जाणीव आपल्याला होते.

### शाळेत जाण्याआधीच जात कळली

शंकरराव खरात हा लाकडंफोड्या रामा महाराचा पोरगा. भागित्रा, पवित्रा, शेवंता या बहिणी तर द्यानू, मारुती हे भाऊ.

शंकरराव लहानपणी बाबाबरोबर गावात लग्नाला जातो. लग्न मोठ्या घरचं असतं... या लग्नात गावकऱ्यांची पंगत पडल्यावर उरलेल्या पत्रावळ्यावरचे उष्टे-खरकटे लाडू खाऊन डालपाटी उचलणारा. गावच्या रेडंजत्रेत पोतराज, बत्तीसगावचे महार बघणारा. गावकीचा महार म्हणून तमाशाला सोडा म्हणून विनवण्या करणारा, लवंगी शेळीला घेऊन रानावनात व्होला आणि चित्तूर पक्षी भाजून खाणारा शंकर हळूहळू पडीक जमिनीत एखादं चंदनाचं झाड वाढावं तसं वाढत होता. अचानक एक दिवस त्याला आपल्या घरासमोर सरकारी लोकं रामोशी, महार दिसले. त्याला शाळेत नेण्यासाठी ते आलेले असतात. पण या सगळ्यांच्या हातावर तुरी देऊन चुलत्याच्या घरी भाताच्या कणगुल्यात तो लपतो. रामोशी, महार आत येऊन भाताच्या कणगुल्यातून काढून त्याला ओढत ओढत शाळेत नेतात. दारात आलेल्यांपैकी बामण मास्तर आणि पाटील यांनी आपल्या अंगाला हात लावला नाही. कारण आपण महार म्हणून. शाळेत पाय ठेवण्याअगोदरच जात पाठी लागलेली. कल्लेश्वराच्या देवळात पहिलीची शाळा. देवळाच्या खाली पायरीवर बसून उन्हाचे चटके सोसत मातीत बसून दिवस काढले. बामणाच्या मुलांच्या रांगेत बसल्यावर बंडोपंत मास्तरांनी 'हाग्या-दम' भरला, 'ही शाळा आहे, म्हारूडा नव्हं'? जातीमुळं देवळातला देव पाहिला नाही. शाळेच्या सुरुवातीलाच जात चिकटली ती कायमचीच.

**'जनता' गावी यायचा**

पावसाळ्याच्या दिवसांत म्हारामांगाच्या मुलांना सुट्टी असायची. कारण अस्पृश्यांना देवळात घेणं व्यवस्थेला मान्य नव्हतं. धोंडोपंत कुलकर्णी मास्तरांच्या हातात ब्राह्मणांच्या मुलांना मारण्यासाठी वेताची छडी, तर म्हारामांगाच्या मुलांना मारण्यासाठी करंजाची फोक असायची. या कुलकर्णी मास्तराच्या घरी जळणंकाटकं आणि सारवण्यासाठी शेण आणून दिल्यानं या मास्तराबद्दलची भीती मनातून हळूहळू कमी झाली. बिड्यांचे तुकडे वाण्याच्या दुकानासमोरून गोळा करून ओढायची सवय याच काळातली. वडील रामा महार यांच्याकडे तीन गावचं महार वतन. आटपाडी, कामत, बोंबेवाडी. तराळाकडे 'येसकराची काठी' पाडव्याच्या मुहूर्तावर येते, तशी ती आलेली. तीन गावचं महार वतन सांभाळताना जीव मेटाकुटीला यायचा. 'गावकीचं काम म्हणजे महाराच्या गळ्याला कायमचा फास'. गावकी-तराळकी करताना सरकारी वसुली तालुक्याच्या गावी ट्रेझरीमध्ये देणे, गावकऱ्यांना चावडीवर बोलावणे, लोकांना अपघाताची बातमी देणे, तालुक्याला पायी चालत जाऊन टपाल देणे, जन्ममृत्यूची खबर देणे, पारधी-कैकाड्यांची इत्यंभूत माहिती देणे या सगळ्याच गोष्टींचा परिणाम शंकरराव खरातांच्या बालमनावर झालेला दिसतो. मराठी चौथीपर्यंत 'मढ्यावरचे कपडे' घालून शाळा शिकत असतानाच मुंबईहून 'मका आणि मोकिंदा' हे चाकरमाने गावी 'जनता' हे बाबासाहेबांचं पत्रक घेऊन येत. त्या 'जनता' पत्रकातील बाबासाहेबांचं पहिलं भाषण मोठ्यानं वाचलं जाई. 'बाबासाहेबांच्या जनता पत्रकातील विचारानं माझ्या गावी नव्या सुधारणेच्या मार्गाची मशाल पेटली.' (तराळ-अंतराळ, पृष्ठ २०४) यावेळी शंकरराव खरात मराठी पाचवीत होते. आंबेडकरांच्या विचारानं सुधारणेची मशाल पेटली. पण संपूर्ण दलित समाजामध्ये मृत मांसावर बहिष्कार टाकल्यावर आपण खाणार काय, हा भूकेचा प्रश्नही लेखकांनी मांडला आहे.

## समाजशास्त्रीय तपशील देणारे लेखक

दलित जीवनातील समाजशास्त्रीय तपशील देणारे खरात हे एकमेव कथाकार. ग्रामसंस्थेतील स्पृश्य आणि अस्पृश्य तसेच ग्रामसंस्थेशी निगडीत असणाऱ्या उपेक्षित जमातीचे चित्रण ते अत्यंत सहृदयतेने रेखाटतात. त्यांच्या कथेत खेड्यापाड्यातील केवळ दलितच येतात असे नाही, तर सोनार, लोहार, भोई, गुरव, वैदू, धोबी, हमाल, हातगाडीवाला, माकडवाला अशा सर्व जाती-जमातीतील व्यक्ती येतात. या सर्व व्यक्ती दबलेल्या भावभावना, आशाआकांक्षा ते कणवेतून चित्रीत करतात.

**धर्मांतराची घोषणा गावापर्यंत पोहोचते अन्...**

तीन गावचं महार वतन सांभाळताना खरातांना झाडावरचं अनोळखी इसमाचं प्रेत काढावं लागतं. त्याची दुर्गंधी येत असते. त्याचे सगळे सोपस्कार करून लहान वयात मिळालेल्या बारा आण्याचा आनंद आईला होतो. महार म्हणून न्हावी आपले केस कापत नाही, पण म्हशी भादरतो. आपण जनावरापेक्षा हीन आहोत का? विहिरीचा गाळ महारांनी काढायचा; पण परत त्यांना त्या विहिरीत ओंजळभर पाण्याची वाणवा का? देऊळ महाराच्या गड्यांनी बांधायचं पण त्यांना देवदर्शन नाही. घर बांधायचं पण वास्तुशांती झाल्यावर त्याच घरात प्रवेश नाही. असे का? अण्णा ब्राह्मणासारखा माणूस महाराने लाकडं फोडल्यावर गोमुत्र शिंपडतो. का? याचदरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मांतराची घोषणा गावापर्यंत पोहोचते. महारवाड्यात आमुलाग्र बदल घडतो. चौथी पास झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी 'औंध' या ठिकाणी जावं लागतं. अंगावरच्या कपड्यानिशी आईनं बांधून दिलेली चटणीभाकरी आणि दाखला घेऊन ते औंधला जातात. गावचे शिक्षक हणमंतराव देशमुख आणि कात्रे मास्तर यांचे संस्कार मनावर झालेले असतात. औंधला गावचा मुसलमान सांडणीस्वार 'ईमामभाई' याच्याबरोबर चालून चालून दमल्यावर शंकरराव खरात ईमामभाईला म्हणतात, 'मला उंटावर बसू देता? चालून चालून माझे पाय दमलेत' त्यावर तो फाडकन बोलला, 'हट लेका! तू धेड का बच्चा! तुला मी उंटावर कसा काय घेऊ? माझ्या रोट्या बाटतील की?' रात्री दोघेजण 'एळीव' या गावी मुक्काम करतात. चावडीत मुक्काम केल्यावर एक गावकरी विचारतो, 'औंधाला चाललेला सांडणीस्वार का हो?' 'व्हय, मी ईमामभाई है !' 'दुसरा इसम कोण हाय?' 'माझ्या गावचा महाराचा पोरगा! औंधाला शाळेला चाललाय'. खरात म्हणतात, 'त्या गडद अंधारातही माझी जात लपली नाही.' (तराळ-अंतराळ, पृष्ठ २८०). चालून चालून थकलेला हा मुलगा रात्री गाढ झोपी जातो. रात्री कुत्रं येऊन भाकरीचं गठूडं घेऊन जातं. जाग आल्यावर पाहतो तर भाकरीचं गठूडं गायब. ते कुत्र्यानं नेलेलं. चवडीच्या वरच्या भाकरी कुत्र्यानं चावल्या होत्या. चटणी, मटकीची उसळ सांडली होती. त्यावेळी ते म्हणतात, 'कुत्र्यानं मात्र माझ्या जातीचा विचार केला नव्हता.'

## शालेय जीवनात साक्षरतेचा प्रसार

सांडणीस्वार औंधचं 'एस.एस. हायस्कूल' दाखवून निघून जातो. विद्यार्थी शंकरराव खरात रात्रभर शाळेच्या व्हरांड्यात झोपतात. औंध नवीन, शाळा नवीन, सकाळी हेडमास्तर आल्यावर मायेनं वास्तपुस्त करतात. राहण्या-जेवणाची व्यवस्था होते. शाळेत दररोज जाताना वेगवेगळे अनुभव यायचे. केदारलिंग, पंचवटीच्या राममंदिरामध्ये महाराचा मुलगा म्हणून प्रवेश नाकारला. याचदरम्यान औंधचा 'रमणा' हा उत्सव येतो. या उत्सवामुळे शाळेतील मुले आनंदी होतात. कारण या 'रमण्याच्या' उत्सवात मुलांना गोडधोड खायला मिळत असते. पण तिथंदेखील जात आडवी आली. देवळात ब्राह्मणांची वेगळी पंगत. महारांची वेगळी पंगत. महारांना उष्ट्या पत्रावळ्या उचलायला लागायच्या. याच शालेय जीवनातील प्रसंग म्हणजे 'साक्षरता प्रसारणा'चे काम करताना साक्षरतेचे वर्ग हनुमान मंदिरात भरायचे. महारानं आपला देव बाटवला म्हणून लोक नाराज झाले. यानंतरचा प्रसंग मनाला चटका लावून जाणारा. आपल्या आत्मचरित्रात ते सांगतात, ब्राह्मण अस्पृश्यता पाळतील पण एका दरोडेखोराने अस्पृश्यता कशी पाळली तो प्रसंग ते सांगतात. जून महिन्याचा पहिला आठवडा. उन्हाळ्याची सुट्टी संपली. मॅट्रिकचं वर्ष सुरू होणार होतं. 'तरसवाडी'च्या घाटात लूटमारीचा प्रकार चालायचा. घाटातून चालत जाताना हातात फरशी कुऱ्हाड घेतलेला दरोडेखोर समोर उभा. दरोडेखोर विचारतो, 'कुठं चाललास, तू कुठला. मी म्हणालो, 'आटपाडीचा.' 'तू कुणाचा'. 'मी महाराचा.' 'आरं लेका तू महाराचा आणि शाळा शिकतो? तू एकटा घावलास ते घावलास, त्यात महाराचा निघालास! नायतर तुझ्या भाकरी तरी खायला नेल्या असत्या.' मी पटकन त्याला म्हणालो, 'घ्या की! यातल्या निम्म्या भाकरी घ्या! मला निम्म्या ठेवा!' तो आवाज चढवतच स्पष्ट बोलला, 'च्यायला! महाराच्या भाकरी खाऊन मी काय बाटू व्हय रं?' (तराळ-अंतराळ पृष्ठ क्र. ३४२) हा चोर लुटारू दरोडेखोर अशा वैराण ओसाड घाटातही आपली जात विसरला नव्हता. तो अस्पृश्यता पाळत होता. माणसाच्या मनावर जातीचा हा केवढा पगडा. अशा या जातीयतेच्या चटक्यांनी मन होरपळून गेले. पण मॅट्रिकची परीक्षा रात्रंदिवस अभ्यास करून साठ टक्क्यांनी पास झाल्याचं रायगावकर मास्तरांनी सांगितल्यावर खूप आनंद झाला.

मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर कोल्हापूर येथे शाहू महाराजांनी काढलेल्या राजाराम कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला; परंतु 'डायरेक्टर ऑफ एज्युकेशन' डिपार्टमेंटची स्कॉलरशीप मिळाल्याने राजाराम कॉलेज येथील प्रवेश रद्द करून पुणे येथे फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यानंतर त्यांनी 'युनियन बोर्डिंग'मध्ये प्रवेश घेतला. हे बोर्डिंग प्लेगच्या साथीत म्युनिसीपालिटीने उभे केले होते. या झोपड्या कर्मवीर अण्णांनी मिळविल्या आणि त्यावर 'युनियन बोर्डिंग वसतिगृह' असा बोर्ड लावला. अठरापकड जातीचे सर्व विद्यार्थी एकत्र आनंदानं राहत होते. 'जगात एकच जात आहे, ती म्हणजे 'मानवता' अशी अण्णांची शिकवण होती. शंकरराव खरात १९४७-४८ साली एल.एल.बी.ची परीक्षा पास झाले. त्यांनी सनद घेतली. वकिलीचा व्यवसाय करताना दलितांवर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण त्यांच्या आत्मचरित्रामध्ये आले आहे.

## जात चिकटली ती कायमचीच

शाळेत पाय ठेवण्याअगोदरच जात पाठी लागलेली. कल्लेश्वराच्या देवळात पहिलीची शाळा. देवळाच्या खाली पायरीवर बसून उन्हाचे चटके सोसत मातीत बसून दिवस काढले. बामणाच्या मुलांच्या रांगेत बसल्यावर बंडोपंत मास्तरांनी 'हाग्या-दम' भरला, 'ही शाळा आहे, म्हारूडा नव्हं'? जातीमुळं देवळातला देव पाहिला नाही. शाळेच्या सुरुवातीलाच जात चिकटली ती कायमचीच.

## नामवंत साहित्यिकांचा सहवास

आपल्या या अनुभवांना मोकळी वाट करून देण्यासाठी त्यांनी आपली लेखणी उचलली. आचार्य अत्रे, शिरीष पै, प्रा. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, शंकर पाटील, प्रा. द.मा. मिरासदार, सरोजिनी वैद्य, व्यंकटेश माडगुळकर या साहित्यिकांचा सहवास त्यांना लाभला. शंकरराव खरातांच्या व्यक्तित्वाचा आविष्कार म्हणजे त्यांनी रेखाटलेले प्रचंड कथाविश्व होय. त्यांचा खरा पिंड कथाकाराचाच. अनेक प्रकारची, भिन्न-भिन्न स्वभावप्रवृत्तीची माणसे त्यांनी जवळून पाहिली. त्यांचे दारिद्र्य-दीनतेने भरलेले जीवन जाणीवपूर्वक अभ्यासले आणि ते जसेच्या तसे कथेतून मांडले. इ.स. १९५७ साली त्यांची 'नवयुग' दिवाळी अंकात वयाच्या छत्तीसाव्या वर्षी 'सतूची पडीक जमीन' ही पहिली कथा प्रकाशित झाली. १९५७-५८ मध्ये शंकरराव खरातांची 'माणुसकीची हाक' ही महार बलुतेदारीवर लिहिलेली कादंबरी गाजली. पुढे ते लेखक म्हणून उदयाला आले. साहित्याच्या ओढीने त्यांनी राजकारणही सोडले. शंकरराव खरात माणदेशात लहानाचे मोठे झाले. अनुभवविश्व समृद्ध झाल्यानंतर तो परिसर, त्या परिसरातील माणसं त्यांनी आपल्या कथेतून शब्दबद्ध केलीत. 'बारा बलुतेदार' (१९५९), 'तडीपार' (१९६१), 'सांगावा' (१९७७), 'लिलाव' (१९८४) हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. खरातांचे कथालेखन विपुल आहे. समाजातील वास्तव चित्र ते शब्दबद्ध करतात. अण्णा भाऊ साठे यांच्याप्रमाणे जे अनुभवले, पाहिले तेच त्यांनी चित्रीत केले आहे. त्यांची निरीक्षणशक्ती जशी व्यापक तशी सूक्ष्म आहे.

दलित जीवनातील समाजशास्त्रीय तपशील देणारे खरात हे एकमेव कथाकार. ग्रामसंस्थेतील स्पृश्य आणि अस्पृश्य तसेच ग्रामसंस्थेशी निगडीत असणाऱ्या उपेक्षित जमातीचे चित्रण ते अत्यंत सहृदयतेने रेखाटतात. त्यांच्या कथेत खेड्यापाड्यातील केवळ दलितच येतात असे नाही, तर सोनार, लोहार, भोई, गुरव, वैदू, धोबी, हमाल, हातगाडीवाला, माकडवाला अशा सर्व जाती-जमातीतील व्यक्ती येतात. या सर्व व्यक्ती दबलेल्या भावभावना, आशाआकांक्षा ते कणवेतून चित्रीत करतात. त्यांच्या 'बारा बलुतेदार' या कथासंग्रहातील काही व्यक्तीचित्रे पाहू.

## बलुतेदारीमुळे ससेहोलपट

'बारा बलुतेदार' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. 'रामा महार' (बारा बुलतेदार) ही कथा त्यांच्या वडिलांचे व्यक्तीचित्र शब्दबद्ध करते. महार म्हणून रामा गावकीची कामे करतो. लहान मुलगा तापाने फणफणलेला असूनही धुमाळाच्या म्हातारीच्या मयताचा

सांगावा पाचेगावला सांगून येतो. गावात आलेल्या मामलेदाराचे टपाल तालुक्याला देऊन येतो. महादेवाच्या भंडाऱ्यासाठी लाकडं फोडतो. इकडं पोराचा मृत्यू होतो. गुराढोरांना विश्रांती, पण गावकीच्या महाराला विश्रांती नाही. 'बंडा मांग' (बारा बलुतेदार) या कथेत दहिवडीच्या पंचक्रोशीत कटपाळ गावच्या बंडा मांगाची, त्याच्या मुलाची, त्याच्या आईची बलुतेदारीमुळे झालेली ससेहोलपट चित्रीत होते. 'आबा रामोशी' (बारा बलुतेदार) या कथेत आपल्या बहिणीची, आईची अब्रू लुटणाऱ्या गोळेकर फौजदाराला ठार मारून अद्दल शिकवणाऱ्या आबा रामोशी यांचे व्यक्तीचित्र येते. 'कोंडिबा सुतार' (बारा बलुतेदार) या कथेतील कोंडिबा कुंभार याच्या थोरल्या मुलाने दादूने जवानीत आल्यावर भावकीतील विधवा बाई घेऊन पळून गेल्यामुळं भावकीनं वाळीत टाकल्यानंतर जे दु:ख सोसावे लागते, ज्या वेदना सोसाव्या लागतात याचे चित्रण आले आहे. 'केरू चांभार' (बारा बलुतेदार) या कथेत आई-वडिलांच्या मृत्यूनंतर बालपण मामाच्या गावी घालवून स्वत:चे लग्न झाल्यानंतर आपल्या मूळ गावी देवापूरला येऊन गावकीची कामे करून संसार करणाऱ्या केरू चांभाराचे व्यक्तीचित्र रेखाटले आहे. 'माळेगावचा कोळी' (बारा बलुतेदार) या कथेत सावळा कोळी याचा रेडा नजरचुकीने काहीतरी खाल्यामुळे मरतो. पण रेड्याच्या मरणाबद्दल महारांना जबाबदार धरले जाते. 'दादू परीट' (बारा बलुतेदार) या कथेत तरूण वयात तमाशाच्या नादी लागून आयुष्याची फरफट झालेला; पण वेळीच शहाणपण येऊन गिरणीत काम करणाऱ्या दादू परीटाचे व्यक्तिचित्रण येते. 'धनवडीचा न्हावी' (बारा बलुतेदार) या कथेत नाना न्हावी याचे व्यक्तिचित्र येते. संभू चौगुल्या, सदू वाणी ही भरली घरं. दुष्काळाचे निमित्त करून नानाला बलुतं देत नाहीत, पण सावळा कोष्टी मात्र मन मोठं करून बलुतं देतो. दुष्काळात दोन दिवसांनी का होईना नानाच्या लेकरा-बाळांना अन्नपाणी मिळते.

'तात्या सुतार' (बारा बलुतेदार) हा अतिशय कष्टाळू आहे. आपल्या स्वत:च्या व कुटुंबियांच्या कष्टाच्या जोरावर तो थोडीफार जमीन खरेदी करतो. पण डावबाज, कावेबाज गावचा पाटील सोनबा पाटील डाव करून तलाठी, सर्कल ऑफीसर, रजिस्ट्रार, फौजदार यांची मदत घेऊन तात्याला जितकं लुटता येईल तितकं लुटण्याचा प्रयत्न करतो. 'पांडू लोहार' (बारा बलुतेदार) या कथेत पळशी गावच्या एका बलुतेदाराचे, पांडू लोहाराचे व्यक्तिचित्र येते. हा लोहार विश्रांती न घेता काम करतो. पण केलेल्या कामाचा दाम (बलुते) त्याला मिळत नाही. त्याच्या बायकापोराची, जनावरांची उपासमार होते. उभ्या पिकाची चोरी तो करतो. 'आढळगावचा सोनार' (बारा बलुतेदार) या कथेमध्ये रघू सोनार या विश्वासघातकी सोनाराचे व्यक्तिचित्र येते. 'दामू गुरव' (बारा बलुतेदार) कथेत चंद्रग्रहणाच्या दिवशी दामू गुरव ओढ्यात आंघोळ करून सोवळ्या-ओवळ्याने घरी परत येताना ब्राह्मणाच्या विष्णूपंताशी न बोलल्यामुळे त्यांना राग येतो. त्यातून ते गुरवाचा काटा काढतात.

### विविध वाङ्मयीन प्रवाह हाताळले

गावकुसाच्या आतील व गावकुसाबाहेरील लोकांच्या कथा व व्यथा खरातांनी शब्दबद्ध केल्या आहेत. कथा, कादंबरी, ललितलेख, आत्मचरित्र असे विविध वाङ्मयीन प्रवाह त्यांनी हाताळले आहेत. त्यांच्या या साहित्याची दखल म्हणून 'जळगाव' येथे १९८४ साली भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष झाले. बँक ऑफ इंडियाचे ते संचालक झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे ते कुलगुरु झाले. ८० वर्षे आयुष्य जगलेल्या या महान लेखकाने शैक्षणिक कार्यातून आणि आपल्या साहित्यातून महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्राला समृद्ध करण्यात मोठं योगदान दिलं. 'मी स्वत: महात्मा फुले, शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा शिष्य आहे' असे ते नेहमी म्हणत. या शिष्याने आपले आयुष्य समाजहितासाठी खरोखरच सार्थकी लावले. •••

**(लेखक साहित्याचे अभ्यासक आहेत)**

---

**(पान २२ वरून)**

# नरेंद्र मोदी यांची कोलांटउडी

गेल्या वर्षात निर्माण झाले होते; परंतु उच्च न्यायालयाने, ब्यूरोने कोणताही सज्जड पुरावा सादर न केल्याची टिप्पणी व कानउघाडणी करीत आर्यन खानला सर्व आरोपातून मुक्त केले. नार्कोटिक ब्यूरो तोंडघशी पडले. प्रकरण समीर वानखेडे यांच्यावर शेकणार, अशी लक्षणे आहेत. दिसेल तो विरोधक, विचारवंत, पत्रकार, राजकीय नेते, शिक्षणतज्ज्ञ, विद्यार्थी यांच्यावर आरोप करीत त्यांच्यावर कोणत्या न कोणत्या कायद्याखाली कारवाई करण्याचा, त्यांना धाकात ठेवण्याचा सपाटा सरकारने चालविला आहे. त्याला कुठे न कुठे आळा बसला पाहिजे. 'ही लोकशाही आहे, ठोकशाही नाही,' असे वारंवार न्यायालये आपल्या निकालपत्रातून सरकारला ध्वनित करीत आहेत. म्हणूनच निवडणूक आयोग, सीबीआय, एनफोर्समेन्ट डायरेक्टरेट, पोलीस व्यवस्थापन यांना आपली विश्वासार्हता व स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी व कोणत्याही राजकीय दबावाखाली न वाकण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील. तरच ते जनतेच्या विश्वासास पात्र ठरतील. 'हम करे सो कायदा,' असे चालणार नाही, हे सरकारच्या ध्यानात आणून देण्याचेही कर्तव्य शेतकरी संघटनांनी बजावले. याबाबत त्यांची प्रशंसाच करावी लागेल. •••

**(लेखक दिल्लीस्थित ज्येष्ठ पत्रकार आहेत)**



# बौद्ध तत्त्वज्ञानाने घडला नवा भारत

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दीक्षाभूमीवर पाच लाख अनुयायांना धम्मदीक्षा देण्यापूर्वी बावीस प्रतिज्ञांचे आपण पालन करणार असल्याचे स्पष्ट केले. या प्रतिज्ञा म्हणजे समाजाला वचनबद्ध धम्माचरणाचा दिलेला साचा तयार करण्याची सूचना होती. बाबासाहेबांनी त्यांची संपूर्ण बौद्धिक क्षमता या बावीस प्रतिज्ञांमध्ये सारांशित केली असून तर्कशास्त्र, विज्ञान आणि अनुभव हे तीन निकष या प्रतिज्ञांचा आधार आहेत. बुद्धाने सामाजिक व्यवस्थेत ज्या पद्धतीने सुधारणा केली, त्याच मार्गाने बाबासाहेबांनी आधुनिक स्वरूपात आपला धम्म निर्माण करून भारताला आधुनिकतेचे आयाम बहाल केले!



भीमराव सरवदे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धम्मक्रांती प्रत्यक्षात आणण्यासाठी १४ ऑक्टोबर १९५६ पर्यंत वाट का पाहावी लागली? कदाचित भारतीय समाजाला हा आश्चर्यकारक प्रश्न पडला असेल! बाबासाहेबांचे जीवन आणि कर्तृत्व यात या प्रश्नांची उत्तरे मिळतात. त्यांचे उद्दिष्ट केवळ विस्कळीत झालेल्या भारतीय सामाजिक इतिहासाची फेरमांडणी करणे एवढेच नव्हते, तर या देशात कायद्याने लोकशाहीयुक्त सामाजिक व्यवस्था प्रस्थापित करणे हे होते. जनतेच्या व्यापक जागृतीसाठी, सांस्कृतिक आणि बौद्धिक विकास करणे, नवीन धर्माच्या दिशेने पाऊल उचलण्याचा सखोल अभ्यास करणे, उपलब्ध असलेली संसाधने लोकांसाठी उपलब्ध करून देणे हा त्यांचा उद्देश होता.

मानवी जीवनाचे अंतर्बाह्य स्वरूप बदलून टाकण्यात धर्म आणि तत्त्वज्ञानाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली असून धर्म हा समाजमनासाठी एक आवश्यक घटक आहे. कोणत्या प्रकारचे तत्त्वज्ञान स्वीकारार्ह आहे, हे ठरवणे हे व्यक्ती आणि समाजावर अवलंबून असल्याने धर्मांतराचा पर्याय उपलब्ध झाला. धर्मांतर चळवळीने त्या त्या काळात लोकांमध्ये अस्वस्थता व चिंता निर्माण झाल्या; परंतु खरा प्रश्न हा आहे, की या सर्व चिंता कोणत्या गोटात व्यक्त होत असतात. भारतात मिशनऱ्यांच्या काळापासून आणि विशेषतः १९५६ नंतर ब्राह्मणी वर्चस्ववादी सामाजिक रचनेवर उभ्या असलेल्या समाजव्यवस्थेतून मोठ्या प्रमाणात लोकांनी धर्मांतर केले.

**नैतिकता ही स्वीकारार्ह संज्ञा :**

बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतर संकल्पनेने भारतीय समाजव्यवस्था चिंताग्रस्त झाली होती; परंतु बाबासाहेबांनी भारतीय समाजाला नव्या क्षितिजावर नेऊन ठेवले. पारंपरिक अध्यात्मिक व्यवहार व आचरणाला त्यांनी नवा आकार दिला. अध्यात्म हा शब्द बौद्ध विचारसरणीत बसत नसल्याने अध्यात्माच्या संकल्पनेचा समानार्थी शब्द म्हणून 'अनात्म' ही संकल्पना अस्तित्वात असल्याने बौद्ध प्रवचनात 'नैतिकता' ही संज्ञा स्वीकारार्ह वाटते. बाबासाहेबांच्या विचारधारेचे राजकीय आणि नैतिक स्वरूप सुटेपणाने समजून घेणे आवश्यक आहे. भारताची नवसामाजिक रचना आणि परिवर्तन समजून घेत असताना पूर्वीच्या अवस्थेतून विद्यमान अवस्थेत झालेले संक्रमण समजून घेतले पाहिजे. बाबासाहेबांचे जीवन आणि ध्येय या नव्या सामाजिक जडणघडणीत ठळकपणे अधोरेखित झाले.

डॉ. बाबासाहेबांना अगदी तारुण्यात असतानापासून धार्मिक साहित्य वाचन्याची आवड होती. त्यांचे वडील हिंदूधर्मीय असले तरी कबिरांचे भक्त होते. बाबासाहेबांना लहानपणापासूनच हिंदू पौराणिक कथा आणि बौद्ध साहित्य वाचता आले. १९०७ मध्ये दादासाहेब केळुस्कर गुरुजींनी त्यांना बुद्धाचे चरित्र भेट दिले होते. किशोरवयातच बौद्ध साहित्याशी त्यांची झालेली ओळख पुढे त्यांच्या विचारांवर कशी प्रभाव पाडत गेली, याचे निरीक्षण त्यांच्या जीवनचरित्रातून करता येते. त्यांनी अमेरिका, इंग्लंड आणि जर्मनी या देशांमध्ये आधुनिक शिक्षण घेतले. दरम्यान, १९१८ मध्ये बर्ट्रांड रसेल यांच्या 'प्रिंसिपल्स ऑफ सोशल रिकन्स्ट्रक्शन' या प्रसिद्ध ग्रंथाची समीक्षा करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक पुनर्बांधणीच्या तत्त्वांमध्ये युद्धाचे तत्त्वज्ञान सामाजिक विकासाचे प्रतिनिधित्व कसे करते, असा प्रश्न केला. बाबासाहेबांनी केलेली ही समीक्षा 'जर्नल ऑफ द इंडियन इकॉनॉमिक सोसायटी'च्या १९१८ च्या अंक क्र.१ मध्ये प्रकाशित झाली होती. यासंदर्भात रसेलचे म्हणणे असे होते, की राष्ट्राने व्यक्त केलेल्या एखाद्या अपेक्षेमुळे लोक उत्तेजित होऊ शकतात आणि त्याचा परिणाम म्हणून युद्ध किंवा क्रांती होऊ शकते आणि जर लोकांच्या अपेक्षा भंग झाल्या तर तेव्हाही एखादी मोठी

क्रांती किंवा युद्ध होऊ शकते. युद्धाविरुद्ध तत्त्वतः बौद्ध संहितांचा वापर करण्यात आलेल्या उदाहरणांपैकी एक म्हणून याकडे पाहिले पाहिजे. बाबासाहेबांवर सर्वाधिक प्रभाव असलेल्या तत्त्ववेत्त्यांपैकी रसेल हे एक होते. वेठबिगारीच्या समस्येवरील चर्चेत डॉ. जॉन डेवी यांनी असा युक्तिवाद केला होता, की बळजबरीमध्ये हिंसा आणि शक्ती दोन्ही आहेत. बाबासाहेबांनी हे सिद्ध केले, की ही शक्ती केवळ वैज्ञानिक घटकच नाही तर मानवी गुणांचे उत्पादन असलेल्या 'सामर्थ्य' या घटकाशी अविभाज्यपणे जोडलेली आहे.

### लोकशाही विचारांची महत्त्वाची भूमिका

१९२७ चे चवदार तळ्याचे पाणी प्राशन करण्याचे आंदोलन ही एक ऐतिहासिक घटना आहे. लोकशाही मार्गाने होत असलेला संघर्ष हिंसक होऊ नये याची बाबासाहेबांनी पुरेपूर काळजी घेतली होती. भारतातील दलित समाजाला वांशिक छळाला सामोरे जावे लागले असूनही त्याच्या निषेधाचे हिंसाचारात रूपांतर करण्यापासून रोखण्यात बाबासाहेबांच्या लोकशाही विचाराने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. बुद्धाने आपल्या पहिल्या धम्म प्रवचनांमध्ये दहा पारमितांचे महत्त्व सांगितले होते. त्या दहा पारमितांमध्ये शील, दान, उपेक्षा, नैष्कर्म, वीर्य, शांती, सत्य, अधिष्ठान, करुणा व मैत्री अशा या दहा गुणांचा अंतर्भाव होतो. या दहा तत्त्वांवर आधारित बाबासाहेबांनी आपल्या संकल्पना विकसित केल्या होत्या. जातीय अत्याचाराला बळी पडलेल्या दलितांच्या लोकशाही संघर्षांना त्यांनी कधीही हिंसाचाराची किनार लागू दिली नाही. आपल्या सामाजिक कार्यात त्यांनी हिंसेला प्रोत्साहन न देणाऱ्या बौद्ध तत्त्वज्ञानाचेच सातत्याने अनुसरण केल्याचे दिसून येते. १९२७ च्या दुसऱ्या महाड परिषदेत त्यांनी ब्राह्मण्यवादी मनुस्मृतीचे दहन केले. या निमित्ताने क्रूर धार्मिक-सामाजिक संहिता नाकारून भारतीय जनतेसाठी नव्या सामाजिक सुधारणेचा पाया घातला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण जीवन सांस्कृतिक स्मृती आणि इतिहासाच्या पुनर्प्राप्तीद्वारे इतिहासात हरवलेल्या राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाची साक्ष देते. १९२७ च्या महाडच्या सत्याग्रहानंतर, बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांना बौद्ध स्मृती जागृत करणाऱ्या बौद्ध स्मारकांना भेटी देण्याचे आवाहन केले होते. आपल्या अनुयायांना योग्य दिशानिर्देश करताना, चळवळी केवळ ज्ञानशास्त्रावर किंवा तत्त्वज्ञानावर आधारित असू नयेत, तर भावनिक आणि नैतिक वलयही त्यास असले पाहिजे, असा त्यांचा हेतू होता. १९२७ मध्ये झालेल्या दुसऱ्या महाड परिषदेत त्यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाच्या पायावर आधारित नवसामाजिकरण शक्य करण्यासाठी तळागाळातील जनतेने कशी तयारी ठेवावी, हे स्पष्ट केले.

### क्रांती ब्राह्मण्यवादाच्या विरोधात

आपली क्रांती ब्राह्मणांच्या विरोधात नसून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या कल्पनेला अडथळा ठरलेल्या ब्राह्मण्यवादाच्या विरोधात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बाबासाहेबांच्या जीवनावरून असे दिसून येते, की मानवाला उच्च आदर्शांची आत्यंतिक गरज आहे. १९२० च्या दशकात त्यांनी धर्मांतरासाठी आवश्यक असणारी संसाधने गोळा करण्यास सुरुवात केली. १९२९ साली झालेल्या डिप्रेस्ड क्लास परिषदेपासून त्यांनी हिंदू धर्माचा त्याग करण्याच्या कल्पनेवर तरुणांमध्ये चेतना निर्माण करण्यास सुरुवात केली. बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान, इतिहास आणि विधी जनतेच्या स्मृतिपटलावरून पुसल्या गेल्यामुळे ते परत मिळवण्याची त्यांच्यावर मोठी जबाबदारी होती.

## बावीस प्रतिज्ञा: नवीन जबाबदारी

बाबासाहेबांना भेडसावणारी आव्हाने आणि संकटे इतर कोणालाही सहन करावी लागली नाहीत. तरीसुद्धा बाबासाहेबांनी अशा गोष्टी केल्या, ज्या जगातील इतर कोणत्याही मिशनऱ्यांनी केल्या नाहीत. इतर प्रचारकांची अनुयायांना आपल्या धर्मात धर्मांतरित करण्याची एकमेव जबाबदारी होती. बाबासाहेबांनी केवळ दीक्षा समारंभांद्वारे आपल्या अनुयायांना नव्या धम्माची ओळख करून दिली नाही, तर ज्या संसाधनांवर हा धम्म आधारित होता ती सर्व संसाधने शोधून ती धर्मांतरितांपर्यंत पोहचतील याची व्यवस्था केली. नागपूर येथील दीक्षाभूमीत बाबासाहेबांनी पाच लाख अनुयायांना नव्या धर्मात धर्मांतरित करण्यापूर्वी त्यांनी तयार केलेल्या नवीन संहितेचे आपण पालन करणार असल्याचे स्पष्ट केले. बावीस प्रतिज्ञा म्हणून ओळखली जाणारी नवीन जबाबदारी म्हणजे समाजाला वचनबद्ध धम्माचरणाचा साचा तयार करण्याची सूचना होती. बाबासाहेबांनी त्यांची संपूर्ण बौद्धिक क्षमता या बावीस प्रतिज्ञांमध्ये सारांशित केली असून तर्कशास्त्र, विज्ञान आणि अनुभव हे तीन निकष बावीस प्रतिज्ञांचा आधार आहेत. बुद्धाने सामाजिक व्यवस्थेत ज्या पद्धतीने सुधारणा केली, त्याच मार्गाने बाबासाहेबांनी आधुनिक स्वरूपात आपला धम्म निर्माण करून भारताला आधुनिकतेचे आयाम बहाल केले!

### विचारपूर्वक धर्मांतराची घोषणा

९ मे १९१६ रोजी बाबासाहेबांनी, 'भारतातील जाती: त्यांची घडण, उत्पत्ती आणि प्रसार' हा निबंध कोलंबिया विद्यापीठात मानववंशशास्त्र विभागात डॉ.ए.ए. गोल्डनवायझर यांच्या सेमिनारमध्ये सादर केला होता. नंतर तो 'इंडियन अँटिक्वारी' या नियतकालिकात मे १९१७ मध्ये प्रकाशितही झाला होता. सदर निबंधात बाबासाहेब म्हणतात, जात ही कृत्रिम संस्था नष्ट करण्यासाठी अलीकडे मोठ्या चिकाटीने प्रयत्न केले जात असल्यामुळे या जातीच्या प्रश्नाला आज विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. तथापि, अशा प्रकारच्या सुधारणावादी प्रयत्नांमुळे तिच्या उत्पत्तीसंबधी मोठ्या प्रमाणात वाद निर्माण झाले. बाबासाहेबांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवला येथे केलेल्या धर्मांतराच्या घोषणेत, दुर्दैवाने अस्पृश्य हिंदू असा डाग घेऊन मी जन्माला आलो, पण ती गोष्ट माझ्या स्वाधीन नव्हती. तथापि, हा नीच दर्जा झुगारून देऊन ही स्थिती सुधारणे मला शक्य आहे आणि ते मी करणारच याबद्दल मुळीच संशय नको. मी तुम्हाला स्पष्टपणे सांगतो, हिंदू म्हणून घेत मी मरणार नाही, असे स्पष्ट सांगितले होते. या ऐतिहासिक घोषणेने भारतीय समाजाला अंतर्मुख होऊन विचार करायला भाग पाडले होते. बाबासाहेबांनी हिंदू धर्माचा त्याग करणार असल्याच्या बातम्या हिंदू आणि काँग्रेसच्या गोटात पसरल्याने ते चिंताग्रस्त होते. बाबासाहेब आता कोणता धर्म स्वीकारणार याबद्दल

सर्वच धर्मप्रमुखांमध्ये धास्ती निर्माण झाली होती. या घोषणेमागे एक प्रदीर्घ अभ्यास, अनुभव आणि अंतर्दृष्टी होती. बाबासाहेबांनी बौद्ध धर्माशी संबंधित नवसामाजिक चळवळीचा स्वीकार का केला, हेच या घोषणेतून प्रतिबिंबित होते.

ही घोषणा संपूर्ण अस्पृश्य जातींनाही आवाहनात्मक ताकीद होती. धर्मांतरापूर्वी बौद्ध धम्माचा हरवलेला इतिहास, तत्त्वज्ञानाचा आधुनिक अर्थ आणि पूजापाठाची पद्धत नव्याने निर्माण करावी लागली. बौद्ध धर्म लोकांच्या हृदयात असला, तरी तो प्रत्यक्षात आणण्यासाठी कोणतेही अनुयायीच उरले नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवन तर केलेच, पण आधुनिकतेला साजेशा त्यामध्ये सुधारणा केल्या. बौद्ध धर्माचे संहितीकरण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती, जेणेकरून ते वाचले जाऊ शकेल आणि मुक्तपणे त्याचा प्रचारही करता येऊ शकेल, बौद्ध साहित्यातील ब्राह्मण्यवादी विचारांचे उच्चाटन केले जाऊ शकेल. त्याचबरोबर भिक्खूंच्या संरचनात्मक नियमांमध्ये सुधारणा करून स्त्रियांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित केले जाईल आणि बौद्ध धर्माला कला, विज्ञान आणि इतिहासाने पुन्हा एकत्र आणले जाईल. १९३५ च्या येवला येथील परिषदेनंतर त्यांना अनेक धर्मांची निमंत्रणे मिळाली. इस्लाममधून तसेच हैदराबाद येथील निजाम, बर्मा, चीन आणि तिबेट येथील बौद्ध मिशनरी तसेच ख्रिश्चन आणि शीख धर्मप्रमुख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वागत करण्यास तयार होते. १९३६ मध्ये अस्पृश्य तरुण, भिक्खू, अधिकारी आणि कार्यकर्त्यांसाठी महाराष्ट्रात विशेष परिषदा बोलवल्या गेल्या.

बाबासाहेबांचा असा युक्तिवाद होता, की भारतात बौद्धांबद्दल वाटणाऱ्या असूयेमुळे अस्पृश्यतेची अमानवी प्रथा निर्माण केली गेली. ब्राह्मण्यवादाने सुरू केलेल्या विध्वंसक सामाजिक वास्तवावर बुद्धांनी आक्षेप नोंदवले होते. बाबासाहेबांच्या मते, बुद्ध हे जगातील पहिले लोकशाहीवादी व्यक्तिमत्व होते. 'क्रांती आणि प्रतिक्रांती' या पुस्तकात बाबासाहेबांनी ब्राह्मण्यवादी सामाजिक व्यवस्थेविरुद्ध बुद्धांच्या नेतृत्वाखालील क्रांती पुन्हा ताब्यात घेण्यासाठी ब्राह्मणांनी केलेल्या हिंसक कृतीवरील निरीक्षण नोंदविलेले आढळून येते. या प्रतिक्रांतीचे प्रयोग अजूनही जनतेच्या विरोधात वेगवेगळ्या प्रकारे केले जात आहेत, ही वस्तुस्थिती आपण समकालीन वातावरणातून समजू शकतो.

**नव्या जीवनशैलीचे आश्वासन**

स्त्रियांना त्यांच्या स्वातंत्र्यापासून वंचित ठेवणारी, लोकशाहीला अडथळा असलेली ब्राह्मणी संहिता ही स्त्रियांविरोधी कुरूपतेने भरलेली सामाजिक व्यवस्था होती. बुद्धांनी या विध्वंसक सामाजिक व्यवस्थेविरुद्ध आपला सिद्धांत तयार केला. वंश, लिंग किंवा जातीच्या आधारे त्यांच्या संघातील कोणालाही विशेष स्थान दिले गेले नव्हते. आपल्या संघामध्ये सामाजिक श्रेणीबद्धतेत अवनत झालेल्या स्त्रियांना प्रवेश देऊन बुद्धांनी एक उदाहरण घालून दिले होते. बुद्धांनी सुरुवातीस पुरुषांसाठी लागू असलेल्या नियमांमध्ये स्त्रियांसाठी सुधारणा आणि शिथिलता करण्याचे आवाहन केले. बुद्धाने स्त्रियांना संघामध्ये पुरुषाएवढेच स्थान देऊन त्यांच्या सर्वांगीण प्रगतीला चालना देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या संघात जीवनाच्या सर्वच स्तरांतून स्त्रिया, गरीब,




अस्पृश्य, राजे, वेश्या आणि चोर इत्यादींना सहज प्रवेश मिळत असे. बुद्धांनी अशा भिन्नभिन्न जीवनशैलीतून आलेल्यांसाठी एका नव्या जीवनशैलीचे आश्वासन दिले.

आधुनिक समाजात स्त्रियांच्या हक्कांसाठी बाबासाहेब किती दूरदृष्टीचे होते हे समजून घेतले पाहिजे. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिल सादर केले. हिंदू कोड बिलाच्या निमित्ताने बुद्धाच्या क्रांतीला देशात पुढे घेऊन जाण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आधुनिक भारतात महिलांना विशेष स्वातंत्र्य मिळायला हवे, असे बाबासाहेबांना वाटत असे. भारतीय समाजाने बाबासाहेबांची तत्त्वज्ञानात्मक मूल्ये ओळखण्याची गरज आहे. बाबासाहेब म्हणतात, 'स्त्रियांनी केलेल्या प्रगतीवरून मी समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करतो'. कदाचित बाबासाहेब हे एकमेव तत्त्ववेत्ते होते, ज्यांनी सांगितले होते, की समाजाच्या प्रगतीचे मोजमाप म्हणजे त्या देशातील स्त्रियांचा सर्वांगीण विकास आहे.

बाबासाहेबांचा २५ मे १९४० रोजीचा श्रीलंका दौरा बौद्ध विधींचा सखोल अभ्यास करण्यासाठी होता. सम्राट अशोकानंतर बाबासाहेबांनीच बौद्ध धम्माच्या सामाजिकरणाला धम्म म्हणून संहिताबद्ध केले होते. बाबासाहेबांनी बौद्ध साहित्य, विशेषत: त्रिपिटक, सुत्त आणि बौद्ध विधी-पूजा, विवाह, नामकरण, अंत्यसंस्कार आणि मंगलकर्म यांना संहिताबद्ध करून नवीन समाजाची निर्मिती केली. बौद्ध धम्म म्हणजे काय, याचे समर्थन करण्यासाठी; स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या आधुनिक मूल्यांचे संगोपन करून, तसेच पंचशीलाला आधार मानून, आर्य अष्टांगिक जीवनपद्धतीला कायदा मानून आणि आर्यसत्यांना नैतिक आधार म्हणून धम्माच्या आचरणाचा मार्ग दाखवला. बौद्ध धर्म हा शाश्वत सिद्धांत आहे, दु:खाचे कारण, दु:खावर उपाय, प्रतिवाद, म्हणजे सर्वांना कार्यकारणभावाच्या नियमांनुसार बदलण्याच्या अधीन असलेला नैसर्गिक कायदा, हे सामान्य माणसाला समजावून सांगायचे होते. या काळात बाबासाहेब बौद्ध धम्मगुरुंशी दीर्घकाळ संपर्कात राहिले. प्राचीन भारतातील पहिली लोकशाही असलेल्या मगधची राजधानी राजगृहाचे आपल्या घराला नाव दिले. १९५० आणि १९५४ मध्ये त्यांनी ब्रह्मदेशाला भेट दिली. १९५४ च्या सुरुवातीस भारतातील मुंबई, नागपूर, दिल्ली, बंगळुरू आदी प्रमुख शहरांमध्ये बौद्ध चर्चासत्रे आणि बुद्धविहारे स्थापन करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली होती. त्यांनी मद्रास आणि इतरत्र बौद्ध केंद्रांची स्थापना करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. •••

**(लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी असून आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक आहेत.)**




# भ्रष्ट राज्यकर्ते-धनदांडगे-व्यावसायिकांना कोण आवरणार?



प्रा. एच. एम. देसरडा

१५ ऑगस्ट २०२१ रोजी भारताने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षांत पदार्पण केले आहे. १३८ कोटी लोकसंख्येच्या बहूभाषिक, बहूजातधर्मिय, बहूसांस्कृतिक भारताची आजची सामाजिक-आर्थिक-शैक्षणिक-आरोग्यविषयक स्थिती काय आहे? स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या देशाने औद्योगिकरण, शहरीकरण, विद्युतीकरण, रस्ते-रेल्वेसह दळणवळण तसेच शिक्षण, आरोग्य, निवारा या सेवासुविधांचा लक्षणीय वाढविस्तार केला आहे. जेमतेम १२ टक्के असलेली साक्षरता ८० टक्क्यांपर्यंत वाढल्याचे आकडे दर्शवतात. गत ७४ वर्षात लोकसंख्या चौपट झाली; पण अन्नधान्य उत्पादन पाचपट झाले. दूध उत्पादन तर दसपट होत २० कोटी टन झाल्यामुळे भारत हा जगातील सर्वाधिक दूध उत्पादक देश आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठी भरारी घेतली आहे.

**१०० कोटी भारतीय दैन्यावस्थेत :**

आजमितीला भारताची अर्थव्यवस्था उणीपुरी ३ अब्ज डॉलर (२२५ लाख कोटी रुपये) एवढी असून क्रयशक्ती समानतेच्या मोजमापाने ती जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे; परंतु भारताची राष्ट्र म्हणून जगाच्या प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये गणना होत असताना, सामान्य भारतीयांची, श्रमजीवी जनतेची अवस्था अत्यंत दयनीय आहे. तब्बल शंभर कोटी भारतीय मूलभूत गरजांच्या पूर्तीपासून वंचित आहेत. त्यांना शुद्ध हवा, पाणी, विषमुक्त सकस अन्न, आरोग्यदायी निवारा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, प्राथमिक आरोग्यसुविधा आणि सामाजिक सुरक्षा प्राप्त होत नाही. हे ढळढळीत वास्तव नाकारण्यात काय हशील?

शासकीय तसेच गणमान्य संशोधन संस्थांच्या अहवालानुसार, किमान ३० टक्के भारतीयांना दरदिवशी दरडोई पन्नास रुपयांपेक्षा कमी खर्चात गुजराण करावी लागते. ४० टक्के बालके कुपोषित, वाढ खुंटलेली आहेत. ७५ टक्के कुटुंबे फक्त एका खोलीच्या घरात राहतात. गोरगरिबांच्या शिक्षणाची व आरोग्याची स्थिती अत्यंत गलितगात्र आहे. मानव विकासात भारताचा १३१ वा क्रमांक याचे ठळक उदाहरण आहे. भूक निर्देशांक, हवापाण्याची शुद्धता व गुणवत्ता यात आपण जगात अगदी तळाशी आहोत. मानव अधिकारांचे हनन, लिंगभेद, धार्मिक असहिष्णुता, नागरी स्वातंत्र्याचा अभाव या बाबी नीट लक्षात घेतल्यास भारताची स्थिती नकारात्मक आहे.

तात्पर्य, उत्तरोत्तर रुंदावणारी आर्थिक विषमता, दिवसेंदिवस

आक्रमक व हिंसक होत असलेला सामाजिक विसंवाद, सर्वव्यापी प्रदूषण, पर्यावरणीय-परिस्थितीकी विध्वंस या भारताच्या ज्वलंत राष्ट्रीय समस्या असून त्याचे निवारण, निराकरण व निर्मूलन करणे हे शासनसंस्थांचे संविधानात्मक दायित्त्व आहे. सबब, विधायिका, कार्यपालिका व न्यायपालिकांनी व्यापक जनहितार्थ कार्य करण्यास सर्वोच्च अग्रक्रम असावयास हवा. किंबहुना तेच त्यांचे स्वतंत्र संस्थात्मक अस्तित्वकारण नि आद्यकर्तव्य होय. मात्र, आज वस्तुस्थिती काय आहे? केंद्र व राज्य सरकारे, नेते, अभिनेते, तंत्रशहा, नोकरशहा, व्यावसायिक, बुद्धिजीवी, पोलीस व अन्य तपास यंत्रणा, न्यायसंस्था व माध्यमजगत जनतेच्या चरितार्थ-रोजगार-उत्पन्न जगण्यामरण्याच्या समस्यांची सोडवणूक करण्याऐवजी त्यांच्या सत्ता-संपत्तीच्या खेळात मश्गुल आहेत.

**विचारा संपत्तीचा स्त्रोत अन् करा जप्त :**

हे उघड सत्य आहे, की बहुसंख्य लोकप्रतिनिधी व अधिकारी गत काही दशकांत प्रचंड मालामाल झाले आहेत. लखपती, करोडपती आता जुनी गोष्ट झाली. त्यांची घोषित (निवडणूक कायद्यातहत) संपत्ती अब्जाच्या संख्येत मोजावी लागते. दृश्य जमीनजुमला, बंगले, इमारती, सोने, हिरे, व्यापार व अन्य उद्योगधंदे हॉटेल, मद्यालये, रिसॉर्ट इत्यादी दरएक गाव-शहरात, देशपरदेशात फोफावलेली आहेत. ही सर्व बोकडकमाईची मालमत्ता आजी-माजी लोकप्रतिनिधी, अधिकारी, त्यांचे व्यापारी पार्टनर, पंटर यांच्या नावे दस्तुरखुद्द अथवा बेनामी असल्याचे सर्वज्ञात आहे. भ्रष्टाचाराच्या महाउद्योगातून जमवलेल्या मायापुंजीच्या रक्षण व वाढीसाठीच सत्ताटोळके अहोरात्र युक्त्या-क्लृप्त्या करत राहते. गल्लीपासून दिल्लीपर्यंत लहानमोठ्या कचेरीपासून मंत्रालयाच्या सर्व मजल्यांवर समस्त यंत्रणा यातच आकंठ बुडालेली असते. जनता, लोकहित हे फक्त विधिमंडळे व संसदेतले वाक्प्रचार (डॉयलॉग) झाले आहेत. बकासुरांचे हे राज्य सर्व काही फस्त करत आहे. भ्रष्टाचाराचा हा राक्षस सर्व लोकशाही संस्थांना अंकित ठेऊन स्वातंत्र्य चळवळीची तमाम नीतिमूल्ये व आदर्श नेस्तनाबूत करत आहे.

ही सर्व वस्तुस्थिती नीट ध्यानी घेऊन विद्यार्थी-युवक, श्रमजीवी जनतेने अहिंसक मार्गाने याविरुद्ध शंकनाद करणे, अवैध संपत्तीचे स्त्रोत विचारणे, भ्रष्ट मंडळींना सळो की पळो करणे हाच एक संविधानात्मक उपाय-पर्याय आहे. देश व दुनिया बर्बाद करायला निघालेल्या या बकासुरांना आवर घालण्यासाठी आताच निश्चय व संघटन केले, तरच गांधी-आंबेडकरांच्या स्वप्नातील भारत निर्माण करता येईल. संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे नि अपेक्षित कर्तव्याचे पालन करणे ही खरी देशभक्ती, निसर्ग व मानवसेवा आहे. कहर म्हणजे सरंजामी खुलंखली जात-धर्म-वंशवर्चस्ववादी भांडवली व तथाकथित समाजवादी व्यवस्थेची ही बांडगुळी गोळाबेरीज आहे. निवडणुकांच्या धूर्त खेळीद्वारे कोणताही पक्ष व पक्षांची युती वा आघाडी सत्ताधीश बनली तरी केवळ गडी बदलतात, सत्ता-संपत्ती खेळ मात्र तोच जारी राहतो.

**महाराष्ट्राची अधोगती :**

महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक औद्योगिकृत व शहरीकरण




## नीतिमूल्ये अन् आदर्श होताहेत नेस्तनाबूत

भ्रष्टाचाराच्या महाउद्योगातून जमवलेल्या मायापुंजीच्या रक्षण व वाढीसाठीच सत्ताटोळके अहोरात्र युक्त्या-क्लृप्त्या करत राहते. गल्लीपासून दिल्लीपर्यंत लहानमोठ्या कचेरीपासून मंत्रालयाच्या सर्व मजल्यांवर समस्त यंत्रणा यातच आकंठ बुडालेली असते. जनता, लोकहित हे फक्त विधिमंडळे व संसदेतले वाक्प्रचार झाले आहेत. बकासुरांचे हे राज्य सर्व काही फस्त करत आहे. भ्रष्टाचाराचा हा राक्षस सर्व लोकशाही संस्थांना अंकित ठेऊन स्वातंत्र्य चळवळीची तमाम नीतिमूल्ये व आदर्श नेस्तनाबूत करत आहे.

झालेले राज्य असून मुंबई महानगरपालिकेला आगळेवेगळे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय वलय आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या भारताच्या दहा टक्के आहे. मात्र, राष्ट्रीय उत्पन्नात आपल्या राज्याचा हिस्सा पंधरा टक्के आहे. अर्थात, राज्यात कमालीची आर्थिक विषमता असून कुपोषण, झोपडपट्टीत राहणारी लोकसंख्या, शेतकरी व शेतमजुरांची आत्महत्या यात महाराष्ट्राची संख्या व टक्केवारी सर्वाधिक असणे ही अत्यंत नामुष्कीची व शरमेची बाब आहे. कितीही अप्रिय वाटले, तरी हे कटू सत्य आहे.

महाराष्ट्रातील जमीनव्यवहार, गृहनिर्माण, सिंचन-रस्ते व अन्य प्रकल्प, बांधकामे, व्यापारी संकुलांच्या उभारणीची महाकाय बांधकामे, त्याची कंत्राटे, परवाने, परवानग्या, शासकीय निमशासकीय नोकऱ्या, बदल्या हा एक अगडबंब महाव्यवहार आहे. त्यातील भ्रष्टाचारही तेवढाच प्रचंड मोठा आहे. आता सध्या आपल्या राज्यात मंत्री व नोकरशहा, आजी-माजी राज्यकर्ते यांच्यात जो जोरदार कलगीतुरा चालला आहे, तो या हिमनगाचा दृश्य भाग आहे. केंद्र व राज्यात सध्या वेगवेगळ्या हितसंबंधांची (पक्षीय व धनिक) सरकारे असल्यामुळे दररोज नवनवीन, अधिकाधिक गंभीर घोटाळे प्रगट होत आहेत, हेही नसे थोडके! खरं तर, या सुरस व चमत्कारिक भ्रष्ट व्यव्हार व लाग्याबांध्यांची ही मालिका न संपणारी आहे. कोळशाच्या खाणीत संगमरवर शोधण्याचा हा प्रकार नाही का?

यासंदर्भात मुख्य प्रश्न हा आहे, की याचे कूळ-मूळ नक्की कोण

व केव्हा शोधणार? या सर्व भ्रष्ट व्यवहारांतील मालमत्ता व माणसे देशपरदेशात पलायन करणार, की सर्व चोर बिनबोभाट तडजोड करून नवी युती व आघाडी करत जनतेला मुर्ख बनवत राहणार? विधायिका (संसद व विधिमंडळे) आणि कार्यपालिकांची सध्याची अवस्था महाभ्रष्ट पेंढाऱ्यांची प्रभावळ अशी आहे.

**न्यायसंस्थेचे विशेष दायित्त्व :**

न्यायपालिकेत काही निष्पक्ष, सुज्ञ न्यायाधीश आहेत. मात्र, ते फक्त व्यासपीठावरून 'सत्तेला सत्य सांगा' असे आवाहन जनतेला करत आहेत! त्यांच्या कक्षेतील न्यायिक अधिकारांचा निर्भयपणे वापर करण्यास ते कचरतात... अन्यथा राफेल, निवडणूक रोखे, नागरिकत्व कायदे, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण, मानव अधिकार याबाबत त्यांनी शिघ्रतेने पुढाकार घेऊन संविधानातील समता, स्वातंत्र्य, व्यापक लोकहित, रोजगार, उत्पन्न, संपत्ती व संसाधनांचे केंद्रीकरण रोखणे या संविधानाच्या मूलभूत संरचनेचे (बेसिक स्ट्रक्चर) निष्ठेने जतन केले असते. पॅगसेसप्रकरणी घेतलेल्या भूमिकेने काही आशा जाणवते... खरं तर प्रगल्भ न्यायिक सक्रियतेला भरपूर वाव व संधी आहे. आता स्वत: होऊन सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांनी समता व शाश्वतता (इक्विटी ॲन्ड सस्टेनेबिलिटी) या दोन मौलिक संविधानात्मक मूल्ये व निकषांच्या आधारे नैसर्गिक, वित्तीय, राजकोषीय, तंत्रज्ञान, संसाधने तसेच श्रम, मानवी कौशल्य या संसाधनांचा वापर वसुंधरा व मानवजातीच्या रक्षणासाठी, संवर्धनासाठी करण्याचे नवन्यायशास्त्र (न्यू ज्युरीसप्रुडन्स) विकसित करत गरीब-गरजूंना तत्परतेने न्याय दिला पाहिजे. २१ व्या शतकाचा हा युगधर्म असून न्यायसंस्थेने हे आव्हान जाणीवपूर्वक स्वीकारले तर स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात न्यायसंस्थेचे भरीव योगदान ठरेल. न्या. भगवती, न्या. कृष्णा अय्यर, न्या. ओ. चिन्नरप्पा रेड्डी आणि अन्य काही न्यायमूर्तींनी सत्तर व ऐंशीच्या दशकात चाकोरीबाहेर जाऊन केले, ते आता नव्या संदर्भात करणे ही काळाची गरज आहे.

**माध्यमांची भूमिका :**

माध्यमांनी विशेषत: वृत्तपत्रे व नियतकालिकांनी सरपंच, नगरसेवकांपासून मंत्री, मुख्यमंत्री, पंतप्रधानांच्या तसेच औद्योगिक उत्पादने व अन्य वस्तू व सेवांच्या पानभर जाहिराती छापण्यापेक्षा जनतेचे ज्वलंत प्रश्नांवर प्रबोधन, लोकशिक्षण करण्यावर भर द्यावा. भ्रष्टाचार, अनागोंदी व अकार्यक्षम कारभाराबाबत बातम्या व भूमिका मांडण्याचे काम सध्याच्या व्यापारी गर्तेतही काही निवडक वृत्तपत्रसमूह निष्ठेने व धैर्याने करत आहेत. अर्थात, राजकारणाचे तसेच शिक्षण व्यवस्थेचे सुमारीकरण-व्यापारीकरण-विकृतीकरण झाल्यामुळे वृत्तपत्रांनी अधिक नेटाने काम केले तरच लोकशाहीव्यवस्था तग धरू शकेल. खेदाची बाब म्हणजे, बहुसंख्य माध्यमे ही विकासाच्या गोंडस नावाने नैसर्गिक संसाधनांच्या बर्बादीकडे डोळेझाक करत आहेत. हवामान अरिष्ट लक्षात घेऊन वाढविस्तारवादी विकास प्रारूपाला तत्काळ सोडचिठ्ठी देणे अत्यावश्यक आहे. वृत्तपत्र असो की अन्य माध्यमे, हा मनमानी नफेखोरीचा सुरक्षित धंदा नाही; तर ती वसुंधरा व मानवहित रक्षणसेवा आहे, हे या बड्या आसाम्यांना केव्हा कळेल नि वळेल?




### व्यवस्था परिवर्तनाचा संकल्प हवा

आज देशात इमानदार पुढाऱ्यांऐवजी पेंढाऱ्यांचा, मस्तवाल धनदांडग्यांचा, भ्रष्ट नोकरशाही, भाडोत्री व्यावसायिक व पोटभरू विद्वजनांचा सुळसुळाट असल्यामुळे मरगळ झटकून जनतेने केवळ सत्ता नव्हे तर व्यवस्था परिवर्तनाचा संकल्प करणे, हाच एक पर्याय आहे.

**लोकशक्तीचा आसूड :**

शेवटी जो काही वांछीत बदल हवा आहे तो लोकशक्तीद्वारेच घडू शकेल. त्यासाठी आवश्यक ते जाणीवजागृतीचे काम समाजधुरीण व सार्वजनिक विचारवंत यांच्या पुढाकाराने गतिमान होऊ शकेल. विद्यार्थी-शिक्षक-सामाजिक कार्यकर्त्यांनी आपापल्या गाव, मोहल्ला, सामाजिक व सार्वजनिक कार्यक्षेत्रात 'वसुंधरा बचाव, मानव बचाव' अभियान राबवले पाहिजे. रस्तोरस्ती भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन करणे हाच अहिंसक मार्ग आहे.

गुटखा, मद्य, अमली पदार्थ, बकासुरी उपभोग, चैनचंगळवाद याविरुद्ध कृती करून हवामान अरिष्टावर मात करण्यासाठी पर्यावरणस्नेही जीवनशैली व निसर्गाविषयीचा पूज्यभाव वृद्धींगत करण्यास व्यक्तिगत व सामाजिक जीवनात सर्वोच्च अग्रक्रम दिला, तरच आज जी नैसर्गिक संसाधने शिल्लक आहेत त्याचा विनियोग आजच्या व येणाऱ्या पिढ्यांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी करता येईल. खरं तर, हे सर्व दायित्त्व देशाचे नेते, धोरणकर्ते, प्रशासनयंत्रणा, शिक्षणसंस्था, न्यायसंस्था यांचे आहे. मात्र, आज देशात इमानदार पुढाऱ्यांऐवजी पेंढाऱ्यांचा, मस्तवाल धनदांडग्यांचा, भ्रष्ट नोकरशाही, भाडोत्री व्यावसायिक व पोटभरू विद्वजनांचा सुळसुळाट असल्यामुळे मरगळ झटकून जनतेने केवळ सत्ता नव्हे तर व्यवस्था परिवर्तनाचा संकल्प करणे, हाच एक पर्याय आहे.

•••

**(लेखक विख्यात अर्थतज्ज्ञ व महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे माजी सदस्य आहेत)**

धर्माचे जोखड हे हिंदू स्त्रीच्या मानसिक गुलामीचे एकमेव कारण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील आंदोलनांमध्ये सहभागी झालेली स्त्री आज भारतातील स्त्रीमुक्ती आंदोलनाचा मुख्य चेहरा आहे. शाहीनबागच्या आंदोलनाने मुस्लिम स्त्रीचे सामाजिक आंदोलनातील संयमी खंबीरपण सिद्ध केले आहे, तर दिल्लीच्या सीमेवरील शेतकरी आंदोलनात सहभागी होऊन शीख स्त्रियांनी आपला लढाऊ व करारी बाणा पुन्हा एकदा दाखवून दिला आहे. मात्र हिंदू धर्मश्रद्ध स्त्री अशा सर्व सामाजिक व राष्ट्रीय आंदोलनांपासून कायम दूर आहे. कारण ती धर्मव्यवस्थेने लावलेल्या मानसिक गुलामीच्या पिंजऱ्यात पूर्णत: अडकली आहे.



# हिंदू स्त्री अजूनही धर्मव्यवस्थेच्या जोखडात

डॉ. मनोहर नाईक

स्त्री ही मानवी वंशाची निरंतरता संवर्धित करणारी महान शक्ती आहे. स्त्रीमुळेच मानवी जीवन प्रवाही आणि प्रभावी ठरले आहे. मानवी जीवनाच्या विकासप्रक्रियेत स्त्रीचे सर्वार्थाने फार मोठे योगदान आहे. किंबहुना स्त्रीमुळेच मानवी जीवनाला खऱ्या अर्थाने पूर्णत्व प्राप्त झाले आहे. स्त्री ही केवळ शक्ती नाही, तर जीवनशक्तीचे स्त्रोत आहे. स्त्रीमध्ये फार मोठे आंतरिक सामर्थ्य आहे. या सामर्थ्याची चिन्हं मानवी जीवन विकासाच्या वाटेवर पावलोपावली उमटलेली आहेत. तिच्या निसर्गदत्त अधिकारांची तीही स्वामिनी आहे; परंतु पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेने तिच्या स्वामित्वाचे हनन करून एकूणच जीवनव्यवहारात तिला दुय्यम दर्जा दिला आहे. भारतातील वैदिक-हिंदू धर्मव्यवस्थेने तर तिला दासांचीही दास केले आहे. राहुल सांस्कृत्यायन यांच्या 'वोल्गा ते गंगा' मधून भेटणारी स्त्री शूर आहे, कष्टाळू आहे, अतिशय धाडसी आणि जबाबदार आहे. निर्भयपणे शिकार करून आणि शेतीत राबून स्त्रीने कुटुंबाचे पालनपोषण केले आहे. स्त्रीच्या समर्पणातूनच कुटुंबसंस्था उभी झाली आहे. शेतीच्या शोधाची जननी स्त्रीच आहे. स्त्रीमुळेच मानवी समाजजीवनाला स्थिरता व दृढता प्राप्त झाली आहे.

स्त्रीच्या दृश्य-अदृश्य योगदानातूनच जगाने जीवनविकासाच्या सर्वच क्षेत्रांत अत्युच्च शिखरे पादाक्रांत केली आहेत. स्त्री ही खरंच मानवी जीवनविकासाचे मूळ आहे. तिच्यात आंतरिक सामर्थ्य अफाट आहे; परंतु पुरुषसत्ताक धर्मव्यवस्थेने तिला तिच्या सामर्थ्याची कधी जाणीवच होऊ दिली नाही. भारतात वैदिक-हिंदू धर्म जसजसा प्रबळ होऊ लागला, तसतशी भारतीय स्त्री दुर्बल होत गेली. धर्माने हळूहळू तिला अधिकारहीन केले. तिला धर्माच्या तुरुंगात कैद केले. मानसिक गुलामीच्या बेड्यांनी जखडून टाकले. तिचे स्वतंत्र अस्तित्व संपवून टाकले. तिला वस्तुरुप मानले. तिला उपभोग्य वस्तू ठरविले. धर्मव्यवस्थेची भक्कम तटबंदी उभारून तिच्या इच्छा-आकांक्षांचे व स्वप्नांचे निर्दयतेने दमन केले. मनुस्मृतीने तर-पिता रक्षति कौमारे/भर्ता रक्षति यौवने/रक्षन्ति स्वविरे पुत्रा/न स्त्री स्वातंत्र्यमर्हति: अशी स्त्रीच्या स्वातंत्र्याची विल्हेवाट लावून तिच्या गुलामीचा जाहीरनामा भारतीय समाजमनात खोलवर रुजविला. मनुस्मृतीनुसार भारतीय स्त्रीची गुलामी समाजमान्य झाली. तिनेदेखील आपले स्वतंत्र अस्तित्व भक्तिभावाने देवा-धर्मात विलीन केले आणि पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेचे दास्यत्व मनोभावे पत्करले. मुळातच सृजनशील, जबाबदार, कर्तबगार, हळवी, करारी, समजूतदार व संवेदनशील स्त्री वैदिक धर्मव्यवस्थेने अतिशय बेमालूमपणे धर्माच्या कैदखान्यात बंदिस्त केली. हिंदू धर्मशास्त्रांच्या पानोपानी तिची कुचंबणा, विटंबना व निर्भर्त्सना करण्यात आली. तिला अपवित्र, अमंगल, कुलटा, मोक्ष मार्गातील धोंड अशी नाना विशेषणे लावण्यात आली. तरीही तिने आपल्या गुलामीची प्रतिष्ठा मनोभावे जपत या अमानुष धर्मव्यवस्थेविरुद्ध ब्रदेखील काढला नाही. वैदिक-हिंदू धर्मव्यवस्थेने स्त्रीच्या माध्यमातूनच भारतीय समाजजीवनात वर्णशुद्धी, जातिभेद, श्रेष्ठ-कनिष्ठता, विषमता, अंधश्रद्धा, पुरुषीवर्चस्व अशी अमानुष संस्कृती रुजवून संवर्धित केली. त्यासाठी स्त्रीवर बालविवाह, सजातीय विवाह, बहुपत्नीत्व, पुनर्विवाह बंदी, सतीप्रथा, केशवपन, शिक्षणबंदी असे अन्यायी व अमानुष निर्बंध लादण्यात आले. शारीरिक व मानसिक गुलामी पत्करलेल्या स्त्रीनेदेखील हे धार्मिक निर्बंध विनातक्रार मान्य केले. ती या अमानुष, विकृत, अन्यायी, अत्याचारी व अविवेकी धर्म-संस्कृतीची वाहक झाली.

**उगवत्या पिढ्या केल्या वैचारिकदृष्ट्या विकलांग**

भारतीय स्त्रीने तिच्यावर लादलेल्या गुलामीचे अत्यंत भक्तिभावाने वहन केले. तिने भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक अधोगतीतही मोलाचे योगदान दिले ! कुळाचार पाळणे, रिती-भाती सांभाळणे, व्रत-

वैकल्य करणे, उपास-तापास करणे, नवस-सायास करणे, रुढी-प्रथा जपणे आणि घरदार सांभाळून संस्कारांच्या नावावर उगवत्या पिढ्या वैचारिकदृष्ट्या विकलांग करण्याचे धर्मकार्य भारतीय स्त्रीने सिद्धीस नेले. त्याग, समर्पण, मर्यादशीलता, शोषिकपणा, सहनशीलता हे तर भारतीय स्त्रीचे आंतरिक सौंदर्य आहेच; परंतु या सौंदर्याला विवेकाची अधिक जोड असती, तर भारतीय समाजाचे नीतिशास्त्र व समाजशास्त्र निश्चितच वेगळे आणि सर्वांगसुंदर झाले असते. स्त्रीमध्ये समाजात विवेकाचे, परस्पर स्नेहाचे, समतेचे, न्यायबुद्धीचे, सामाजिक ऐक्याचे वातावरण निर्माण करण्याचे फार मोठे सामर्थ्य आहे; परंतु भारतीय स्त्रीने या वैश्विक मूल्यांविषयीची आस्था आपल्या सामाजिक व्यवहारातून व वर्तनातून निर्धारपूर्वक व्यक्त केल्याचे दिसून येत नाहीत.

**वैदिक विचारसरणीने केले जेरबंद**

वैदिक विचारसरणीने देवा-धर्माचे आणि शास्त्र-पुराणांचे जाळे विणून हळूहळू भारतीय स्त्रीचे स्वातंत्र्य जेरबंद केले. तिच्यावर अतिशय जाचक धर्मबंधने लादून तिचे विश्व चूल आणि मूल एवढ्यापुरतेच मर्यादित केले. तिचा ज्ञानक्षेत्रांशी येणारा संबंध तोडला. स्त्री ही केवळ वासनापूर्ती करणारी, सतत सेवेत राहणारी व आज्ञापालन करणारी गुलाम आहे, तिच्याशी नैमित्तिक प्रेमाने वागून बाकी मालकी हक्काच्या भावनेने क्रूरपणे वागले तरीही ते धर्मसंगतच आहे, ही पुरुषी मानसिकता वैदिक-हिंदू धर्माने समाजमनात खोलवर रुजविली आणि आपल्याला देवानेच दुबळे, परावलंबी व पतिपरमेश्वराच्या सेवेसाठी जन्मास घातले आहे. त्याच्या सेवेत, आज्ञेत व समर्पणातच आपला स्वर्ग आहे, अशी भारतीय स्त्रीची गुलामीची मानसिकता घडविण्यात वैदिक-हिंदू धर्मशास्त्रे कमालीची यशस्वी झाली.

**महात्मा फुल्यांचे धर्मसत्तेला आव्हान**

इंग्रजी राजवटीने स्त्रियांच्या यातनापर्वाला लगाम घातला. राजकीय सत्तेच्या माध्यमातून सामाजिक सुधारणांना प्रारंभ केला. अमानवीय रुढी-परंपरांना पायबंद घातला. सती प्रथेविरुद्ध कायदा केला. सार्वत्रिक शिक्षणाला सुरुवात केली. या शिक्षणाच्या महाद्वारातूनच भारतात आधुनिक युगाचा प्रवेश झाला. आधुनिक जीवनमूल्यांनी झपाटलेली नवशिक्षितांची एक सुधारणावादी फळी पुढे आली. या फळीतील अनेकांनी भारतीय समाजमनात नवीन मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न केला. याच फळीतून पुढे आलेले समाजक्रांतीचे अग्रदूत महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या ज्वालाग्राही विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देऊन भारतात आधुनिक युगाचा पाया घातला. त्यांनी स्त्रीशिक्षणाद्वारे स्त्रीमुक्तीचे आंदोलन सुरू करून धर्मव्यवस्थेला जबरदस्त आव्हान दिले. धर्मव्यवस्थेचे सर्व निर्बंध झुगारून सनातन्यांविरुद्ध रणशिंग फुंकले. एकोणिसाव्या शतकात आणि तेही पुण्यासारख्या कर्मठ शहरात धर्ममार्तंडांशी झुंज देणे हे ज्योतिबा फुले यांचे महान क्रांतिकारकत्व आहे. ते आधुनिक भारतात स्त्रीशिक्षणाचा पाया घालणारे आद्य क्रांतिकारक आहेत. ते केवळ स्त्रीशिक्षणाचा पाया घालून थांबले नाहीत, तर त्यांनी या स्त्रीमुक्ती आंदोलनाला अतिशय मूलगामी व व्यापक स्वरुप दिले. त्यांनी भारतीय स्त्रीला धर्मबंधनांतून मुक्त करण्याकरिता सनातन्यांचा रोष ओढवून घेतला, स्वत:चा जीव संकटात टाकला, घरदार सोडले, आपले कुटुंबजीवन समर्पित केले. सहचारिणी सावित्रीबाईंना या क्रांतिकार्यात उतरवून त्यांनी स्त्रीशक्तीचा सन्मान केला. स्त्रीशक्तीच्या हाती त्यांनी विद्यादानाची सूत्रे सोपविली. सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख या हिंदू-मुस्लिम धर्मपीडित स्त्रियांना एकत्रितपणे शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले. सावित्रीबाई फुले यांना आधुनिक भारतातील आद्य स्त्रीशिक्षिका म्हणून घडवले. बालविवाह, बाल-जरठ विवाह, जबरदस्तीचे मातृत्व, सतीप्रथा आणि केशवपन या कुप्रथांविरूद्ध खंबीरपणे उभे राहत महात्मा फुल्यांनी सावित्रीबाईंना सोबत घेऊन पुण्यात 'बालहत्या प्रतिबंधक गृह' स्थापन केले. विधवा विवाहासाठी जनजागरण केले. बाला-जरठ विवाहाला विरोध केला. सती प्रथेविरुद्ध रान उठवले. केशवपनाविरुद्ध पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला. समाजाच्या शिव्या-शापाचा, चिखल-शेणाचा, दगड-धोंड्यांचा हिनकस वर्षाव अतिशय धीरोदात्तपणे झेलत सावित्रीमाईंनी शिक्षणाची ज्योत भारतीय स्त्रियांच्या मनामनात पेटविली. ही ज्ञानज्योत सनातन धर्माच्या वावटळीत विझून जाऊ नये म्हणून त्यांनी आपल्या जीवाचा पदर केला. अज्ञानाच्या अंधःकाराला आग लावून त्यांनी भारतीय स्त्रियांच्या जीवनात शिक्षणाचे नवे प्रकाशयुग जन्मास घातले. प्रतिकुल काळात स्त्रियांचे मातृ-पितृछत्र बनून फुले दाम्पत्याने एकोणिसाव्या शतकात स्त्रीमुक्तीचा पाया घातला.

**महिला सबलीकरणाचे प्रणेते डॉ. आंबेडकर**

विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता आणि मानवतावादी विचारांच्या पायावर स्त्रीशक्तीची भक्कम इमारत उभारली. अखंड व्यासंगाने, अथांग ज्ञानाने आणि पाश्चिमात्य मुक्त जीवनशैलीच्या अनुभवाने त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन पूर्णत: लोकशाहीनिष्ठ झाला होता. धर्म, वंश, जात, वर्ण, भाषा, लिंग या सर्व भेदांना छेद देऊन त्यांनी नवसमाजनिर्मितीचा ध्यास घेतला होता. धर्मव्यवस्थेने वस्तुरुप ठरविलेली स्त्री डॉ. बाबासाहेबांनी आंदोलनांच्या व सत्याग्रहांच्या माध्यमातून समाजक्रांतीच्या लढ्यात उतरवली. स्त्री ही कुटुंबाची आणि समाजाची आद्य संस्कारशाळा आहे आणि तिच्यात समाजबदलाचे अद्भूत सामर्थ्य आहे, ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती. या स्त्रीशक्तीला धर्मबंधनांतून मुक्त करणे, स्त्रीला मूलभूत अधिकार मिळवून देणे, प्रतिष्ठेचे व सन्मानाचे स्थान मिळवून देणे आणि स्त्रीचे

**प्रदूषित दृष्टिकोन मनात रुजलेला**

शोषणव्यवस्थेला आव्हान देणे धर्माच्या दृष्टीने अपराध आहे आणि हाच प्रदूषित दृष्टिकोन धर्मव्यवस्थेने भारतीय स्त्रियांच्या मनात खोलवर रुजविला आहे. हा प्रदूषित दृष्टिकोनच अनेकदा भारतीय स्त्रीच्या वर्तनातून उगवताना दिसतो... अन्यायाचा प्रतिकार करतानादेखील भेदभावाचा विकार उद्भवताना दिसतो... निर्भया प्रकरणात मेणबत्या हातात घेऊन रस्त्यावर आलेली स्त्री आसिफा आणि मनिषा वाल्मिकी प्रकरणात भेदभावाचा अंधार पांघरूण कोपऱ्यात दडलेली दिसली... हे अतिशय वेदनादायी वास्तव आहे. भारतातील धर्मश्रद्ध स्त्रीचे मन असंख्य देव-देवता, संत, महंत, बाबा, बुवा, जाति-पाती, रुढी, प्रथा, परंपरा, पूजा-अर्चा, नवस-सायास, उपास-तापास, जप-जाप्य, कर्मकांड या सर्व भूलभुलैय्यात हरवून गेले आहे.

अधिकार तसेच एकूणच जीवन कायद्याने संरक्षित करणे हे त्यांचे प्रामाणिक ध्येय होते. या ध्येयसिद्धिसाठीच त्यांनी आपल्या बुद्धीमत्तेचा व प्राप्त अधिकारांचा पुरेपूर वापर केला होता. इंग्रज सरकारमध्ये मजूरमंत्री असताना त्यांनी महिलांना समान काम समान वेतन, कामाच्या ठिकाणी संरक्षण, महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कामाच्या पाळीत बदल, प्रसूतिरजेची तरतूद इत्यादी सुविधा निर्माण केल्या. परकीय सत्तेत मंत्रिपदाच्या मिळालेल्या संधीचा उपयोग त्यांनी भारतीय स्त्रीच्या सशक्तिकरणाकरिता आणि कल्याणाकरिता केला.

स्त्रीच्या अधिकार संपन्नतेवरून आणि सामाजिक सुरक्षेवरून राष्ट्राचा नैतिक व प्रागतिक दर्जा ठरतो, ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची व्यापक भूमिका होती. त्यातूनच त्यांनी प्रकृती साथ देत नसतानाही महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक संरक्षणाची सनद असलेलं हिंदू कोड बिल बलवलं; परंतु सनातन्यांच्या विरोधामुळं ते लगेच संसदेत मंजूर होऊ शकलं नाही. त्यामुळे बाबासाहेबांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. तथापि, आज त्याच बिलातील तरतुदी टप्प्याटप्याने राजकीय अपरिहार्यतेतून का होईना, लागू केल्या जात आहेत. यातून महिलांचं खऱ्या अर्थानं सबलीकरण होत आहे. याचं सर्वस्वी श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाच जातं.

**धर्माच्या चौकटीत गुलामीचे जिणे**

तसे भारतीय स्त्रियांनी अनेक गोष्टी डोळसपणे लक्षात घेण्याची नितांत आवश्यकता आहे. मात्र वैदिक-हिंदू धर्मव्यवस्थेने त्यांच्या मूलभूत अधिकारांचे हनन केल्यामुळे त्यांचे स्वत्वभान जागे झाले नाही. त्यामुळे स्वतंत्र दृष्टीही आली नाही. पारंपारिक संस्कारांद्वारे जे आणि जसे दाखविले जाते तेच श्रद्धापूर्वक सत्य मानायचे आणि धर्माची चौकट अधिक भक्कम करत सजून-धजून गुलामीत जगत राहायचे, हा भारतीय स्त्रीचा स्थायीभाव झाला आहे. भारतीय स्त्री अजूनही मनाने मुक्त व विचाराने स्वतंत्र झालेली नाही. संवैधानिक अधिकार मिळूनही ती धर्माची चौकट ओलांडून बाहेर आलेली नाही. अजूनही ती चूल, मूल आणि त्यावर आधुनिकपणाची झूल पांघरून मानसिक गुलामीतच जगत आहे. या स्त्रियांची जाणीव आणि नेणीव संपूर्णतः धर्मभावनेने व्याप्त आहे. इथे कुठेही विचारशक्तीला जागा नाही. चाकोरीबद्ध, रुढीप्रिय परंपराभिमानी, धर्मश्रद्ध व पती-परमेश्वरशरण वृत्ती हे भारतीय हिंदू स्त्रीचे चरित्र आहे. शतकानुशतकांची धार्मिक गुलामी जनुकीय पद्धतीने येणाऱ्या पिढ्यांमध्ये प्रवाहीत होत आली आहे. मानसिक गुलामीत जगणे व त्यालाच आपले परमसुख मानणे हा या स्त्रीमनाचा क्रॉनिक आजार आहे. या आजाराने धर्मश्रद्ध हिंदू स्त्रीची मती कुंठित झाली आहे. स्वत्वभान हरपले आहे. मनोविकार बळावला आहे. या सनातन व पुरातन आजारामुळे सत्य-असत्य, योग्य-अयोग्य, हितकारक-अहितकारक यातील फरक समजून घेणारी तिच्यातील विवेकशक्ती लोप पावली आहे. आपले शोषणकर्ते कोण? आपले उद्धारकर्ते कोण? हे समजून घेणारी तिची सारासार विवेकबुद्धी धर्माच्या गाभाऱ्यात गहाण पडली आहे. त्यामुळेच धर्मश्रद्ध हिंदू स्त्रीला शोषणकर्ते वंदनीय व उद्धारकर्ते निंदनीय वाटत आले आहेत. आधुनिक भारतात स्त्रीशिक्षणाचा भक्कम पाया घालणाऱ्या आणि स्त्रीमुक्तीकरिता पित्याच्या हृदयाने ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्ध शेवटपर्यंत लढणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुल्यांविषयी हिंदू स्त्रीच्या मनात तेव्हाही फारसा आदरभाव नव्हता आणि आजही असायला हवा तेवढा दिसत नाही. केशवपन प्रथेविरुद्ध महात्मा फुल्यांनी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला, तेव्हा इंग्लंडच्या स्त्रियांनी तारेद्वारे महात्मा फुल्यांवर अभिनंदनाचा वर्षाव केला; परंतु साधी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी एकही भारतीय स्त्री पुढे आली नाही. क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाकरिता सनातन्यांच्या शिव्या-शापाचा, चिखल-शेणाचा, अर्वाच्च शब्दांचा असह्य मारा सहन केला; परंतु भारतीय स्त्रिया अपेक्षित प्रमाणात सावित्रीमाईंचे ऋण मान्य करताना दिसत नाहीत. किमान शिक्षित स्त्रियांनी तरी ज्योतिबांच्या सावित्रीभोवती कृतज्ञतेचे रिंगण घालायला हवे; परंतु या शिकल्या-सवरलेल्या स्त्रिया अतिशय भक्तिभावाने सत्यवानाच्या सावित्रीभोवती फेऱ्या घालताना दिसतात.

**उद्धारकर्त्यांविषयीच द्वेषाची भावना**

भारतीय हिंदू स्त्रियांच्या मनाभोवती धर्मांधतेचा विळखा एवढा घट्ट आहे, की त्यामुळे त्यांची विचारशक्ती विकलांग झाली आहे. मती भ्रमित झाली आहे. या भ्रमिष्टपणामुळे त्या भक्षणकर्त्यांना परम्आदरणीय व रक्षणकर्त्यांना तिरस्करणीय मानत आल्या आहेत. शोषणाधिष्ठित धर्मव्यवस्थेने धर्मश्रद्ध स्त्रीला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या पूर्णतः गुलाम केलेले आहे. या गुलामीच्या पिंजऱ्यालाच ती आपल्या मोक्षप्राप्तीचे अवकाश समजत आली आहे. हा पिंजरा ज्या ज्या मुक्तिदात्यांनी अत्यंत धाडसाने व कष्टपूर्वक तोडण्याचा प्रयत्न केला त्या सर्वांविषयी या स्त्रीवर्गाच्या मनात द्वेषाची व दूरत्वाची भावना आहे. हिंदू स्त्रीच्या मनात आजही सीतेची अग्निपरीक्षा घेणाऱ्या श्रीरामाविषयी, महिलांची छेड काढणाऱ्या श्रीकृष्णाविषयी, स्त्रीचे स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या मनुविषयी, द्रौपदीला द्युतात हरणाऱ्या पांडवांविषयी, स्त्रीवरील धार्मिक निर्बंधांचे समर्थन करणाऱ्या शंकराचार्यांविषयी, स्त्रीशिक्षणामुळे कुटुंबसंस्था धोक्यात येईल म्हणणाऱ्या बा.गं. टिळकांविषयी, स्त्रीला जननयंत्र समजणाऱ्या प्रो. रज्जूभैयांविषयी (रा.स्वं. संघाचे सरसंघचालक) श्रद्धायुक्त आदरभाव आहे. तर स्त्रीमुक्तीसाठी जिवाचे रान करणाऱ्या महात्मा फुल्यांविषयी, स्त्रीशिक्षणासाठी चिखलफेक सहन करणाऱ्या सावित्रीमाई फुल्यांविषयी, संमतीवयाचा प्रश्न उपस्थित करणाऱ्या गो.ग. आगरकरांविषयी आणि स्त्रियांना सन्मानपूर्वक संवैधानिक अधिकार बहाल करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी धर्मश्रद्ध स्त्रियांच्या मनात आकस, द्वेष व दूरत्वाची भावना आहे.

धार्मिक संस्कारांद्वारे भारतीय स्त्रियांच्या मनात असत्याविषयी, अनीतिविषयी व अविचाराविषयी श्रद्धाभाव रुजविण्यात आल्यामुळेच ती अविचारीपणे असत्याला शरण जाताना, सत्याचा मरणोत्सव साजरा करताना दिसते. व्यवस्थेविरुद्ध ज्यांनी ज्यांनी शूरता, वीरता, बुद्धिमत्ता व सत्यनिष्ठा पणाला लावली, त्या सर्वांविषयी धर्मशरण भारतीय स्त्रीच्या मनात द्वेषाची, तिरस्काराची व दूरत्वाची भावना प्रबळ झालेली दिसते. अनीतिमानतेच्या समर्थनार्थ मग ती नीतिमान व बुद्धिमान होलिकेचे दहन करण्यासाठी सजून-धजून पुढे सरसावते... तिच्या दहनाचा उत्सव साजरा करण्यासाठी हसत खिदळत रंग उधळते... नवरात्रात नऊ दिवस नऊ रंगांच्या नऊ साड्या परिधान करण्यात उत्साह दाखविणाऱ्या स्त्रीला सावित्रीमाई फुले यांच्या जीवनचरित्राची नऊ पाने वाचायला जीवावर येते.

•••

**(लेखक साहित्यिक आणि समीक्षक आहेत)**

# समाजभान असलेला विचारवंत : प्राचार्य नागोराव कुंभार



(व्यक्तिविशेष)

प्रतिनिधी

अठराविश्वे दारिद्र्यातही अपार संघर्ष करीत यशाचं सर्वोच्च शिखर सर करणारे प्राचार्य नागोराव कुंभार हे महाराष्ट्रातल्या परिवर्तनवादी चळवळीतलं एक अग्रगण्य नाव आहे. प्राध्यापक, पत्रकार, प्राचार्य, विचारवंत, समाजभान असलेला उदारमतवादी आणि लोकशाहीवादी वक्ता-लेखक, समाजशिक्षक, ज्ञानप्रसारक, संविधानातील जीवनमूल्यांचा रक्षक अशा असंख्य बिरूदांनी विभूषित असलेलं हे व्यक्तिमत्व. आज सत्तरीत असूनही तरूणाला लाजवेल अशा ऊर्मीने काम करणारे डॉ. कुंभार हे असंख्य विद्यार्थ्यांचे प्रेरणास्त्रोत आणि समवयस्कांचे मार्गदर्शक आहेत.

स्वामी विवेकानंद म्हणतात, ज्ञान म्हणजे केवळ स्वतःच्या आनंदाची आणि मोक्षाची साधना नसून लोकांच्या हिताचा त्यात अंतर्भाव असला पाहिजे. प्राचार्य नागोराव कुंभार यांनी केलेली ज्ञानसाधना ही विवेकानंदांच्याच संकल्पनेतील ज्ञानसाधना आहे, जी लोकहिताला केंद्रीभूत मानणारी आहे. गरिबीचे चटके सोसत आकाशाला गवसणी घातलेल्या या विचारवंताने आपल्या पदाचा आणि आपल्या जवळील संसाधनांचा उपयोग वंचितांच्या उत्थानासाठी यथाशक्ती केला. सेवानिवृत्तीचं आयुष्य जगत असताना आजही अभावग्रस्तांना संधी आणि सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांची धडपड असते.

मराठवाड्यातील फार कमी महाविद्यालयांमध्ये शिकवला जाणारा तत्त्वज्ञान हा त्यांचा विषय. तब्बल ३९ वर्षे या विषयाचं अध्यापन करत हजारो विद्यार्थी घडवणाऱ्या या विद्याधराने केवळ समर्पित शिक्षक म्हणूनच जबाबदारी पार पाडलेली नाही, तर समाजात फुले-शाहू-आंबेडकरी विचारांची पेरणी करून प्रागतिक विचारांचा समाज घडवण्यात मोलाची भूमिका बजावलेली आहे.

नांदेड जिल्ह्यातील मुखेड येथे २६ जून १९५२ रोजी अत्यंत गरीब कुटुंबात त्यांचा जन्म झाला. जिद्द आणि कष्टाच्या बळावर प्रतिकुल परिस्थितीवर मात करीत त्यांनी अगदी पीएचडीपर्यंतचं शिक्षण घेतलं. नांदेड जिल्ह्यातील देगलूर महाविद्यालयात पदवीचं शिक्षण घेताना त्यांना प्रारंभीच्या काळात अडचणींचा सामना करावा लागला; परंतु ग्रामीण आणि गरीब कुटुंबातील मुलांना शहरात राहून शिक्षण घेणं खूप अवघड असतं, याची जाणीव असलेले तत्त्वचिंतक प्राचार्य हेमचंद्र धर्माधिकारी यांच्या पाठबळामुळं नागोराव कुंभार यांना पदवीचा प्रवास सुकर झाला; नव्हे, धर्माधिकारी यांनीच त्यांचं पालकत्व स्वीकारल्यामुळे पदवीचं (बीए) तारू यशस्वीरित्या किनारी लागलं. प्राचार्य धर्माधिकारी यांच्या सहवासातच देगलुरात नागोराव कुंभार यांच्या व्यक्तिमत्वाला आणि विचारांना पुरोगामित्वाचं कवच लाभलं. पुणे विद्यापीठात पदव्युत्तर पदवीचं शिक्षण घेत असताना ध्येयवादी व कृतिशील तत्त्वज्ञ डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांचा सहवास त्यांना लाभला. सामान्य माणसाबद्दल कणव आणि तळमळ असलेल्या या शिक्षणतज्ज्ञाच्या सान्निध्यात नागोराव कुंभार यांचं अनुभवविश्व आणि विचारविश्व विस्तारत गेलं.

## पुरस्कार आणि व्याख्याने

लोकराज्य संस्थेचा जीवनगौरव पुरस्कार आणि नवी दिल्लीच्या आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि व्यवस्थापन संस्थेच्या उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कारासह प्राचार्य नागोराव कुंभार यांना दोन डझनांवर पुरस्कार मिळाले आहेत. राज्यभरात विविध संस्था आणि महाविद्यालयांतर्फे आयोजित चर्चासत्रं, व्याख्याने, शिबिरांमधून त्यांनी व्याख्याने दिली. कुराणातील मूल्यविचार, शिक्षणाची उद्दिष्टे, राष्ट्रीय सेवा योजना व समाज परिवर्तन, मानवी जीवनात तत्त्वज्ञानाचे महत्त्व, राजकीय तत्त्वज्ञान, परिवर्तनवादी चळवळीसमोरील आव्हाने, जैनांचे नीतिशास्त्र, बहुजन साहित्यिकांची भूमिका यांसह विविध विषयांवर सुमारे १७० कार्यक्रमांमधून त्यांनी व्याख्याने दिली. अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांचे आयोजन त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

### विवेकशीलता आणि सहृदयता

स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या माणसाला खूप काही सहन करावं लागतं. प्राचार्य नागोराव कुंभार यांनी परिस्थितीचे चटके सोसत स्वतःला घडवलं आणि समाजात स्वतःचं एक वेगळं स्थान निर्माण केलं. सुहास्य वदनानं स्वागत करणारी त्यांची प्रसन्न छबी, त्यांच्यातील विवेकशीलता आणि सहृदयता ही गुणमालिका त्यांच्यातल्या सहिष्णुतेनेच साध्य झाली. विद्यापीठ असो, वसंतनगरचे ग्रामीण महाविद्यालय असो किंवा जिथं दीर्घकाळ सेवा

बजावली ते लातूरचे म. बसवेश्वर महाविद्यालय असो, अशा सर्वच ठिकाणी ते विद्यार्थी, मित्र आणि सहकाऱ्यांचा गोतावळा वाढवत राहिले. या गोतावळ्याची ऊर्जाच त्यांच्या आयुष्याला बळ देत आली आहे.


शिक्षण हा त्यांच्या चिंतनाचा प्रमुख विषय आहे. माणसातील सामाजिक आणि नैतिक मूल्यांच्या जाणिवा प्रगल्भ करण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे, ही त्यांची भूमिका. ज्ञानी आणि सद्गुणी शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या कर्तृत्वावरच महाविद्यालयांचा, विद्यापीठांचा शैक्षणिक विकास अवलंबून असतो. या विचारातूनच त्यांनी प्राचार्य म्हणून काम करताना ज्ञानी आणि गुणी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी परिश्रमपूर्वक तयार केले. चर्चासत्र, परिसंवाद, वार्षिक स्नेहसंमेलने अशा विचारपीठांवर महाराष्ट्रातील प्रख्यात विचारवंत, लेखक, कवी, कथाकार आणि समीक्षकांना आमंत्रित करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले, त्याचबरोबर शैक्षणिक प्रगतीसाठी पूरक वातावरण तयार करत राहिले. केवळ खुर्चीला भार असलेले आणि महिन्याच्या पगाराचे धनी असलेले अनेक प्राचार्य महाराष्ट्रात आहेत. प्राचार्य कुंभार यांनी मात्र सतत अभ्यास, चिंतन, मनन, संशोधन आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थी घडवण्याचं काम केलं.

### विद्यापीठाच्या उभारणीत योगदान

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या उभारणीत त्यांचा महत्त्वाचा सहभाग राहिला आहे. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांनी डॉ. नागोराव कुंभार यांची गुणवत्ता, कर्तव्यतत्परता आणि नवोपक्रमशीलता हेरून त्यांना सामाजिकशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता केले. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य म्हणूनही नियुक्ती केली. या संधीचं सोनं त्यांनी केलं. प्राध्यापकांच्या गुणवत्ता वाढीवर भर देतानाच संशोधनाला प्रेरणा दिली. संशोधनासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या. प्राध्यापकांना उत्प्रेरित करून अभ्यासाला लावले. विद्यापीठ हे ज्ञानकेंद्राबरोबरच संशोधन केंद्रही व्हावे, अशी त्यांची धारणा होती. विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान मिळण्याच्या उद्देशाने त्यांनी अभ्यासक्रमात आणि परीक्षा पद्धतीत बदल करण्याचे धाडसी निर्णय घेतले. एकूणच विद्यापीठाच्या प्रगतीत प्राचार्य नागोराव कुंभार यांचं मोलाचं योगदान राहिलं.

### विचारशलाका : एक परिवर्तनवादी चळवळ

अध्यापनाबरोबरच विचारशलाका या त्रैमासिकाच्या माध्यमातून महाराष्ट्रात परिवर्तनवादी चळवळ त्यांनी सुरू केली. समाजातील सर्वच घटकांच्या सहभागाने आजही ही चळवळ जोमाने सुरू आहे. विचारसंघर्ष आणि विचारकलह यातून वैचारिक जागृती होते, हे तत्त्व स्वीकारून विचारशलाकामध्ये सर्व प्रागतिक आणि पुरोगामी विचारांना प्राधान्य दिले जाते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यापासून ते महाराष्ट्रातल्या सर्व विद्यापीठांमधील संशोधक, अभ्यासकांचे लिखाण या त्रैमासिकात प्रसिद्ध करण्यात आले आहे. नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. ना.य. डोळे, डॉ. स.रा. गाडगीळ, डॉ. भास्कर भोळे, डॉ. स.मा. गर्गे अशा नामवंत लेखकांनी विचारशलाकामध्ये लिहून वाचकांची वैचारिक बैठक मजबूत केली. खऱ्या अर्थाने विचारशलाकाने वैचारिक लिखाण करणारा लेखकवर्ग बहुजन समाजातून निर्माण केला.



## विपुल ग्रंथसंपदा

प्राचार्य नागोराव कुंभार हे एक समृद्ध अनुभवविश्वाचे धनी आहेत. त्यामुळे त्यांच्या बहुआयामी प्रतिभेने सामाजिक विषयावरील अनेक ग्रंथ साकारले. आरक्षण का व कसे?, भ्रष्टाचार स्वरूप व संदर्भ यांसह एकूण १२ ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. 'महात्मा गांधीजींची स्वराज्याची संकल्पना' हा त्यांच्या संशोधनाचा विषय असल्यामुळे त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांमध्ये प्रामुख्याने महात्मा गांधींवरील पुस्तकांचा समावेश आहे. त्यांनी ५१ ग्रंथ संपादित केले आहेत. यामध्ये १९९१ साली प्रसिद्ध झालेला 'मंडल आयोग : शोध आणि बोध' हा ग्रंथ विशेष लोकप्रिय ठरला. अनेक पुस्तकांना त्यांच्या प्रस्तावना लाभल्या आहेत. त्यांचे सुमारे ३८ शोधनिबंध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झालेले आहेत.

### गुणात्मक वाटचाल

विचारशलाकाचा प्रत्येक अंक विशेषांकच असावा, या संपादकीय भूमिकेमुळे प्राचार्य नागोराव कुंभार यांनी वाङ्मयमूल्ये जपणारे अनेक दर्जेदार विशेषांक काढले. यामध्ये धर्मनिरपेक्षता, भूकंप, मंडल आयोग, इंग्रजी साहित्य, महाराष्ट्राचं राजकारण, लोकसभा निवडणूक, बौद्ध तत्त्वज्ञान अशा समाजजीवनाला स्पर्श करणाऱ्या विषयांवरील विशेषांकांचा समावेश आहे. महाराष्ट्र फाऊंडेशन आणि महाराष्ट्र साहित्य परिषद यांसह अनेक संस्थांच्या पुरस्कारांनी या त्रैमासिकाला गौरवले. हा गौरव म्हणजे विचारशलाकाच्या जवळपास तीन तपांच्या गुणात्मक वाटचालीवर शिक्कामोर्तबच होय.


### अनेक पदे भूषवली :

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अनेक समित्यांमध्ये ते कुलगुरू प्रतिनिधी होते. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र मंडळाचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. महाराष्ट्रातल्या अनेक विद्यापीठांच्या वेगवेगळ्या समित्यांवर सदस्य म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. राज्य मागासवर्ग आयोगाचेही ते सदस्य होते. •••

# भारतीय समाजाच्या भवितव्याची चिंता वाहणारा ग्रंथ 'वंचितांचे वर्तमान'



प्रा. डॉ. गौतम खुशालराव कांबळे




ग्रंथ परिचय

प्रस्तुत ग्रंथात गरिबी आणि कुपोषणाची निरंतर समस्या, अल्पसंख्यांक व इतर सामाजिक वर्गाचे मागासलेपण, संपत्तीतील विषमता, बेरोजगारीची वाढती समस्या, शिक्षण-घर आणि पाणीमधील विषमता, अस्पृश्य व जातीय भेदभावाची समस्या, राष्ट्रवाद व हिंदुत्वाची पुनर्व्याख्या, धोरणाच्या पुनर्विचाराची गरज, डॉ. आंबेडकर आणि दलितांचे समाजकारण व राजकारण, अशा महत्त्वपूर्ण मुद्यांची चर्चा केली आहे. प्रस्तुत ग्रंथ दै. लोकसत्ताने 'वंचितांचे वर्तमान' या सदराखाली आंतरराष्ट्रीय स्तरावरील अर्थशास्त्रज्ञ तसेच देशातील सामाजिक-आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्राच्या मूलभूत समस्यांचे विश्लेषक-चिंतक प्रा. डॉ. सुखदेव थोरात यांनी लिहिलेल्या अशा एकूण ५६ लेखांचे संकलन आहे. हा ग्रंथ मुंबईच्या लोकवाङ्मय गृहाने प्रकाशित केला आहे.

या ग्रंथामध्ये महाराष्ट्रातील दलित-आदिवासी, इतर मागासवर्गीय, भटके-विमुक्त, धार्मिक अल्पसंख्य-मुस्लिम, बौद्ध तसेच महिला अशा सर्व गरीब व सामाजिकदृष्ट्या वंचित समाजघटकांकडे अधिक प्राधान्याने लक्ष दिले गेले आहे. मात्र कमी-अधिक प्रमाणात संपूर्ण देशात या गरीब-वंचित समाजासोबत काय घडत आहे याची पूर्ण जाणीव ग्रंथ वाचताना सातत्याने होत राहते. ग्रंथातील काही वाक्ये तर सतत अस्वस्थ करीत राहतात, जसे- 'प्रतिव्यक्ती उत्पन्नाच्या वाढीच्या बाबतीत महाराष्ट्र देशातील सर्वात श्रीमंत राज्य आहे, मात्र उत्पन्नातील उच्चवाढ ही भूक, कुपोषण व दारिद्र्य सोबत घेऊन वावरत आहे.' 'महाराष्ट्राचे वैशिष्ट्यच असे आहे, की श्रीमंती ही उपासमार व गरिबीच्या सान्निध्यात वसते.' ग्रंथाचा मुख्य भाग (भाग १ ते ६ व भाग ८) महाराष्ट्रातील गरिबी, उपासमार आणि असमानतेच्या समस्येवर आणि त्यांचे निराकरण यावर अत्यंत मौलिक चर्चा करतो. १९९० ते २००० या दशकात झालेल्या उत्पन्नवाढीतील मिळकतीचा हिस्सा महाराष्ट्रातील व संपूर्ण देशातील गरीब व श्रीमंत वर्गात असमान पद्धतीने वाटला गेल्याचे निरीक्षण हा ग्रंथ परखडपणे नोंदवतो, हे त्याचे मुख्य वैशिष्ट्य आहे. या दृष्टीने लेखकाने राज्याच्या व देशाच्या विकासप्रारुपावर व संबंधित धोरणावर घेतलेला आक्षेप दखल घेण्यासारखाच आहे. महाराष्ट्रातील गरिबीसंदर्भात लेखकाने नोंदवलेले वास्तव विचार करण्यासारखे आहे. त्यांच्या निरीक्षणानुसार, महाराष्ट्राच्या उत्पन्नातील वाढ जी आधीच कमी गरिबाभिमुख आहे, ती आता अधिकच कमी गरिबाभिमुख व कमी गरिबी दूर करणारी झाली आहे. याचे दूरगामी दुष्परिणाम संपूर्ण भारतीय समाजावर व त्यातही देशातील दलित-शोषित-वंचित समाजावर होणार, हे निश्चित.

ग्रंथाच्या दुसऱ्या भागात 'राष्ट्रवाद व हिंदुत्वाची पुनर्व्याख्या' या विषयावर चर्चा करण्यात आली आहे. 'देशातील वर्तमान राजकीय व सांस्कृतिक परिस्थिती' या विषयावर चर्चा करणे खरे तर धाडसाचे व जोखमीचेच आहे. मात्र लेखकाने असे धाडस करून जोखीमसुद्धा स्वीकारली आहे, हे महत्त्वाचे आहे. कदाचित हे काम कुणीतरी पुढे येऊन केले पाहिजे, या कर्तव्यभावनेतून ते केले असावे. मात्र लेखकाने केलेली ही चर्चा संपूर्णपणे वैचारिक, तर्कसंगत व नाविन्यपूर्ण झाली आहे. या चर्चेत ब्राह्मणवाद : दुसऱ्या प्रतिक्रांतीच्या उंबरठ्यावर..., हिंदुत्वाची पुनर्व्याख्या : स्वेच्छेनेच, की...; शबरीमला : धार्मिक सुधारणांसाठी धडे; कायदा हातात घेणाऱ्या झुंडींचा हिंसाचार...; सर्वसमावेशक राष्ट्रवादाच्या पूर्व अटी...; सुधारकांबद्दल आदर, त्यांच्या शिकवणुकीकडे पाठ; समाजसुधारक चळवळीचा वारसा जपू या... ही प्रकरणे तर अत्यंत धारिष्ट्यपूर्ण व सर्व समाजाची झोप उडवणारी आहेत. या मुद्यांवरील चर्चेत लेखकाने, एकेकाळी सामाजिक परिवर्तनाची व प्रागतिक विचारांची मशाल घेऊन मार्गक्रमण करणारे पुरोगामी महाराष्ट्र राज्य आता हिंदुत्वावर आधारित हिंदू राष्ट्रासाठी राजकीय व सामाजिक चळवळीमध्येही अग्रभागी व अग्रेसर राहिले आहे, असे निरीक्षण नोंदवले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला देश सांप्रदायिक/जातीय बहुसंख्यत्वाकडे (Communal Majority) जाण्याचा धोका किंवा काही

वर्षांपूर्वी डॉ. श्रीराम लागू या समाजचिंतकाने व्यक्त केलेला 'समाज हळूहळू एका मोठ्या खोल गर्तेत जात असल्याचा' इशारा यांची प्रकर्षाने आठवण करुन देणारे आहे. या निरीक्षणासाठी लेखकाने घेतलेले परिश्रम-दिलेले संदर्भ निश्चितच प्रशंसनीय आहेत. आणखी एक नमूद करण्यासारखी बाब म्हणजे, लेखकाने या ग्रंथासाठी जी दीर्घ प्रस्तावना लिहिली तीसुद्धा संदर्भांनी ओतप्रोत भरली आहे. असे साधारणत: पहायला मिळत नाही. या संदर्भात व्यक्त केलेली वस्तुस्थिती अशी की 'व्यवस्था' नेहमीच काही ऐतिहासिक घटनांकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत आली आहे. त्यातील महत्त्वाची घटना म्हणजे देशात सम्राट अशोकांच्या काळात २/३ भागात व जगाच्याही जवळपास तितक्याच भागात पसरलेला बौद्धधम्म जो तथाकथित अर्थाने धर्म नाही, तर खऱ्या अर्थाने विचारधारा व आचारशैली आहे, त्याचा सम्राट बृहद्रथाच्या हत्येनंतर ब्राह्मणवादाने 'धर्म' करण्यासाठी केलेले षड्यंत्र-प्रयत्न त्यातून ब्राह्मणी धर्माची म्हणजेच हिंदू धर्माची केलेली पुनर्प्रतिस्थापना व बौद्ध धम्माची केलेली वाताहत, याचा २०२० पर्यंतचा प्रवास लेखकाने फार कौशल्यपूर्ण बुद्धीमत्तेने मांडला आहे. आंबेडकरांनी याला प्रतिक्रांती म्हटले आहे. भारतीय इतिहासाला 'बौद्ध धम्म व वैदिक ब्राह्मणीझममधील जीवघेणा संघर्ष' असे नमूद केले आहे. लेखकाने हा संघर्ष पुन्हा मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

लेखकाच्या मते, मागील पाच वर्षांपासून आम्ही पाहात आहोत, की ब्राह्मणवादावर आधारित हिंदुत्वाचा अधिक आक्रमकपणे विकास केला जात आहे. या कार्यक्रमात अब्राह्मणी धार्मिक परंपरा ज्या विविध हिंदू परंपरांचा भाग सांगितल्या जातात, त्या डावलल्या जात आहेत. त्या ब्राह्मणवादी हिंदुत्वाचा, हिंदुत्वाच्या नावावर प्रचार केला जात असून इतर धार्मिक परंपरा केवळ नावासाठी वापरल्या जात आहेत. लेखकाची ही दूरदृष्टी सामान्याचीसुद्धा होणे काळाची गरज आहे, असे वाटते. यासंदर्भात ज्येष्ठ विचारवंत डॉ. राधाकृष्णन् यांचा ''बंधुत्वाची मिठी मारून ब्राह्मणवादाने बुद्धिझमला मारून टाकले'' हा संदर्भ, किंवा स्वामी विवेकानंदाचा ''बौद्ध धम्माचा सार आत्मसात करुन हिंदू धर्माने बौद्ध धम्माला दूर फेकून दिले'' हे लेखकाने दिलेले संदर्भ हिंसक वास्तव दर्शविणारे आहेत. विरोधी विचार स्वीकारून नष्ट करण्याची अशी रणनिती मध्ययुगीन काळातसुद्धा भक्ती चळवळीबाबत वापरली गेल्याचे लेखकाने नमूद केले आहे. इतकेच नव्हे तर ब्रिटिशांच्या काळातसुद्धा, 'कायद्यासमोर सर्व समान आहेत' या ब्रिटिश संकल्पनेच्या आव्हानाला समोरे जाताना राजा राममोहन रॉय व इतरांनी हीच रणनिती वापरली. या काळातसुद्धा ब्राह्मणवादामध्ये काही बदल आणले गेलेत, काही प्रमाणात समाविष्टतासुद्धा आणली. त्याला त्यांनी सुधारित ब्राह्मणवाद असे संबोधले असले तरी जातीची मूलभूत विचारसरणी व तिचे उच्च जातींना मिळणारे विशेषाधिकार ब्राह्मणवादाने कधीही सोडले किंवा त्यागले नाहीत, हे लेखकाने नोंदवलेले निरीक्षण निश्चितच अस्वस्थ करणारे आहे. यासाठी लालमणी जोशी यांच्या संदर्भाची दिलेली पुष्टीसुद्धा महत्त्वाची आहे. लालमणी जोशी म्हणतात, ''खरे तर ब्राह्मणवाद क्वचितच घसरला, शतकाशतके वाढीसह तो वाढतच गेला आणि ब्राह्मणेतर सिद्धांत पद्धती व विचारसरणींनी परिष्कृत आणि रुपांतरित झालेले असतानाही त्याने आपल्या मूळ किंवा अन्य स्वरुपात आलेले आपली मूळ इंडो-आर्यन वर्णव्यवस्था व तिचे स्वरुप व त्यानुसार असलेले विशेषाधिकार कायम ठेवलेत...'' यासंदर्भात लेखकाने दिलेला जिओवन्नी वेरार्डी यांचा त्यांच्या ''हार्डशीप अँड डाऊनफॉल ऑफ बुद्धिझम इन इंडिया'' (२०११) या अलीकडील ग्रंथातील संदर्भ महत्त्वाचा वाटतो. आंबेडकरांचा सुद्धा ''बुद्धिझमचे पतन ब्राह्मणीझमने बुद्धिझमवर केलेल्या अनन्वित हिंसाचारामुळे झाले आहे.'' हा संदर्भ वस्तुस्थिती दर्शविणारा आहे. वर्तमानातील हिंसाचाराबाबत ज्यांना आश्चर्य वाटत असेल, त्यांना हा ग्रंथ वाचल्यानंतर सध्याचा वाढता हिंसाचार पाहता धक्के बसणार नाहीत. लेखकाने नमूद केलेल्या अभ्यासकांच्या मते, वर्तमानातील आपण पाहात असलेल्या हिंसाचाराचे मूळ बघता ते त्यावेळच्या ब्राह्मणवादी विचारसरणीत दिसून येतात. हे सगळे वाचणे मुळात समजून घेण्यासाठी आवश्यक आहे.

या ग्रंथाचा शेवटचा भाग गरीब व बहिष्कृत समाजगटांकरिता उपाय : आंबेडकरांची विचारसरणी आणि धोरणे हा आहे. यात आंबेडकरी विचार व चळवळ दलितांनी जपावी; विचारधारणेपासून दुरावणारी आंबेडकरी चळवळ, यशस्वी राजकारणाकरिता ऐक्य अपरिहार्य; राजकीय गठबंधन : डॉ. आंबेडकरांची संकल्पना, बहुसंख्यवाद व अल्पसंख्यांकांचे भवितव्य; राजकीय आरक्षणाच्या माध्यमातून प्रतिनिधित्व : खरे की नावालाच? राष्ट्र उभारणीत डॉ. आंबेडकरांचे योगदान; लोकप्रतिनिधी कसे आहेत... असावेत? धोरणाच्या पुनर्विचारांची गरज अशी अनेक प्रकरणे समाविष्ट आहेत. या भागात आंबेडकरांचे आर्थिक-सामाजिक-राजकीय विश्लेषण लेखकाने मांडले आहे. यात अर्थव्यवस्थेच्या अंमलबजावणीतील धोरणातील बदलांपासून तर राज्य समाजवादापर्यंतची आंबेडकरांच्या चिंतनाची वाटचाल लेखकाने चित्रित केली आहे. या सगळया विश्लेषणामुळे लेखक आंबेडकरांना 'केवळ दलितांचे उद्धारकर्ते' या सीमित केलेल्या परिघातून बाहेर काढण्यात यशस्वी झाल्याचे दिसून येते. देशातील दलित-शोषित समाजासह देश उभारणी व देश चालविण्याच्या विकासप्रक्रियेत आंबेडकरांनी सुचविलेल्या उपाययोजना पूर्वीपेक्षाही वर्तमानकाळात अधिक प्रासंगिक ठरतात/उपयुक्त ठरतात या मताचे आपण हा ग्रंथ वाचल्यानंतर होत जातो. हे या ग्रंथाचे शक्तिस्थान आहे.

प्रस्तुत ग्रंथ देशातील विकासप्रक्रियेत काम करणाऱ्या सत्ताधारी अधिकारी तसेच मूलभूत प्रश्नांवर अभ्यास करणारा बुद्धिजीवी संशोधक वर्ग, विचारसरणी समजून घेणारा विद्यार्थी, तरुण, समाज चळवळीत काम करणारा कार्यकर्ता, रात्रंदिन जगण्याचाच विचार करणारा शिक्षित श्रमजीवी-दलित-शोषित-महिला, देशहिताचा-बौद्ध धम्माचा विचार करणारे अभ्यासक-चिंतक व विरोधकांसहित सगळ्यांनी वारंवार वाचावा, असा दिशादर्शक आहे.

•••

**वंचितांचे वर्तमान**
**लेखक : डॉ. सुखदेव थोरात**
**किंमत : २५० । पृष्ठे : २७०**
**प्रकाशन : लोकवाङ्मय गृह, मुंबई**

# चक्रम गोखल्यांचा हिंदुत्ववादी भेजा

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा रात्रंदिवस द्वेष करण्यात हिंदुत्ववाद्यांच्या ज्या काही पिढ्या खपल्या, त्यापैकी दुसऱ्या पिढीतील एक निष्ठावंत म्हणजे विक्रम गोखले होय. महात्मा गांधी यांचा द्वेष करणे हे या लोकांचं एक जीवनव्रत बनलं आहे. कंगना नावाच्या एका वाचाळ नटीने भारताला मिळालेलं स्वातंत्र्य भीक मागून मिळालेलं आहे, असं सनसनाटी वक्तव्य केलं आणि विक्रम गोखले यांच्यासारखे हिंदुत्ववादी तिला पाठिंबा देण्यासाठी पुढं आले आहेत. कंगना काही पहिल्यांदा बोलत नाही. अशा बोलण्याचा सपाटा लावल्यानंतर तिला पद्मश्री किताब मिळाला. खरं तर, तिनं तो घ्यायला नको होता. कारण ज्यांनी भीक मागून स्वातंत्र्य मिळवलं असं तिचं म्हणणं आहे, त्यांनीच हा पुरस्कार सुरू केला आहे. खरं तर, असा भीकवाल्यांचा पुरस्कार घेताना तिला लाज वाटायला हवी होती. पण ती कशी वाटणार? जिला सनसनाटी विधानं करायला कधी लाज वाटत नाही, ती तर कंगना असते. कधीही कंगनाचा आवाज निघू शकतो. कंगना काल-परवापर्यंत जन्माला आली नव्हती. ज्यांनी स्वातंत्र्यासाठी लाठ्याकाठ्या खाल्ल्या, ज्यांनी आपलं बलिदान दिलं, ते काही या तरूण बाईला ठाऊक नसावं. तिच्या मते, केंद्रात मोदी सत्तेवर आले तेव्हा खरं स्वातंत्र्य मिळालं.



थोडा वेळ हे खरं मानूया. पण मोदींनी कधी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता आणि चक्रम असणाऱ्या विक्रम गोखलेनं कधी भाग घेतला होता हेही तिनं सांगायला हवं होतं. स्वातंत्र्य मिळालं तेव्हा चक्रम गोखलेंचा जन्म झाला असणार. स्वातंत्र्य कशाला म्हणतात, भीक कशाला म्हणतात, क्रांतिवीर कशाला म्हणतात हेही त्याला ठाऊक नसावं. एक खरंय, पण पुण्यातल्या कडव्या हिंदुत्ववाद्यांनी १९४७ च्या स्वातंत्र्याला मान्यता दिली नव्हती. संघानं कधी तिरंगा फडकवला नव्हता. त्यांच्या मते, अखंड हिंदुस्थान झाल्यानंतर स्वातंत्र्य मिळणार आहे. हेही खरं मानलं, तर मग अखंड नसलेल्या हिंदुस्थानात त्यांनी सरकार स्थापन का केलं? आपल्या पूर्वसुरी हिंदुत्ववाद्यांना 'भारतरत्न'सारखे पुरस्कार का दिले आणि चक्रम गोखलेंनी या सर्वांना विरोध करण्यासाठी आवाज का काढला नाही? आपल्या देशातलं कलाक्षेत्र हिंदुत्ववाद्यांच्या हालचालीनं भरलं आहे. त्यात एक चक्रम, त्यात एक कंगना आणि



त्यात या दोघांना पाठिंबा देणारे काही नट, गायक, दिग्दर्शक. २०१४ ला मिळालेलं स्वातंत्र्य जणू काही आपण आणलंय या तोऱ्यात हे सगळे वावरत आहेत. यांच्या राज्यात गोडसे राष्ट्रप्रेमी आणि गांधी देशद्रोही होतात. यांचा इतिहास वेगळा असतो. यांचं राष्ट्रप्रेम, राष्ट्रगीत, नकाशा, राष्ट्रवाद सारं काही वेगळं असतं. स्वातंत्र्याचे सर्वात जास्त लाभार्थी हेच आणि स्वातंत्र्याचा सर्वात जास्त द्वेष करणारे हेच. चक्रम गोखलेंना भीक मागून मिळालेलं स्वातंत्र्य आवडलं का आणि ते अशा स्वातंत्र्यात ७५ वर्षे का जगले, कंगना का जगली? या सर्वांनी विद्रोह का केला नाही, असा प्रश्न निर्माण होतोच. भीक मागून स्वतंत्र झालेल्या समाजात मी अभिनय करणार नाही, त्यांचे पुरस्कार घेणार नाही, घेतलेले परत करेन असं या नटांनी का म्हटलं नाही? तसे ते म्हणणार नाहीत. त्यांना इथं थैल्या भरून घ्यायच्या आहेत आणि त्या भरून झाल्या, की त्या भरणाऱ्या किंवा त्यासाठी मुभा देणाऱ्या स्वातंत्र्याचा द्वेष करायचा आहे. अशा लोकांना किती महत्त्व द्यायचं हेही लोकांनीच ठरवायला हवं. लवकरच देशात नथुराम गोडसे आणि आपटे यांचे पुतळे उभारण्याची मोहीम सुरू होणार आहे. त्यावर चित्रपटही काढण्याची घोषणा हिंदुत्ववादी निर्मात्यानं केलेली आहे. या चित्रपटातही हे नट-नट्या काम करतील. गल्ला भरून झाला, की पुन्हा असेच काहीतरी बोलतील.

# गाईचं शेण आणि मूत्र करणार देश बलवान!

इंडिया शायनिंग होत असला, धावत असला आणि आपला कारभारी जगातला बलवान नेता होत असला, तरी आपला देश मात्र अजून सशक्त होत नाही. इंडिया सशक्त कसा करायचा याचा विचार करण्यासाठी देशभर अनेक भगव्या प्रयोगशाळा सुरू आहेत. त्यातून रोज काही सिद्धांत निघत असतात. काही वापरात येतात, काही चर्चेला येतात. नागपूर, अहमदाबाद आदी ठिकाणी पूर्वीच प्रयोगशाळा सुरू झाल्या आहेत. आता त्यांचा प्रसार आणि प्रचार देशभर होतो आहे. नागपूरच्या उशाला लागून असलेल्या मध्य प्रदेशातही अशी प्रयोगशाळा सुरू झाली आहे. पूर्वी मध्य प्रदेश महाराष्ट्र म्हणून ओळखला जायचा. त्रिपुरामध्येही शाळा सुरू झालीय. गुजरातमधील प्रयोगशाळेतले काही सिद्धांत इतरत्रही वापरले जातात. साबरमती आश्रमाजवळ व्यक्त होणारं नग्न दारिद्र्य जागतिक पातळीवरील नेते आले की कसं लपवायचं याबाबतचा प्रयोग यशस्वी झालाय. कापड टाकून आणि तेही रंगीबेरंगी कापड टाकून दारिद्र्य ओकणारी अख्खी झोपडपट्टीच लपवली जाते. जागतिक नेत्यांना झोपडपट्टीऐवजी एक सुंदर चित्र पहायला मिळते, विकास पहायला मिळतो. भकासपण लपवण्याचा हा प्रयोग जागतिक पातळीवर गाजतोय. दारिद्र्य लपवण्याचा हा बेफाम प्रयोग अनेक ठिकाणी स्वीकारला गेलाय. तर प्रयोगशाळेतून असं काही काही बाहेर पडत असतं. मध्य प्रदेश, त्रिपुरा, छत्तीसगड, कर्नाटक आदी ठिकाणी राष्ट्रमाता, राष्ट्रदेवता बनलेल्या किंवा बनवल्या गेलेल्या गाईबाबत प्रयोग होतो.

हिंदुत्ववाद्यांमध्ये एक लोकप्रिय नेते म्हणून ओळखले जाणारे मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी हिंदुस्थानला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा नुसता ध्यास घेतला आहे. रात्रंदिवस ते या विचारात गढून गेलेले असतात. प्रयोगशाळेत राबराब राबत असतात. अखंड संशोधन केल्यानंतर असा एक सिद्धांत प्रयोगशाळेत सापडला, की त्यामुळे देशाचा विकासच विकास होणार आहे. तर हा संशोधनाअंती तयार झालेला सिद्धांत गोमातेवर बेतला आहे. या सिद्धांताचे नाव आहे गोमूत्र आणि गोशेणातून देशाचा भरभक्कम आर्थिक विकास! महिला पशूवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सभेत त्यांनी हा सिद्धांत जाहीर केला आणि सारा देश अवाक झाला. आता हा सिद्धांत वास्तवात आणण्यासाठी चौहान यांनी खूप दिवसांपासून प्रयत्न सुरू केले आहेत. देशातील पहिले आरोग्य केंद्र किंवा हवापाण्याचे सुंदर केंद्र फक्त गाईंसाठी उभे राहिले ते मध्य प्रदेशात. विशेष म्हणजे, त्याचे उद्घाटन खुद्द सरसंघचालकांच्या हस्ते झाले. तेही पशूवैद्यकीय अधिकारी होते. गेल्या वर्षी याच मुख्यमंत्र्यांनी गायीसाठी मंत्रिमंडळात स्वतंत्र खाते सुरू केले. गोमाता खाते! अनेक गोशाळांची निर्मिती सुरू झाली. खरे तर, सॉफ्ट हिंदुत्वाकडे जाणाऱ्या काँग्रेसनेही मध्य प्रदेशात गो कल्याणासाठी काही योजना आखल्या होत्या. त्यावर चौहान यांनी कडी केली. तर गोमुत्रामुळे देशाची अर्थव्यवस्था कशी सुधारणार




असा प्रश्न पंक्चरवाल्यासारख्या सामान्य माणसाच्या मनात असणार. त्याचंही उत्तर चौहान यांनी देऊन ठेवलंय. शेतीसाठी गाय-बैलाचा वापर मोठ्या प्रमाणात झाला, की यंत्रावरचा खर्च कमी होणार. शेणाचा खत म्हणून वापर झाला, की रासायनिक खतावरील खर्च तर कमी होणारच, पण उत्पनही वाढणार. पिकावर रोगाचा प्रादुर्भाव झाला, की रासायनिक कीटकनाशके वापरायची नाहीत तर त्याऐवजी गोमूत्र फवारणी करायची. प्रकृती सदृढ करण्यासाठी पिझ्झा, बर्गरचा वापर करायचा. नाही तर गाईचं दूध प्यायचं आणि पैसा वाचवायचा. प्रकृती बिघडली तर औषधांवर खर्च होणारा पैसा वाचवायचा आणि गोमूत्र सेवन करायचं. अशाप्रकारे वायफळ खर्च होणारा पैसा मोठ्या प्रमाणात वाचला की अर्थव्यवस्था सुधारते. भारत जगातला श्रीमंत देश ठरू शकतो आणि प्रसंगी तो अमेरिका, चीनला कर्ज देऊ शकतो. त्रिपुरानं यापुढं जाऊन दहा हजार कुटुंबांना गाईंचं वाटप केलं. तिचं शेण आणि मूत्र विकत घेण्याची हमी दिली. सातत्यानं उत्पन्न येत गेलं की बेकारी संपते आणि रोजगाराची हमी सुरू होते, असा हा बेकारी निर्मुलनाचा झटपट मार्ग आहे. बेकारी कशी संपवायची या प्रश्नाचं उत्तर भल्याभल्यांना कळत नव्हतं. अगदी नोबेल पुरस्कार पटकवणाऱ्यांनाही कळत नव्हतं; ते भारतातील काही पुढाऱ्यांना कळलं. प्रश्न कोणताही असो, त्यावर आता दोन अक्षरी एकच उत्तर आहे आणि ते म्हणजे गाय. गाईच्या अभ्यासासाठी आता स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचाही विचार सुरू होईल आणि कोण्या एकेकाळी भारतात सोन्याचा धूर निघायचा तसा पुन्हा एकदा निघू लागेल यात शंका नाही. गाय म्हणजे विकासाचं, राष्ट्राचं, रोग निर्मुलनाचं, श्रद्धेचं, दारिद्र्यनिर्मुलनाचं प्रतीक झालेली आहे. गाय वगळून इतरांना ही गोष्ट ठाऊक आहे. गाईला जेव्हा तिच्यावर बेतलेलं नवं अर्थकारण कळेल तेव्हा ती काय उत्तर देईल?

# लैंगिक छळाची बदलती व्याख्या आता संपवायला हवी विकृती...

कधी कधी न्यायालयातही विचित्र वाटावेत असे निर्णय लागतात. संभ्रम तयार होतो. निर्णयावर गदारोळ होतो. पण आपल्या न्यायव्यवस्थेत एक चांगली गोष्ट ही आहे, की असे निर्णय वरची न्यायालये बदलतात. दुरूस्त करतात आणि प्रसंगी रद्दही करतात. त्यामुळेच सर्वसामान्यांचा न्यायालयांवरील विश्वास टिकून आहे. बदलत्या काळात तर सामान्यांसाठी न्यायदेवता हाच एक पर्याय राहिला आहे. काही वर्षांपूर्वी राजस्थानमधील एका आदिवासी महिलेवरील बलात्काराचे प्रकरण देशभर गाजले. ते न्यायालयात गेले. सगळा देश न्यायालयाच्या निर्णयाकडे नजर लावून होता. निर्णय लागला तेव्हा सर्वत्र निराशा पसरली. न्यायालयानं आरोपीला निर्दोष सोडलं होतं. न्यायालय कोणालाही तसं निर्दोष सोडत नाही, तर त्यामागं एक ठोस कारण असतं, निदान असतं. या प्रकरणातही निर्दोष सोडण्यामागं एक कारण होतंच; पण ते अतार्किक वाटलं. न पटणारं होतं. वरच्या जातीतला पुरूष खालच्या जातीतल्या स्त्रीवर बलात्कार करत नाही, असं ते कारण होतं. खूप गदारोळ झाला. प्रकरण वरच्या न्यायालयात गेले. तेथे हा युक्तिवाद नाकारण्यात आला. भंवरी देवीच्या नावाचे हे प्रकरण जगभर गाजले होते. बलात्कारविरोधी कायदे बदलण्यात आले. बलात्काराच्या आणखी एका प्रकरणात आरोपीला शिक्षा म्हणून कोर्टाचे काम संपेपर्यंत फक्त उभे राहण्याची शिक्षा देण्यात आली होती. वरच्या न्यायालयानं ती रद्द करून दुसरी शिक्षा दिली. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील, की ज्यामुळे न्यायदेवतेवरचा विश्वास दृढ होण्यास मदत तर झालीच, शिवाय मूळ प्रश्नाचे कंगोरे समजून घेण्यासाठीही मदत झाली.


लैंगिक छळाची प्रकरणं आता नित्याचीच झाली आहेत. भारत त्यात आघाडीवर आहे. या छळाच्या अनेक महिला, मुली बळी ठरत आहेत. एकीकडे या छळाची व्याख्या व्यापक केली जात आहे. शब्दांद्वारे, नजरेद्वारेही असा छळ करता येतो असे मानले जात आहे आणि दुसरीकडे बरोबर या प्रयत्नांना धक्का बसावा अशा गोष्टीही घडत आहेत. उच्च न्यायालयाच्या एका खंडपीठात असाच निर्णय झाला. शरीराला थेट संपर्क झाला नसेल तर ती घटना लैंगिक अत्याचार ठरत नाही, असा निर्णय या खंडपीठानं दिल्यानं आरोपी निर्दोष सुटला. पण या निकालावर सामाजिक, विधी आणि महिलांसाठी लढणाऱ्या क्षेत्रात खूप चर्चा झाली. सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण गेलं आणि न्यायालयाने खंडपीठाचा निर्णय रद्द केला. त्वचेशी संपर्क झाला तरच लैंगिक अत्याचार होतो, ही व्याख्या सर्वोच्च न्यायालयाने रद्द ठरवली.




याचा लाभ असंख्य महिलांना होणार आहे आणि गुन्हेगारांवर वचक बसण्यासाठी निश्चितच मदत होणार आहे. अल्पवयीन मुलीला तिच्या कपड्यावरून छातीला स्पर्श केला तर लैंगिक अत्याचार होत नाही. तसा तो व्हायचा असेल तर थेट त्वचेला स्पर्श व्हायला हवा. त्वचा आणि स्पर्श यांच्यामध्ये कपडा असेल तर तो गुन्हा ठरत नाही. कायद्याने अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाबद्दल तीन वर्षांची शिक्षा आहे, पण मध्ये कपडा आल्यामुळे कृत्य सौम्य झालं आणि शिक्षाही कमी झाली. सर्वोच्च न्यायालयाने खालचा निर्णयच रद्द ठरवला. अशीच वेळ कर्नाटकातील उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींवर आली होती. बलात्काराच्या एका प्रकरणात पीडित महिला बलात्कारानंतर निवांत झोपी कशी गेली, असे विधान न्यायमूर्तींनी केलं होतं ते त्यांनी मागं घेतलं. जागरूक समाज आणि निष्पक्ष वागणाऱ्या न्यायालयांमुळे हे शक्य होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे पीडित मुलीला न्याय मिळाला ही चांगली गोष्ट झाली. पण मूळ प्रश्न उरतो आणि तो म्हणजे लैंगिक छळाचा प्रकार एका विकृतीत रुपांतरित होत आहे आणि जगभरच या विकृतीची जणू काही लाट आल्यासारखे दिसते. भारतात दर पंधरा मिनिटांना एक म्हणजे प्रत्येक तासाला चार-पाच बलात्कार होतात. विनयभंगाचे प्रमाण तर आणखी भयावह आहे. २०१८ मध्ये भारतात चौतीस हजार बलात्कार झाले होते. नोंदवल्या न गेलेल्या बलात्कारांची संख्या नेहमीच नोंदवल्या गेलेल्या बलात्कारांपेक्षा जास्तच असते. म्हणूनच कायद्यात बदल करून ते कठोर करण्याबरोबरच बलात्कार नावाची विकृती कशी संपेल याचा विचार करायला हवा. •••

**- पंक्चरवाला**

# कविता



## याच दिवसांत

कुणी श्वास पुरवतोय
कुणी दवापाणी,
कुणी अश्रू पुसतोय
कुणी मेलेल्यांना पुरताहेत

ना ओळखदेख
ना नातीगोती
धर्म, जात-पात, पंथ मागे पडलाय
रक्ताचा रंग लालच आहे
यावर सर्वांचं एकमत झालंय

जीव धोक्यात घालून
धडपडताहेत माणसं
माणूस वाचवण्यासाठी

जिवंत राहण्यासाठी
यापेक्षा आश्वासक वातावरण
कधीच नव्हतं
यापूर्वी ...

**- सायमन मार्टिन**

# चालताना वाटेवरी या

चालताना वाटेवरी या, ना थकलो कधी इथे
कोपले तिन्ही ऋतूही, ना सुकलो कधी इथे

वळणावळणावरी नव्या, गाठ पडली भल्याबुऱ्यांची
कोसळले आभाळ कितीदा, ना झुकलो कधी इथे

राजरोस चाललेला, हा सौदा इथेही दिलादिलांचा
सौदागर भेटले पदोपदी, ना विकलो कधी इथे

स्वेद सागरामधुनी, कैक हुंकारले भुकेले जीव
साथ त्यांना द्यावयाला, ना चुकलो कधी इथे

भेटले प्रेषित, दूत, मुल्ला, पंतोजीही भले भले
पण उतरंडी उभारण्याचे, ना शिकलो कधी इथे

खुणावती चौकात इथल्या, कळस अन् मिनार
पण विहाराच्या पायरीला, ना मुकलो कधी इथे

**- रविचंद्र हडसनकर**



# कोण काय बोलतं



आरक्षणमुक्त भारत हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा अजेंडा आहे. त्यामुळे मोदी सरकार इम्पिरिकल डेटा राज्य सरकारला देईल की नाही, याबद्दल शंका आहे

**– प्रा. हरी नरके** (ज्येष्ठ विचारवंत)



वाढती महागाई, पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या वाढत्या दरांनी सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असून मोदी सरकारमुळे जनतेचे जगणे दुष्कर झाले आहे

**– के.सी. वेणुगोपालन** (काँग्रेसचे सरचिटणीस)



मनुवाद्यांशी लढण्यासाठी देशभरातील बुद्धविहारांच्या माध्यमातून लोकांना जोडण्याचे काम आम्ही करत आहोत

**– सुधीरराज सिंह** (बौद्ध धम्माचे आणि आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक व दिल्लीतील ज्येष्ठ पत्रकार)



महाराष्ट्रात ठाकरे सरकारला काम करूच द्यायचे नाही. म्हणूनच नेत्यांच्या मागे ईडी किंवा सीबीआयला लावून द्यायचे, दंगली घडवायच्या असे कारस्थान सुरू आहे

**– संजय राऊत** (शिवसेनेचे खासदार)



राज्यघटना बदलण्याची भाषा करणारे पेशव्यांचे वंशज ओबीसींना पुन्हा व्यवस्थेबाहेर ठेवण्याचे षड्यंत्र रचत आहेत

**– ॲड. प्रकाश आंबेडकर** (वंचित बहुजन आघाडीचे नेते)



हिंदू धर्म म्हणजे शीख किंवा मुस्लिमांना मारहाण करणे नव्हे. हिंदुत्वाचा मात्र तसाच अर्थ होतो आहे

**– राहुल गांधी** (काँग्रेसचे नेते)



गुंतवणूकदारांनी महाराष्ट्राला पहिली पसंती दिली असून मागील दोन वर्षांत झालेले ३ लाख ३० हजार कोटींचे करार हे याचे द्योतक आहे

**– सुभाष देसाई** (महाराष्ट्राचे उद्योगमंत्री)



योगी सरकारने उत्तर प्रदेश बर्बाद केले. शेतकऱ्यांची पिळवणूक केली आणि महागाई वाढविली

**– अखिलेश यादव** (उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री)



सामाजिकदृष्ट्या सक्रिय असणारे लोक आपल्या अडचणी इतरांशी शेअर करत असतात. त्यामुळे त्यांची प्रकृती चांगली राहते

**– प्रा. सुसान चार्ल्स** (कॅलिफोर्निया विद्यापीठातील मानसशास्त्राच्या प्राध्यापिका)



भविष्यात अंतराळातच नवी शहरे वसवली जातील. अंतराळात तरंगणाऱ्या घरांमध्ये माणसांचा जन्म होईल आणि हे लोक सुटीचा आनंद घेण्यासाठी पृथ्वीवर येतील

**– जेफ बोजोस** (ॲमेझॉन आणि ब्ल्यू ओरिजन कंपन्यांचे संस्थापक)

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

With Best Compliments





Sos. Agrotech Pvt.Ltd

